CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

धाराशिव | शनिवार, २७ डिसेंबर २०२५ | वर्ष ३ रे अंक २९७ | पाने १२ | किंमत रु. ६/- | ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



संपूर्ण जगाकडून आम्हाला शिकण्याची आवश्यकता आहे. त्यालाच 'ग्रहिष्णुता' म्हणतात. ग्रहण करण्याची क्षमता आमच्यात असावी. अहंकारी व्यक्तीत हा गुण असूच शकत नाही. 'मी सर्वज्ञ आहे, सर्व काही मी जाणतो' असे झाले तर ज्ञान ग्रहणशीलता संपली म्हणून समजावे.

**- रंगा हरी**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. बौद्धिक प्रमुख

## विनम्र अभिवादन



गुरू गोविंदसिंग यांची आज जयंती

# जेन-झेड घडविणार विकसित भारत

## • पंतप्रधान मोदींचे प्रतिपादन • स्वावलंबनासाठी गुलामगिरीची मानसिकता अडथळा

◆ **नवी दिल्ली, २६ डिसेंबर**

केवळ वयाने कोणीही लहान किंवा मोठा होत नाही. प्रत्येकाचे कर्तृत्व व्यक्तीला लहान-मोठा बनवत असते. तुम्ही तुमच्या कामातून आणि कामगिरीतून महान बनता. अगदी लहान वयातही तुम्ही अशी कामे करू शकता की इतर लोक तुमच्याकडून प्रेरणा घेऊ शकतात. जेन-झेड हे भारताचे भविष्य असून, विकसित राष्ट्राचा संकल्प नवीन पिढीच पूर्णत्वास नेईल याचा मला विश्वास आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले.

राजधानी दिल्लीतील भारत मंडपम् येथे वीर बाल दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात गुरू गोविंद सिंह यांच्या मुलांच्या बलिदानाचे स्मरण करीत पंतप्रधान मोदी म्हणाले, स्वावलंबनासाठी गुलामगिरीची मानसिकता मोठा अडथळा आहे. नव्या पिढीने या मानसिकतेतून बाहेर येण्याची गरज आहे. शूर मुले हे भारताच्या धैर्याचे आणि शौर्याचे प्रतीक आहेत. वय आणि परिस्थितीच्या सीमा तोडणारे ते शूरवीर आहे. ते क्रूर मुघल साम्राज्याविरुद्ध पहाडासारखे उभे राहिले.



यामुळे धार्मिक कट्टरतावादाच्या अस्तित्वाला हादरा बसला. ज्या राष्ट्राचा इतका गौरवशाली भूतकाळ आहे, त्यांचा वारसा लाभलेली पिढी भारताचा विकसित राष्ट्राचा संकल्प पूर्ण करेल याचा मला विश्वास आहे. सरकारने युवा पिढीच्या शौर्याने प्रेरित होऊन वीर बाल दिवस साजरा करण्यास सुरुवात केली. गेल्या चार वर्षांत, वीर बाल दिवसाच्या नवीन परंपरेची प्रेरणा नवीन पिढीपर्यंत पोहोचवली आहे. मुलांच्या बलिदानाची कहाणी प्रत्येकाच्या ओठावर असायला हवी होती. दुर्दैवाने, स्वातंत्र्यानंतरही देशात गुलामगिरीची मानसिकता प्रचलित होती. या गुलामगिरीची बीजे १८३५ मध्ये ब्रिटिश राजकारणी मॅकॉले यांनी पेरली होती. स्वातंत्र्यानंतरही देशाला त्या मानसिकतेतून मुक्त होऊ दिले गेले नाही. शीख धर्माचे दहावे गुरु श्री गुरु गोविंद सिंह जी यांचे पुत्र साहिबजादा यांच्या धाडस आणि बलिदानाचा सन्मान करण्यासाठी वीर बाल दिवस साजरा केला जातो. (वृत्तसंस्था)

### स्वातंत्र्यानंतर सत्य दाबण्याचे प्रयत्न

स्वातंत्र्यानंतर देशात सत्य दाबण्याचे प्रयत्न केले गेले. आता, भारताने गुलामगिरीच्या मानसिकतेतून स्वतःला मुक्त करण्याचा निर्णय घेतला आहे. भारतीयांच्या बलिदानाच्या आणि शौर्याच्या आठवणी आता दडपल्या जाणार नाहीत, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

### जुन्या व्यवस्थेमुळे तरुणांचा स्वप्नभंग

पूर्वी तरुण स्वप्न पाहण्यासही घाबरत होते, कारण जुन्या व्यवस्थेने निराशेचे वातावरण निर्माण केले होते. त्यांच्या स्वप्नांचा चुराडा करण्यासाठी तत्कालीन व्यवस्था जबाबदार होती. पण आज देश प्रतिभा शोधतो आणि त्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देत आहे, असे पंतप्रधान म्हणाले.

### २० शूर मुलांचा बाल पुरस्काराने सन्मान

वीर बाल दिनानिमित्त, पंतप्रधानांच्या उपस्थितीत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी २० मुलांना पंतप्रधान राष्ट्रीय बाल पुरस्काराने सन्मानित केले. यावर्षी दोन मुलांना मरणोत्तर पुरस्कार देण्यात आला, त्यांच्या पालकांनी हा पुरस्कार स्वीकारला. ऑपरेशन सिंदूरदरम्यान सीमेवर तैनात सैनिकांना चहा आणि नाश्ता देऊन शौर्य दाखविणाऱ्या फिरोजपूरच्या श्रवण सिंगचा सन्मान करण्यात आला.

# राज्यात जनसुरक्षा कायदा लागू

## विधि व न्याय विभागाने जारी केला अध्यादेश

◆ **मुंबई, २६ डिसेंबर**

कडव्या डाव्या विचारसरणीच्या संघटनांच्या बेकायदेशीर कृत्यांवर, कारवायांवर आळा घालण्यासाठी महाराष्ट्र सरकारने १० जुलै रोजी विधिमंळात विशेष जन सुरक्षा कायदा मंजुर केला होता. याबाबतचा अध्यादेश विधि व न्याय विभागाने जारी करून हा कायदा अंमलात आणण्यात आला आहे.

या कायद्याला मोठ्या प्रमाणात विरोध झाल्यानंतर या मसुद्याला संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविण्यात आले. त्यानंतर चिकित्सा समितीने सुचना मागविल्या. यावेळी समितीकडे १२ हजार ५०० सुचना प्राप्त झाल्या होत्या. त्यानुसार समितीने महत्वाचे तीन बदल केले. यात कडव्या विचारसरणीच्या व तत्सम संघटना असा बदल, सल्लागार मंडळात, राज्य शासनाने नियुक्त केलेला, उच्च न्यायालयाचे न्यायाधीश किंवा सेवानिवृत्त न्यायाधीश सल्लागार मंडळाच्या अध्यक्षपदी, तर दोन सदस्य त्यापैकी एक सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश आणि दुसरा सदस्य उच्च न्यायालयातील सरकारी वकील सदस्यपदी असतील, या कायद्यांतर्गत दाखल गुन्ह्याची चौकशी पोलिस उपनिरीक्षकांऐवजी पोलिस उपअधीक्षक दर्जाचे अधिकारी करतील आदींचा समावेश आहे.

**काय आहे हा कायदा?**

बेकायदेशीर कारवायांसाठी निधी गोळा करणे किंवा साहित्य जमा करणे ते तोंडी, लेखी, संकेतांद्वारे किंवा दृश्य माध्यमांतून केले असले तरी या सर्व प्रकरणांत कारवाई केली जाईल. सार्वजनिक शांतता भंग करणाऱ्या संघटनांच्या सदस्यांना ३ वर्षांपर्यंत कारावास आणि ३ लाख रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो. बेकायदेशीर संघटनांना मदत करणाऱ्यांनाही कारावास आणि दंडाची तरतूद आहे.

जर एखादी व्यक्ती त्या संघटनेची सदस्य नसली, तरी कोणत्याही प्रकारे चंदा स्वीकारत असेल, मदत करत असेल किंवा आश्रय देत असेल, तर तिला २ वर्षांचा कारावास आणि २ लाख रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो. कायद्यानुसार रस्ता, रेल्वे, हवाई तसेच जलमार्ग वाहतुकीत अडथळा निर्माण केल्यास कारवाई केली जाईल. दोषींना २ ते ७ वर्षांपर्यंत कारावास आणि २ ते ५ लाख रुपयांपर्यंत दंडाची तरतूद करण्यात आली आहे. राज्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आणि नागरिकांना शांततामय व सुरक्षित जीवन मिळावे यासाठी सरकारने हा कायदा आणला आहे. (तभा वृत्तसेवा)

### संघटना बेकायदेशीर ठरवण्याचा अधिकार

**कोणत्याही संघटनेच्या कारवायांची चौकशी करून ती बेकायदेशीर ठरवण्याचा अधिकार सरकारला असेल. संबंधित संघटनेला याबाबत लेखी सूचना दिली जाईल. संघटनेला १५ दिवसांच्या आत सरकारसमोर आपली बाजू मांडावी लागेल. यानंतर सल्लागार समितीमार्फत सुनावणी होईल.**

## महत्त्वाचे

### बाजारात सलग दुसऱ्या सत्रात घसरण

**मुंबई** : भारतीय शेअर बाजारात शुक्रवारी सलग दुसऱ्या सत्रात घसरण पाहायला मिळाली. परदेशी गुंतवणूकदारांकडून होणारी विक्री, रुपयाचे घसरते मूल्य आणि कच्च्या तेलाच्या किमतीत झालेली वाढ यामुळे गुंतवणूकदारांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले.



सत्राअखेर मुंबई बाजाराचा निर्देशांक ३६७ अंकांनी कोसळून ८५,०४१ वर बंद झाला तर निफ्टी ९९ अंकांनी खाली येत २६,०४२ वर स्थिरावला. धातू आणि ग्राहकी वस्तू क्षेत्राचा अपवाद वगळता जवळपास सर्वच क्षेत्रीय निर्देशांक लाल विक्रीच्या दबावाखाली राहिले. सर्वाधिक घसरण आयटी, टेलिकॉम आणि ऑटो शेअर्समध्ये दिसून आली. या पडझडीमुळे एकाच दिवसात बाजार भांडवलातील १.०६ लाख कोटी रुपये कमी झाले.

### आपच्या तीन नेत्यांवर एफआयआर

**नवी दिल्ली** : दिल्ली पोलिसांनी आम आदमी पार्टी (आप) चे नेते सौरभ भारद्वाज, संजय झा आणि आदिल अहमद खान यांच्यावर एफआयआर दाखल केला आहे. या सर्वांवर ख्रिश्चन समुदायाच्या भावना दुखावल्याचा आरोप आहे. १८ डिसेंबर रोजी सौरभ भारद्वाज यांनी त्यांच्या सोशल मीडियावर एक व्हिडीओ पोस्ट केला होता.

### 'हिंदू युवकांच्या हत्येतील दोषींविरुद्ध कारवाई करा'

**नवी दिल्ली** : बांगला देशात अल्पसंख्यक असलेल्या हिंदूंवर होत असलेल्या अत्याचाराच्या वाढत्या घटनांबद्दल चिंता व्यक्त करत भारताने या घटनांसाठी दोषी असलेल्यांवर कठोर कारवाईची मागणी केली आहे. आपल्या नियमित पत्रपरिषदेत परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जायस्वाल म्हणाले की, बांगला देशात अल्पसंख्यक हिंदू समुदायाबद्दल वाढत असलेली शत्रुत्वाची भावना चिंतेचा विषय आहे. बांगला देशात एका हिंदू युवकाच्या झालेल्या हत्येचा भारत तीव्र निषेध करत आहे. या निर्घृण हत्येच्या घटनेतील आरोपींच्या लवकरात लवकर मुसक्या आवळून त्यांना न्यायालयात उभे केले जाईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. बांगला देशात घडत असलेल्या घटनांवर भारत सरकारचे पूर्ण लक्ष असून बांगला देशातील अल्पसंख्यकांच्या सुरक्षिततेसाठी तेथील सरकार आवश्यक ती पावले उचलेल, असा आमचा विश्वास असल्याचे जायस्वाल यांनी सांगितले.



तिरुपती येथील राष्ट्रीय संस्कृत विद्यापीठात भारतीय विज्ञान संमेलनाचे रा. स्व. सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांच्या हस्ते शुक्रवारी उद्घाटन करण्यात आले. यावेळी केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह आणि आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू उपस्थित होते

### १ एप्रिलपासून जुना आयकर कायदा बदलणार

**नवी दिल्ली** : केंद्र सरकार १ एप्रिल २०२६ पासून देशात नवीन आयकर कायदा लागू करणार आहे. हा नवीन कायदा १९६१ पासून अस्तित्वात असलेल्या जुन्या कायद्याची जागा घेईल. नवीन कायद्याचा सर्वांत मोठा उद्देश कर प्रक्रिया सोपी करणे आणि सामान्य माणसासाठी गुंतागुंत कमी करणे हा आहे. नवीन नियमांनुसार, आता पगारदार वर्गाला १२ लाख पर्यंतच्या वार्षिक उत्पन्नावर कोणताही कर भरावा लागणार नाही.

# ३१ जानेवारीपर्यंत नक्षल्यांनी शरण यावे

## अखेरची मुदत; सरकार आत्मसमर्पण धोरण थांबविणार

**रायपूर, दि.२६ डिसेंबर-**

माओवादी हिंसाचाराचे उच्चाटन करण्यासाठी सरकार नवीन वर्षात कठोर भूमिका घेत आहे. केंद्र आणि राज्य सरकारने जानेवारी, फ ेब्रुवारी आणि मार्चसाठी रणनीती आखली आहेत. या रणनीतीअंतर्गत, माओवाद्यांना ३१ जानेवारी २०२६ पर्यंतच आत्मसमर्पण करण्याचा पर्याय असेल आणि ते पुनर्वसन योजनांचा लाभ घेऊ शकतील.

समर्पण आणि पुनर्वसन धोरण-२०२५ अंतर्गत, आत्मसमर्पण करणाऱ्या माओवाद्यांना रोख प्रोत्साहन, प्रशिक्षण, नोकरी आणि स्वयंरोजगार अनुदान आणि घरे दिली जात आहेत. राज्याच्या एका वरिष्ठ सुरक्षा अधिकाऱ्याने सांगितले की, फेब्रुवारीपासून माओवाद्यांसाठी आत्मसमर्पण धोरण संपुष्टात येईल. त्यानंतर, सुरक्षा दल माओवाद्यांच्या अड्ड्यांमध्ये प्रवेश करण्याची, त्यांना वेढा घालण्याची आणि निर्णायक कारवाई करण्याची रणनीती राबवतील. ज्याप्रमाणे सुरक्षा दलांनी विजापूर जिल्ह्यातील करेगुट्टा टेकडीवरील माओवाद्यांच्या सर्वात सुरक्षित गडाचा नाश केला, त्याचप्रमाणे इतर अड्डे देखील त्याच पद्धतीने उद्ध्वस्त केले जातील. यासाठी शेजारील राज्यांमधील सुरक्षा दलांना तैनात केले जाईल. जर गरज पडली तर, ऑपरेशन यशस्वी होण्यासाठी बस्तरमध्ये अतिरिक्त सुरक्षा दल तैनात केले जाऊ शकतात. या व्यापक ऑपरेशनबाबत केंद्र आणि राज्य सरकारांमध्ये एक करार झाला आहे. पंतप्रधान मोदी, गृहमंत्री यांनी मार्च २०२६ पर्यंत संपूर्ण देश माओवादी हिंसाचारापासून मुक्त करण्याचे वचन दिले आहे हे विशेष.

### युक्रेनचा रशियाच्या तेल रिफायनरीवर हल्ला

**कीव्ह** : युक्रेनने रशियाच्या तेल शुद्धीकरण प्रकल्पावर ब्रिटनच्या स्टॉर्म शॅडो क्षेपणास्त्रांनी हल्ला केला आहे, हा हल्ला रशियाच्या रोस्तोव भागात असलेल्या नोवोशाख्तिंस्क तेल शुद्धीकरण प्रकल्पावर करण्यात आला. युक्रेनच्या जनरल स्टाफने सांगितले की, रिफायनरीमध्ये स्फोट झाले. ही रिफायनरी दक्षिण रशियातील तेल उत्पादनांची मोठी पुरवठादार होती.

# प्रकाश महाजन यांचा शिवसेनेत प्रवेश

◆ **मुंबई, २६ डिसेंबर**

भाजपाचे दिवंगत नेते प्रमोद महाजन यांचे बंधू आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते प्रकाश महाजन यांनी एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना शिंदे गटात सामील होण्याचा निर्णय घेतला आहे. प्रकाश महाजन हे पूर्वी राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पक्षाशी संबंधित होते आणि राज्याच्या राजकारणात त्यांचे महत्त्वाचे स्थान होते.



शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेसाठी हे पाऊल एक प्रोत्साहन म्हणून पाहिले जात आहे. विशेषतः अशा वेळी जेव्हा पक्ष विविध राजकीय आव्हानांना तोंड देत आहे. प्रमोद महाजन यांच्या निधनानंतरही त्यांचे कुटुंब राजकीयदृष्ट्या सक्रिय आहे आणि आता प्रकाश महाजन यांचे हे मोठे पाऊल या कुटुंबाची राजकीय सक्रियता पुन्हा स्थापित करताना दिसते. (वृत्तसंस्था)

### आरक्षित रेल्वे तिकिटावर अतिरिक्त शुल्क नाही

**नवी दिल्ली** : भारतीय रेल्वेने स्पष्ट केले आहे की, २६ डिसेंबरपासून तिकीट भाडेवाढ लागू झाली असली तरी ज्या प्रवाशांनी २६ डिसेंबरपूर्वी तिकीट आरक्षित केले आहे, त्यांना कोणतेही अतिरिक्त शुल्क भरावे लागणार नाही. २१ डिसेंबर रोजी रेल्वेने लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी २६ डिसेंबरपासून भाडेवाढीची घोषणा केली होती. माध्यमांशी बोलताना रेल्वे बोर्डाचे कार्यकारी संचालक दिलीप कुमार यांनी ही माहिती दिली. ते म्हणाले, २६ डिसेंबर किंवा त्यानंतर प्रवासादरम्यान ट्रेनमध्ये किंवा स्टेशनवर जे तिकीट बनवतील, त्यावर वाढीव भाडे लागू होईल.

# कॉलेजला निघालेल्या दोन तरुणींवर काळाचा घाला

**तभा वृत्तसेवा**
**मोहोळ, दि.२६ डिसेंबर-**

कॉलेजचे स्वप्न उराशी बाळगून घराबाहेर पडलेल्या दोन विद्यार्थिनींवर काळाने घाला घातला. भरधाव टेम्पोने दुचाकीला दिलेल्या जोरदार धडकेत दोन तरुणींचा मृत्यू झाला. ही हृदयद्रावक घटना शुक्रवारी दि.२६ डिसेंबर रोजी सकाळी नजीक पिंपरी परिसरात घडली.



प्रज्ञा धनाजी कोकाटे (वय-७, रा.तांबोळे) स्नेहल काशिनाथ वाघमोडे (वय-१७, रा.नजीक पिंपरी) असे मृत्यू झालेल्या तरूणींचे नाव आहे. प्रज्ञा ही मोहोळच्या नेताजी महाविद्यालयात ११ वी शास्त्र शाखेत शिक्षण घेत होती. तर स्नेहल कन्या प्रशालेत होती. शुक्रवारी सकाळी प्रज्ञा आणि स्नेहल या दोघी एम एच १३ इ एन ७०९५ या दुचाकीवरून कॉलेजला निघाल्या असताना नजीक पिंपरीच्या हद्दीत समोरून येणाऱ्या भरधाव टेम्पो एमएच १३ ईपी ००१९ ने त्यांच्या दुचाकीला धडक दिली.

धडकेचा जोर इतका प्रचंड होता की, प्रज्ञा कोकाटे हिचा जागीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत जखमी स्नेहल वाघमोडे हिला तातडीने मोहोळ ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र तिची प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी तिला सोलापूर येथील रुग्णालयात हलवण्यात आले.

परंतू तिनेही रस्त्यातच प्राण सोडले. घटनेची माहिती मिळताच मोहोळ पोलीस ठाण्याचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी अपघातास कारणीभूत ठरलेला टेम्पो आणि चालक राजीव आप्पाण्णा साळुंकी (रा.इंडी जि.विजयपूर) यास ताब्यात घेतले असून, गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.



# अमेरिकेचा नायजेरियात हल्ला

## • इसिसचे ५० पेक्षा अधिक दहशतवादी ठार • ख्रिश्चन समुदायांवरील हल्ल्याचा घेतला सूड





### इस्लामी कट्टरपंथीयांचा कट उधळून लावणार

माझ्या नेतृत्वाखाली, आपला देश कट्टरपंथी इस्लामिक दहशतवादाला वाढू देणार नाही, त्यांचे कट उधळून लावण्यात आम्ही समर्थ आहोत. जर त्यांनी ख्रिश्चनांची कत्तल सुरूच ठेवली तर असे अनेक दहशतवादी मारले जातील. यापूर्वी आम्ही सीरियामध्ये आयसिसविरुद्ध मोठ्या प्रमाणात हवाई हल्ले केले. त्यात ७० हून अधिक दहशतवादी मारले गेले होते.

**◆ वॉशिंग्टन, २६ डिसेंबर**

अमेरिकेच्या वायुदलाने वायव्य नायजेरियात इस्लामिक स्टेट दहशतवादी संघटना अर्थात् इसिसच्या अड्ड्यांना लक्ष्य करीत गुरुवारी रात्री हवाई हल्ला केला. ख्रिश्चन समुदायांवर होणारे हल्ले आणि नुकत्याच अमेरिकन सैन्यांवर झालेल्या गोळीबाराचा सूड घेण्यासाठी हा हल्ला केल्याची माहिती राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शुक्रवारी दिली. हल्ल्यात इसिसचे ५० पेक्षा जास्त दहशतवादी ठार झाले आहेत.

समाज माध्यमावर केलेल्या पोस्टमध्ये ट्रम्प यांनी म्हटले की, मानवतेसाठी धोकादायक असलेल्या इसिसचा नायनाट करण्याच्या मोहिमेचा भाग म्हणून अमेरिकन वायुदलाने गुरुवारी रात्री नायजेरियाच्या वायव्य भागात इसिसच्या अड्ड्यांवर हल्ले केले. ही कारवाई अतिशय गोपनीय पद्धतीने करण्यात आली. नायजेरियाच्या लष्कराला याची माहिती देण्यात आलेली नव्हती. हा हल्ला ख्रिश्चन नागरिकांना क्रूरपणे मारणाऱ्या दहशतवाद्यांवर करण्यात आला. मागील आठवड्यात अमेरिकन सैन्यावर इसिसने हल्ला केला होता, त्याचा सूड घेण्यासाठी योजनाबद्ध कारवाई करण्यात आली. निष्पाप ख्रिश्चनांना लक्ष्य करून त्यांची निर्दयीपणे हत्या करण्याचा प्रकार वर्षानुवर्षांपासून सुरू आहे. त्यामुळे इसिसला धडा शिकवणे गरजेचे होते. (वृत्तसंस्था)

### नरसंहार थांबवावा अन्यथा अस्तित्व नष्ट करू



**ख्रिश्चन समुदायांवर हल्ले करणे आणि या भागात नरसंहार घडविणे इसिसने थांबवावे अन्यथा त्यांचे अस्तित्व जगात राहणार नाही. मी या दहशतवाद्यांना आधीच इशारा दिला होता की जर त्यांनी ख्रिश्चनांवरील हल्ले थांबवली नाही तर त्यांना त्याचे परिणाम भोगावे लागतील आणि गुरुवारी रात्री आमच्या जवानांनी त्यांच्या अड्डे उद्ध्वस्त केले.**

- **डोनाल्ड ट्रम्प** । राष्ट्राध्यक्ष, अमेरिका

# पुण्याचे माजी महापौर, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप काँग्रेसमध्ये

**मुंबई, दि.२६ डिसेंबर-**



पुण्याचे माजी महापौर व शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी शुक्रवारी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. प्रदेश कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमाला प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, विधानसभेतील गटनेते विजय वडेट्टीवार प्रमुख उपस्थितीत होते. यावेळी पुण्यातील राष्ट्रवादीच्या अनेक पदाधिकाऱ्यानीही काँग्रेसमध्ये प्रवेश केला.

पुणे महापालिका निवडणुकीत दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येत असल्याने जगताप यांनी पक्षाचा राजीनामा दिला होता. त्यांना दोन्ही शिवसेनेसह पक्षांचे आमंत्रण असतानाही त्यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश करणे पसंद केले. वैचारिक भूमिकेतून त्यांनी घेतलेला हा निर्णय काँग्रेसला बळ देणारा असल्याचे सांगून प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांनी यावेळी सांगितले.आगामी महापालिका निवडणुकीसाठी 'काँग्रेस लढणार, महाराष्ट्र जिंकणार', या टॅगलाईनचे व टिझरचे प्रकाशन करण्यात आले. प्रशांत जगताप म्हणाले की, काँग्रेस पक्ष आहे १३५ वर्षांचा जुना पक्ष असून अथांग महासागर आहे कितीही वादळे आली तरी तो हिमालयासारखा खंबीरपणे उभा आहे. पुरोगामी विचाराचा मी कार्यकर्ता असून शिव शाहू फुले आंबेडकर, गांधी व नेहरु विचार पुढे घेऊन जाण्यासाठी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. माझी लढाई जातीवादी व भ्रष्टाचाराविरोधात आहे. आणि आज भाजपाला फक्त काँग्रेस पक्षच टक्कर देऊ शकतो. प्रदेशाध्यक्ष सपकाळ म्हणाले की, शिव, शाहू, फुले, आंबेडकरांची विचारधारा व काँग्रेस पक्ष या एका नाण्याच्या दोन बाजू आहेत. राजकीय पक्ष हे विचारधारेवर काम करत असतात आणि काँग्रेस पक्ष ही वैचारिक लढाई निष्ठेने व निकराने लढत आहे.

# नेताजींचे अवशेष भारतात आणण्याची मागणी

## पणतू चंद्र कुमार यांचे राष्ट्रपती मुर्मूंना पत्र

**◆ नवी दिल्ली, २६ डिसेंबर**

नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे पणतू चंद्र कुमार बोस यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना पत्र लिहून नेताजींचे अवशेष भारतात परत आणण्याची विनंती केली आहे. नेताजींचे अवशेष जपानमधील रेनकोजी मंदिरात ठेवण्यात आले आहेत. बोस यांनी यापूर्वी अनेकदा केंद्राला याबाबत पत्रव्यवहार केला आहे. निदान राष्ट्रपती मुर्मू यासाठी काहीतरी ठोस करतील, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

चंद्र कुमार बोस यांनी आपल्या पत्रात लिहिले आहे, महोदय, शरतचंद्र बोस आणि नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या कुटुंबातील सदस्य या नात्याने मी आपल्याला हे पत्र लिहीत आहे. भारताच्या आजच्या आणि भावी पिढ्यांसाठी नेताजींची वारसा अधिक स्मरणीय व्हावा, यासाठी एक प्रस्ताव आपल्यासमोर मांडू इच्छितो. मला समजले आहे की ब्रिटिश साम्राज्यवादाविरुद्ध शेवटपर्यंत लढा देणाऱ्या सैनिकांना सन्मान देण्यासाठी आणि नेताजींच्या 'चलो दिल्ली' या ऐतिहासिक घोषणेची आठवण जपण्यासाठी दिल्लीत योग्य ठिकाणी इंडियन नॅशनल आर्मीचे (आयएनए) स्मारक उभारण्याची योजना आहे. तसेच, नेताजींचे अवशेष आजही जपानमधील टोकियो येथील रेनकोजी मंदिरात ठेवले असल्याची माहिती आपल्याला आहेच. गेल्या अनेक दशकांपासून आयएनएचे माजी सैनिक, नेताजींची कन्या प्रा. अनिता बोस-फाफ तसेच त्यांच्या कुटुंबातील सदस्यांनी भारत सरकारकडे नेताजींचे अवशेष त्यांच्या मातृभूमीत परत आणण्याची मागणी वारंवार केली आहे. या विषयाकडे सकारात्मक दृष्टीने पाहावे, अशी आम्ही आपल्याला विनंती करतो. (वृत्तसंस्था)

### कोण आहेत चंद्र कुमार बोस?



चंद्र कुमार बोस हे 'द ओपन प्लॅटफॉर्म फॉर नेताजी'चे संयोजक आहेत. त्यांचे वडील आरामबाग मतदारसंघातून खासदार होते. त्यामुळे त्यांचा राजकारणाशी जुना संबंध आहे. चंद्र कुमार यांनी लंडनमधील हेंड्रिक्स कॉलेजमधून अर्थशास्त्राची पदवी घेतल्यानंतर कोलकाता आयआयएममधून उच्च शिक्षण पूर्ण केले. त्यांनी टाटा समूहात सुमारे १८ वर्षे काम केले आणि त्यानंतर स्वतःची आयटी व कन्सल्टन्सी कंपनी सुरू केली. २०१६ मध्ये ते भाजपमध्ये सहभागी झाले होते. २०१६ मध्ये भवानीपूर आणि २०१९ मध्ये कोलकाता दक्षिण लोकसभा मतदारसंघातून त्यांनी निवडणूक लढवली, मात्र दोन्ही वेळा पराभव पत्करावा लागला. अखेर २०२३ मध्ये वैचारिक मतभेदांचे कारण देत त्यांनी पक्षातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला.

# हिंदूंच्या छळाविरोधात नेपाळमध्ये संताप

## • जनकपूरधाम येथे हजारो नागरिकांचे आंदोलन • दीपूचंद्रच्या मारेकऱ्यांना फाशी देण्याची मागणी

**◆ काठमांडू, २६ डिसेंबर**

बांगलादेशातील हिंदू अल्पसंख्यकांवर होणाऱ्या अत्याचाराविरुद्ध नेपाळमधील जनकपूरधाम येथे मोठ्या संख्येने लोक रस्त्यावर उतरले आणि त्यांनी हिंदूंच्या रक्षणासाठी ठोस पावले उचलण्याची, तसेच हिंदू तरुण दीपूचंद्र दासला जिवंत जाळणाऱ्या आरोपींना फाशी देण्याची मागणी केली.

जनकपूर शहरातील जानकी मंदिर संकुलापासून सुरू झालेल्या या मोर्चा नेपाळमधीव हिंदू समुदाय मोठ्या संख्येने सहभागी झाला होता. रामानंदीय वैष्णव संघाने हा निषेध मोर्चा आयोजित केला होता. जानकी मंदिराचे उत्तराधिकारी महंत राम रोशन दास म्हणाले की, एका हिंसक जमावाने दलित हिंदू दीपूचंद्र दासची निर्घृण हत्या केली. त्यांनी त्याला झाडावर उलटे टांगून जाळले. हा प्रकार मानवतेला काळीमा फासणारा आहे. हिंदू समुदाय, संत आणि तरुण या अत्याचारांचा निषेध करण्यासाठी रस्त्यावर उतरले. मी नेपाळ सरकारकडे बांगलादेशवर शक्य तितका दबाव आणण्याची मागणी केली आहे. ही घटना अमानवीय आणि धर्माच्या नावाखाली मानवतेविरुद्धचा गुन्हा आहे. १९४७ पासूनच्या राजकीय घटनांपासून बांगलादेशातील हिंदू लोकसंख्येला खूप त्रास सहन करावा लागत आहे. (वृत्तसंस्था)

### संयुक्त राष्ट्राने दखल घ्यावी : विनोद बन्सल



पश्चिम बंगालच्या कोलकाता येथे बांगलादेशातील हिंदूंच्या रक्षणाच्या मागणीसाठी काढण्यात आलेल्या मोर्चाविळी विश्व हिंदू परिषदेचे प्रवक्ते विनोद बन्सल म्हणाले, हिंसाचार जगासाठी एक मोठा धोक्याचा इशारा आहे आणि संयुक्त राष्ट्रांनी त्वरित या समस्येवर लक्ष द्यायला हवे. भारतातील परिस्थितीवर नेहमीच बोट ठेवणारी आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संघटना बांगलादेशातील हिंसाचारावर मौन बाळगून आहे.

### आश्रमशाळेत १६ वर्षीय विद्यार्थिनीची आत्महत्या

**◆ ठाणे, २६ डिसेंबर**

ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यात एका सरकारी आश्रम (निवासी) शाळेत १६ वर्षीय विद्यार्थिनीने आत्महत्या केल्याची घटना घडली आहे, असे पोलिसांनी सांगितले आहे.

दहाव्या वर्गात शिकणारी ही विद्यार्थिनी गुरुवारी सकाळी मोरोशी गावातील शाळेच्या वसतिगृहातील तिच्या खोलीत गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळली. मात्र, तिने हे टोकाचे पाऊल का उचलले याचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. काही पालकांनी शाळेतील कठोर शिस्तीबद्दल तक्रार केली होती. (वृत्तसंस्था)

# १८ वर्षीय ग्राफिक्स डिझायनरला अटक

**◆ इंदूर, २६ डिसेंबर**

कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे (एआय) आपली नोकरी गेल्याचा दावा करणाऱ्या एका १८ वर्षीय ग्राफिक डिझायनरला व त्याच्या डॉक्टर होण्याची आकांक्षा असलेल्या मैत्रिणीला १६ लाख रुपयांचे दागिने चोरल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली आहे. या तरुण-तरुणीने २००५ सालच्या बंटी और बबली चित्रपटापासून प्रेरणा घेतल्याचे पोलिसांना सांगितले, असे पोलिस उपायुक्त (डीसीपी) श्रीकृष्ण लालचंदानी यांनी गुरुवारी सांगितले.

या दोघांनी २२ डिसेंबरच्या रात्री इंदूरच्या राऊ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एका दुकानातून १६.१७ लाख रुपयांचे सोने, चांदी आणि हिऱ्यांचे दागिने चोरल्याचा आरोप आहे. भोपाळमध्ये अटक केल्यानंतर त्यांच्या ताब्यातून चोरीचा सर्व माल जप्त करण्यात आला.हे दोघेही १८ वर्षांचे आहेत. तरुण ग्राफिक डिझायनर आहे, तर तरुणी 'नीट 'ची (राष्ट्रीय पात्रता-सह-प्रवेश परीक्षा) तयारी करत आहे. हे दोघे लहानपणापासून एकमेकांना ओळखतात. तरुण एका आयटी कंपनीत अर्धवेळ ग्राफिक डिझायनर म्हणून काम करत होता, परंतु कंपनीने कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान स्वीकारल्यामुळे त्याची नोकरी गेली व त्याला घरखर्च चालवणे कठीण जात होते. आर्थिकदृष्ट्या दुर्बळ परिस्थितीतून आलेल्या या आरोपींनी बंटी और बबली चित्रपट पाहून चोरीचा कट रचल्याचा दावा केला, असे त्यांनी सांगितले.

आरोपींनी चोरीचे दागिने विकण्याचा प्रयत्न केला, परंतु संभाव्य खरेदीदार त्यांना लहान मुले समजून योग्य किंमत देत नव्हते. त्यामुळे त्यांनी नाताळच्या सुटीनंतर ते विकण्याचा निर्णय घेतला होता, असे ते म्हणाले. (वृत्तसंस्था)



'वीर बाल दिवस'निमित्त लखनौ येथे शुक्रवारी कीर्तन संगमचे आयोजन करण्यात आले होते. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ या कार्यक्रमात सहभागी झाले होते.

# भारत तयार करतोय ब्रह्मोसचे नवे व्हर्जन

## थेट दिल्लीतूनच इस्लामाबादला लक्ष्य करता येणार

**◆ नवी दिल्ली, २६ डिसेंबर**

ऑपरेशन सिंदूरदरम्यान पाकिस्तानचे सहा हवाई तळ उद्ध्वस्त करून आंतरराष्ट्रीय स्तरावर चर्चेत आलेले भारताचे सुपरसोनिक ब्रह्मोस क्रूझ क्षेपणास्त्र आता आणखी शक्तिशाली होणार आहे. संरक्षण सूत्रांनुसार, ब्रह्मोसची रेंज (पल्ला), वेग आणि मारक क्षमता आणखी सुधारली जात आहे.


सध्या याची रेंज (पल्ला) सुमारे ३०० किलोमीटर आहे, परंतु नवीन आवृत्तीमध्ये ती ४५० किलोमीटरपासून ८०० किलोमीटरपर्यंत वाढवण्यावर काम सुरू आहे. या नवीन क्षेपणास्त्रांच्या आगमनानंतर दिल्लीतूनच पाकिस्तानची राजधानी इस्लामाबादला लक्ष्य करता येईल. दिल्ली आणि इस्लामाबादमधील हवाई अंतर ७०० किलोमीटर आहे.

त्याचबरोबर, ब्रह्मोसची हलकी आवृत्ती देखील तयार केली जात आहे. ब्रह्मोसची सुमारे अडीच टन वजनाची खास आवृत्ती सुखोई एमकेआय-३० लढाऊ विमानाखाली (अंडरबेली) बसवण्यासाठी तयार करण्यात आली आहे. ही आवृत्ती आता प्रोजेक्ट डिझाइन बोर्डाच्या मंजुरीनंतर पुढील टप्प्यात पोहोचली आहे.

सध्या अधिक पल्ल्याच्या ब्रह्मोस क्षेपणास्त्राच्या जमिनीवरील चाचण्यांची तयारी सुरू आहे. या नवीन आवृत्ती पुढील तीन वर्षांत पूर्णपणे विकसित होण्याची अपेक्षा आहे. जर सर्व काही ठरलेल्या योजनेनुसार झाले, तर ब्रह्मोसच्या या नवीन आवृत्तीची पहिली चाचणी २०२७ च्या अखेरीस केली जाऊ शकते. (वृत्तसंस्था)


## चित्रपट वार्ता

### हजार कोटींच्या क्लबमध्ये 'धुरंधर'




**मुंबई** : रणवीरसिंहचा चित्रपट 'धुरंधर' प्रदर्शनाच्या २१ दिवसांनंतरही बॉक्स ऑफिसवर कमाल करत आहे. चित्रपटाने कमाईच्या बाबतीत आपली मजबूत पकड कायम ठेवली आहे. 'धुरंधर'ने जगभरात १००० कोटी रुपयांचा टप्पा ओलांडला आहे. असे करणारा 'धुरंधर' नववा भारतीय चित्रपट ठरला आहे. चित्रपटाने जगभरात १००६.७० कोटी रुपयांचा व्यवसाय केला आहे, तर भारतीय बॉक्स ऑफिसवर हा आकडा ६६८.८० कोटींपर्यंत पोहोचला आहे. सोबतच तो तिसऱ्या आठवड्यात सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट बनला आहे. चौथ्या आठवड्यातही हाच चित्रपट लोकांच्या पसंतीच्या यादीत पहिल्या स्थानावर राहील, असे समीक्षकांचे म्हणणे आहे.

### आहार, विहार, व्यायामात आहे अनिल कपूरच्या आरोग्याचे रहस्य



**मुंबई** : गेल्या पाच दशकांहून अधिक काळ हिंदी चित्रपटसृष्टीत तितक्याच जोशात वावरणारे अनिल कपूर त्यांच्या बरोबरीच्या सर्व कलाकारांमध्ये सर्वाधिक फिट आहेत. आजही त्यांची ऊर्जा तरुण कलाकारांना लाजवणारी आहे. त्यांच्या या फिटनेसचे रहस्य आरोग्यपूर्ण जीवनशैलीत आहे. सकाळी सहा वाजता त्यांच्या दिवसाची सुरुवात व्यायामाने होते. त्यात कार्डिओ, वेट ट्रेनिंग आणि फंक्शनल ट्रेनिंगचा समावेश असतो. ते कधीही आपली व्यायाची वेळ चुकवत नाहीत. रिकाम्या पोटी पाणी पिऊन ते दिवसाच्या खानपानाची सुरुवात करतात. त्यांच्या नाश्त्यामध्ये सँडविच, स्मूदी, ओट्स आणि मोड आलेल्या कडधान्यांचा समावेश असतो. दुपारच्या जेवणात ते अतिशय हलका पण पौष्टिक आहार घेतात. ज्यात वाफवलेली ब्रोकोली, सेलेरी आणि सॅलेडचा समावेश असतो. अन्न केवळ जिभेच्या चवीसाठी नसावे तर ते तुमच्या शरीराची शक्ती आणि सहनशक्ती वाढविणारे असावे, असे ६९ वर्षीय अनिल कपूर सांगतात.

### अजिंक्यने मुलीसाठी उभारली शाळा



**मुंबई** : मराठी अभिनेता अजिंक्य देव आपल्या अभिनयामुळे आणि एकूणच प्रभावी व्यक्तिमत्वामुळे अनेकांचे आवडते आहेत. सध्या ते वेगळ्याच कारणाने चर्चेत आहेत. अजिंक्य देव यांचा एक व्हिडीओ व्हायरल झाला असून त्यात ते आपल्या मुलीची विशेष काळजी घेताना दिसत आहेत. अजिंक्य यांची मुलगी तनया 'स्पेशल चाईल्ड' आहे. त्यांनी तिच्यासाठी वेगळी शाळा देखील उभारली आहे. आता त्या शाळेत अनेक मुलं शिकत आहेत. ॲकेडमी ऑफ लर्निंग ॲण्ड डेव्हलपमेंट असे या शाळेचे नाव असून ही शाळा आता यातील मुलांसाठी घरासारखी झाली आहे. याविषयी अजिंक्यने सांगितले की, मी आणि माझी पत्नी जे काही करतोय ते मुलीसाठी करतोय. त्याचसोबत समाजातील जितक्या मुलांना मदत होतेय ते आमचे भाग्य आहे. येथील सर्व मुले माझीच आहेत, असे समजूनच आम्ही सगळे काम करतो. आम्ही भाग्यवान आहोत की, देवाने आम्हाला अशी मुलगी दिली जिने शिकवले की तिच्यासारख्या अनेकांना आमची गरज आहे.

# भारताला जखमा देणाऱ्या अन् धक्कादायक घटना



आणि २०२६ हे नवीन वर्ष सुरू होईल. २०२५ या वर्षाने भारताला अनेक जखमा दिल्या. या वर्षी देशाच्या विविध भागात असंख्य अपघात झाले, ज्यामुळे शेकडो कुटुंबांचे जीवन उद्ध्वस्त झाले. यावर्षी अनेक

### एअर इंडिया विमान अपघात

१२ जून रोजी दुपारी
सोलापूर ३१.१ १४.६
बोईंग ७८७ ड्रीमलाइनर विमान कोसळले.



टेकऑफ झाल्यानंतर एका मिनिटापेक्षा कमी वेळात, एअर इंडियाचे विमान, ज्यामध्ये १२ क्रू मेंबर्ससह २४२ लोक होते, ते कोसळले. त्यापैकी २४१ प्रवासी मृत्युमुखी पडले. ज्या मेडिकल कॉलेजमध्ये विमान कोसळले, तिथे २९ जणांचा मृत्यू झाला. १२ क्रू मेंबर्ससह २४२ जणांपैकी एक प्रवासी वाचला. या अपघातात गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रूपाणी यांनाही प्राण गमवावे लागले.

### दिल्ली रेल्वे स्थानकावर चेंगराचेंगरी

१५ फेब्रुवारी रोजी महाकुंभाला जाणाऱ्या गाड्यांना उशीर झाल्यामुळे नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर चेंगराचेंगरी झाली. या अपघातात १४ महिला आणि ३ मुलांसह १८ जणांचा मृत्यू झाला. २५ हून अधिक जण जखमी झाले.

### आयपीएल चेंगराचेंगरी

४ जून रोजी आरसीबीच्या विजयाचा आनंद घातक ठरला. आरसीबीचा पहिला आयपीएल जेतेपदाचा उत्सव शोकात बदलला. विजेत्यांचे स्वागत करण्यासाठी चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर गर्दी जमली होती, ज्यामुळे चेंगराचेंगरी झाली आणि त्यात ११ जणांचा मृत्यू झाला आणि ३३ जण जखमी झाले.





### गोव्यात आग

६ डिसेंबर रोजी गोव्यात एका नाईट क्लबमध्ये आग लागली, ज्यामध्ये २५ जणांचा मृत्यू झाला आणि ५० हून अधिक जण जखमी झाले. नाईट क्लबमध्ये सिलिंडरच्या स्फोटामुळे मोठी आग लागली. या भयानक घटनेने लोक घाबरले.



### महाकुंभ चेंगराचेंगरी, प्रयागराज

प्रयागराजच्या संगम किनाऱ्यावर महाकुंभादरम्यान अमृत स्नानापूर्वी चेंगराचेंगरी झाली. स्नानापूर्वी संगम नाक्यावर मध्यरात्रीनंतर ही चेंगराचेंगरी झाली. चेंगराचेंगरीत ३० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आणि ३६ जण जखमी झाले. महाकुंभच्या भव्य आयोजनाला या घटनेमुळे अपघाताचे गालबोट लागले.



### थलपती विजयच्या रॅलीत भीषण चेंगराचेंगरी

तामिळनाडूचे अभिनेता आणि राजकारणात सक्रीय झालेल्या विजय थलपती यांच्या करूर येथील रॅलीमध्ये मोठी चेंगराचेंगरी झाली. विजय थलपतीची करूर येथे एक मोठी सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेला लाखो लोक जमा झाले होते. प्रमाणापेक्षा जास्त लोक जमा झाल्याने या गर्दी अनियंत्रित झाली. त्यानंतर चेंगराचेंगरी सुरू झाली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### मानसिक छळ केल्याप्रकरणी पतीसह पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २६ डिसेंबर-**

जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात एका विवाहित महिलेचा मानसिक छळ केल्याप्रकरणी पतीसह सासरच्या पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी प्रतिक्षा अमरदिप मगर (वय ३१), रा. हनुमान नगर, भवानी पेठ, सोलापूर यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दि. २९ जून २०२४ पासून आजतागायत सासरी धाराशिव येथे वास्तव्यास असताना आरोपींनी त्यांचा मानसिक छळ केल्याचा आरोप फिर्यादिने केला आहे. यावेळी आरोपी पती अमरदिप मगर, सासरे हरिश्चंद्र मगर, सासू लता मगर, दीर अजित मगर व अभिजीत मगर यांनी फिर्यादीस अपमानास्पद बोलणे, घालून पाडून बोलणे तसेच माहेरून मेडिकल दुकानासाठी भांडवल म्हणून पैसे आणण्याची मागणी करून, पैसे न आणल्यास नांदवणार नाही अशी धमकी देत जाचहाट केल्याचा आरोप तक्रारीत केला आहे. हा गुन्हा दि. २६ डिसेंबर रोजी दुपारी १.५८ वाजता दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक बामणे करीत आहेत.

### मतदान केंद्रनिहाय मतदार याद्या प्रसिद्धीसाठी ३ जानेवारीपर्यंत मुदतवाढ

**मुंबई, दि. २६ डिसेंबर:**

राज्यातील महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने मतदान केंद्रनिहाय मतदार यादी जाहीर करण्याबाबत आठवडाभराची मुदत वाढ राज्य निवडणूक आयोगाने दिली आहे. शुक्रवारी सुधारित केलेल्या जाहीर कार्यक्रमानुसार मतदान केंद्रनिहाय याद्या प्रसिद्ध करण्यासाठी ३ जानेवारीपर्यंत तारीख निश्चित केली आहे. आयोगाने राज्यातील सर्व महानगरपालिकांना दिलेल्या सुचनेनूसार, दुबार मतदार व मतदान केंद्रनिहाय मतदार यादीचे कंट्रोल चार्ट संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यासाठी २७ डिसेंबरपर्यंत मुदत दिली आहे. तर, मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिद्ध करण्यासाठी ३ जानेवारी २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. महानगरपालिका निहाय संपूर्ण मतदारयादी जसजशी पूर्ण होईल तसतशी प्रसिद्ध करावी, असेही आदेशात नमूद केले आहे. यापूर्वी माननीय राज्य निवडणूक आयोगाने मतदान केंद्रनिहाय याद्या प्रसिद्ध करण्यासाठी २७ डिसेंबर ही तारीख निश्चित केली होती.

### कुर्डवाडीतील छत्रपती नगर येथे चोरी; चोरटे सीसीटीव्ही मध्ये कैद

**कुर्डुवाडी, दि. २६ डिसेंबर-**





टेंभुर्णी रोड येथील छत्रपती नगर येथे बंद घराचे की लॉक कटावणीने उचकटून रोख पंधरा हजार व चांदीच्या मूर्त्या अज्ञात चार चोरट्यांनी लंपास केल्या. ही घटना २६ डिसेंबर रोजी पहाटे १.१६ ते १.३३ दरम्यान अवघ्या १७ मिनिटात घडली आहे. ही चोरीची घटना सीसीटीव्ही मध्ये कैद झाली असून पोलिसांत गुन्हा नोंद करण्याचे काम उशीरापर्यंत सुरु होते. याबाबत मिळालेली माहिती अशी येथील छत्रपरी नगर टेंभुर्णी रोड येथील सुधीर निकम हे आपल्या परिवारासह २५ डिसेंबर रोजी रात्री १० वा. पंढरपुर येथे एका कार्यक्रमानिमित्त गेले होते. २६ डिसेंबर रोजी पहाटे ३ वाजता परत आले. दरम्यान रात्री १ वा १६ मि.दरम्यान तोंडाला बांधून चार चोरटे निकम यांच्या घराकडे गेले. घरात कोणी नसल्याचा अंदाज येताच त्यांनी दरवाजावरील बल्ब काढून दोघाजणांनी कटावणीच्या सहाय्याने की लॉक तोडून घरात प्रवेश केला. लोखंडी कपाटातील सामान अस्ताव्यस्त फेकून देत कपाटातील लॉकर वाकवून कपाटातील रोख रक्कम व देव्हाऱ्यातील दोन चांदीच्या मूर्त्या या चोरट्यांनी चोरून नेल्या. ही घटना सीसीटीव्ही मध्ये कैद झाली आहे. यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# मुंबईत शरद पवार गट ठाकरे बंधूसोबत?

### जयंत पाटील यांची 'मातोश्री'वर चर्चा





**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २६ डिसेंबर:**

बृहन्मुंबई महापालिकेच्या निवडणुक ठाकरे बंधूंनी एकत्र आल्याने काँग्रेसने स्वबळाचा नारा दिला आहे. तर शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची भूमिका अद्याप अनिश्चित असताना त्यांच्या प्रमुख नेत्यांनी शुक्रवारी थेट मातोश्री गाठत उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा केली. मुंबईत त्यांनी २५ जागांची मागणी केली असल्याची माहिती सूत्रांकडून सांगण्यात आले.

राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील, मुंबईच्या अध्यक्षा राखी जाधव यांनी ठाकरेंची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली.

महापालिका निवडणुकीसाठी जिथे जिथे भाजप आणि शिवसेना शिंदे गटासोबत युती होणार नाही, तिथे -तिथे राष्ट्रवादी अजित पवार गट राष्ट्रवादी शरद पवार गटासोबत युती करण्याच्या तयारीत आहे, याच पार्श्वभूमीवर दोन्ही राष्ट्रवादीच्या विलनिकरणाची देखील चर्चा सुरू झाली आहे. दरम्यान आगामी महापालिका निवडणुकीसाठी दोन्ही राष्ट्रवादीत जागा वाटपासंदर्भात बैठकांचं सत्र सुरू असून गुरुवारी रोहित पवार, अमोल कोल्हे आणि अजित पवार यांची बैठक झाली, तर आज अंकुश काकडे आणि बापूसाहेब पठारे यांनी देखील उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली आहे. जागा वाटपासंदर्भात चर्चा सुरू आहे. जयंत पाटील हे शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेण्यासाठी थेट मातोश्रीवर जाऊन जवळपास दोन तास चर्चा झाली. राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून उद्धव ठाकरे यांना मुंबई महापालिकेसाठी २५ जागांचा प्रस्ताव दिल्याची माहिती समोर आहे. दरम्यान या भेटीनंतर जयंत पाटील यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला आहे. आमची चर्चा सुरू आहे, मी शिवसेना ठाकरे गटासोबत युतीच्या चर्चेसाठीच आलो होतो. आमची चर्चा झाली मात्र आम्ही अजून निष्कर्षापर्यंत पोहोचलो नाहीत. आम्ही महाविकास आघाडीमधील घटक आहोत, म्हणून मुंबईमध्ये शिवसेनेसोबत आघाडी व्हावी असा आमचा प्रयत्न आहे. खरं म्हणजे मुंबई महापालिकेची निवडणूक काँग्रेस, शिवसेना ठाकरे गट आणि राष्ट्रवादी शरद पवार गट महाविकास आघाडी म्हणून लढवावी, असे आम्हाला वाटत होते. परंतु आमची तेवढी ताकद मुंबईमध्ये नाहीये, मुंबईमध्ये काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गट हे दोन मोठे पक्ष आहेत. त्यामुळे आमची जागा वाटपासंदर्भात शिवसेना ठाकरे गटासोबत चर्चा सुरू आहे. चर्चा सकारात्मक झाली असल्याचे त्यांनी सांगितले.

# श्री सिध्देश्वर महायात्रा : व्यापक कृती आराखडा तयार

### आपत्ती व्यवस्थापन कायदा२००५ अंतर्गत आयुक्तांचा निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ डिसेंबर -**



सोलापूर : श्री सिद्धेश्वर महायात्रा२०२६ शांततेत, सुरक्षिततेने व शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने व्यापक पूर्वतयारी व कृती आराखडा तयार करण्यास सुरुवात करण्यात आली आहे. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आपत्ती व्यवस्थापन कायदा२००५ अंतर्गत या महायात्रेसाठी घटना कमांडर (इन्सिडेंट कमांडर)म्हणून नियुक्ती केली आहे.महापालिकेतील उच्चस्तरीय समन्वय बैठकीत सर्व यंत्रणांना जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या.

या अनुषंगाने आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या अध्यक्षतेखाली महापालिकेतील इंद्रभुवन येथे उच्चस्तरीय समन्वय बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त वीणा पवार, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे,सिद्धेश्वर देवस्थानचे अध्यक्ष धर्मराज काडादी,नगर अभियंता सारिका आकूलवार,महावितरण कार्यकारी अभियंता राजकुमार पाटील, अतिरिक्त कार्यकारी अभियंता हेमंत माळपोरे, संदीप कोंडगुळे,आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने, कार्यकारी अभियंता विद्युत राजेश परदेशी, अतिक्रमण विभाग नियंत्रण अधिकारी तपंन डंके, मुख्य अग्निशामक अधिकारी राकेश साळुंखे, सह.अभियंता विभागीय कार्यालय प्रकाश सावंत, अन्न व औषध प्रशासन अधिकारी पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त वाहतूक सुधीर खिराडकर, शाखा अभियंता एम. एस. पवार, विश्वस्त रतन रिक्के, बाळासाहेब भोगडे, प्रकाश बिराजदार, सुरेश म्हेत्रे कुंभार,कार्यकारी अभियंता अजयकुमार भोसले, वैद्यकीय अधिकारी सिव्हिल हॉस्पिटल डॉ.धनंजय गायकवाड, डीएमएमएस जिल्हाधिकारी कार्यालय अर्चना बिशोई,बीएसएनएलचे शेखर मळगे उपस्थित होते.

आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी बैठकीत सांगितले की, ''महापालिका सार्वत्रिक निवडणुकीची प्रक्रिया सुरू असतानाही श्री सिद्धेश्वर महायात्रा२०२६ शांततेत, सुरक्षिततेने व भाविकांच्या सोयीसाठी पार पाडण्याला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येणार आहे. सर्व यंत्रणांनी परस्पर समन्वयाने जबाबदाऱ्या पार पाडाव्यात.''

श्री सिद्धेश्वर महायात्रा२०२६ यशस्वी करण्यासाठी सर्व विभागांनी नियोजनबद्ध व वेळेत कामे पूर्ण करावीत, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

#### बैठकीतील प्रमुख निर्णय, देवस्थान, यात्रा समितीची जबाबदारी

यात्रा कालावधीत तसेच अक्षता सोहळ्याच्या दिवशी स्थानिक वृत्तवाहिन्यांवर थेट प्रक्षेपणाची व्यवस्था करण्यात येणार आहे. यात्राकाळात एलईडी स्क्रीन उभारणे, सर्व ठिकाणी सीसीटीव्ही यंत्रणा बसवणे, स्वतंत्र कंट्रोल रूम उभारणे, वाहनतळ (पार्किंग) व्यवस्था करणे तसेच सर्व स्टॉलमध्ये अग्निप्रतिबंधक यंत्रणा ठेवणे बंधनकारक करण्यात येणार आहे. देवस्थानच्या वतीने सगळीकडे मॅटिंग करणे व त्या ठिकाणी सुरक्षा रक्षक नेमणे त्याचबरोबर यात्रेच्या काळात सर्व ठिकाणी सीसीटीव्ही लावणे. यात्रेच्या काळामध्ये तलावाच्या बाजूला बॅरिगेटीग करणे व सुरक्षारक्षक नेमणे,मनोरंजन नगरी येथील पाळणे उभे करण्यात येणार असून त्या ठिकाणी एक समिती नेमून स्ट्रक्चर स्टॅबिलिटी संपूर्ण माहिती घेणे, त्यासंदर्भातली संपूर्ण माहिती महापालिकेला सादर करण्यात येणार आहे.

#### पोलिस विभागाची जबाबदारी

अक्षता सोहळा व सर्व कार्यक्रमस्थळी गर्दी नियंत्रणासाठी पुरेसा पोलिस बंदोबस्त, समन्वयक अधिकारी (सुपरवायझर) नेमणूक, बॅरिकेड्स लावणे, 'नो पार्किंग झोन' घोषित करणे व आपत्कालीन मार्गांची व्यवस्था करण्याचे निर्देश देण्यात आले.

#### महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

धूळ प्रदूषण रोखण्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी दिवसातून दोन वेळा पाणी मारणे, मॅटिंग व रोलिंग करणे, होम मैदानावर वाळू टाकणे आदी उपाययोजना करण्यात येणार आहेत. यात्रेदरम्यान दररोज तपासणी करून अहवाल मा. जिल्हाधिकारी, श्री सिद्धेश्वर देवस्थान पंचकमिटी व संबंधित कार्यालयास सादर करण्यात येणार आहे. प्रदूषण मर्यादेपेक्षा जास्त आढळल्यास नियमानुसार कारवाई करण्यात येईल. धूळ प्रदूषण मोजण्यासाठी तीन ठिकाणी प्रदूषण मोजणी यंत्र बसवण्यात येणार आहेत.

#### महापालिका प्रशासनाचे कामे अशी

होम मैदान येथे उभारण्यात येणाऱ्या मनोरंजन नगरीसाठी प्रवेश व निर्गमनासाठी स्वतंत्र मार्ग तसेच आपत्कालीन प्रसंगी तात्काळ बाहेर पडण्यासाठी स्वतंत्र आपत्कालीन मार्गाची व्यवस्था करण्यात येणार आहे. परिसराची नियमित स्वच्छता, रोलिंग करणे, धूळ प्रदूषण टाळण्यासाठी दररोज पाणी मारणे, तसेच २४ तास कार्यरत कंट्रोल रूम, आपत्कालीन मदत कक्ष व प्रतिसाद केंद्र उभारण्यात येणार आहे. याठिकाणी रुग्णवाहिका, वैद्यकीय अधिकारी व अग्निशमन दलाची वाहने सज्ज ठेवण्यात येणार आहेत. नंदी ध्वज मिरवणूक मार्गाची स्वच्छता, मार्गावरील झाडांच्या फांद्या, केबल वायर इत्यादी अडथळे दूर करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

#### अन्न व औषध प्रशासन विभाग

यात्राकाळात शहरातील व यात्रेतील सर्व हॉटेल्स व खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्या स्टॉल्सची दररोज तपासणी करण्यात येईल. भेसळयुक्त अन्नपदार्थ विक्री होणार नाही याची खात्री केली जाईल व अन्नविषबाधा होऊ नये यासाठी विशेष दक्षता घेण्यात येईल. सर्व अन्न विक्रेत्यांची पत्ता असलेली यादी देवस्थान व यात्रा समितीमार्फत संबंधित विभागास देण्यात येणार आहे. तात्पुरत्या दुकानांसाठी सुरक्षित अंतराची मर्यादा पाळण्याचे निर्देश देण्यात आले.

# बंडखोरीच्या भीतीने यंदा उमेदवार याद्या उशीराच

## ● भाजपा-शिवसेनेत चर्चेचे गुऱ्हाळ, अजित राष्ट्रवादीची 'एकला चलो'ची भूमिका; 'महाविकास आघाडी'चे जागा वाटप, उमेदवारी सावधगिरीने

**तभा वृत्तसेवा । सोलापूर, दि. २६ डिसेंबर-**

**महायुती मोठ्या जोमात तर महाविकास आघाडी तणावात अशा वातावरणात सध्या महापलिका निवडणुकीचे गुऱ्हाळ सुरु असल्याचे चित्र आहे. महाविकास आघाडीतील काँग्रेस, राष्ट्रवादी, उबाठा या तीनही पक्षांना दररोजचे एकच टेंशन आहे की, आज आपल्या पक्षातून कोण भाजपात गेले याचे होय. महायुती होणार की नाही याची चर्चा सुरु असताना अखेरीस भाजपा आणि शिवसेना शिंदे यांच्यात औपचारिक का होईना पण जागा वाटपाची चर्चा सुरु झाली आहे. तर भाजपाचा स्वबळाचा ७५ पारचा नारा पाहून अजित राष्ट्रवादीने एकला चलो रेची भूमिका स्वीकारली. पण आता पुतण्याला पुन्हा काकाची आठवण झालीय तर नगरपालिका निवडणुकीतील दारुण अपयशानंतर काकांची राष्ट्रवादी देखील पुतण्यासोबत जाण्यासाठी उत्साही दिसत आहे. शिवसेना उबाठाने मनसेला सोबत घेतल्यामुळे काँग्रेसने उबाठाशी असलेला घरोबा मोडला आहे तर काका-पुतण्या एकत्र आल्यास शरद राष्ट्रवादीसोबत न जाण्याचे संकेत उबाठाने दिलेले आहेत. भाजपा आणि शिंदे सेनेचे जागा वाटप फलद्रुप होणार का यावरच युतीचे कोडे सुटणार आहे. दररोज पडणाऱ्या खिंडारामुळे महाविकास आघाडीने जागा वाटपात देखील सावधगिरी बाळगली असून उमेदवार यादीदेखील सजगतेनेचे सुरु आहे. महायुती न झाल्यास शिवसेना व राष्ट्रवादीसह भाजपाला देखील बंडखोरीचा धोका नसणार आहे. पण आता भाजपात दोन्ही देशमुखांनी बंड अस्त्र उगारल्याने पालकमंत्र्यांसह भाजपाची डोकेदुखी वाढणार आहे.**

भाजपाचे धुरंधर पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी भाजपात पक्ष प्रवेश करुन घेण्याचा झंझावात सुरुच ठेवला आहे. आता विरोधकांकडून कोणत्याही पातळीवरील टीका होवो अथवा पक्षातून कोणीही नाराज होवो, पण कोणत्याही परिस्थितीत पक्ष प्रवेश थांबणार नसल्याचे भाजपाने दाखवून दिले आहे. यावरुनच पक्षातील लोकांना देखील कळले पाहिजे की, पक्षप्रवेशाचे धोरण हे आता राष्ट्रीय धोरण झाले आहे. त्यामुळे विरोध करण्यापेक्षा आपल्याला आपल्या कार्यकर्त्यांसाठी किती उमेदवाऱ्या पदरात पाडून घेता येईल याकडे त्यांनी लक्ष देण्याची गरज आहे. परंतु ज्या प्रभागात पक्षाचे उमेदवार निवडून येण्यास सक्षम आहेत, अशा प्रभागातील विरोधकांना पक्षप्रवेश दिल्याने निष्ठावंतांवर अन्याय होणार, ही वस्तुस्थिती सांगत दोन्ही देशमुखांनी पालकमंत्र्यांच्या विरोधात बंडाचे अस्त्र उगारले आहे. पक्ष प्रवेश देताना विश्वासात घेतले जात नसल्याचा रोष भाजपा आमदार देशमुख व्यक्त होत आहे.

महायुतीमधील मित्रपक्ष आणि विरोधकांच्या कोणत्याही पक्षातील कोणीही म्हणजेच जो माजी नगरसेवक होता आणि जो निवडून येण्याच्या निकषात बसतो त्याला प्राधान्याने पक्षप्रवेश देण्याचे धोरण राबविले जात आहे. भाजपाच्या विद्यमान ४९ नगरसेवकांना उमेदवारी मिळेलच.पण शिवसेना आणि राष्ट्रवादीतून भाजपात आलेल्यांना उमेदवारी देणे क्रमप्राप्त ठरणार आहे. कारण भाजपाला त्याशिवाय ७५ पारची घोषणा पूर्ण करता येणार नाही. भाजपातील माजी विद्यमान नगरसेवक आणि मित्रपक्षासह विरोधी पक्षातून भाजपात आलेले माजी विद्यमान नगरसेवक हा आकडा ७५ पार होण्यावर भाजपाचा अधिक भर असणार आहे. परंतु पक्ष प्रवेश करणारे दुसऱ्या पक्षातील नगरसेवक



प्रशांत माने
मो.९८८११९१४४३

पक्षातील नगरसेवकांचे तिकीट कापून उमेदवारी मागणार असतील तर मात्र भाजपाला पक्षांतर्गत रोषाला सामोरे जावे लागण्याची शक्यता दिसू लागली आहे. याबाबत दोन्ही आमदार देशमुख उघड बोलू लागले आहेत तर काहीजण मौन बाळगून नाराजी व्यक्त करीत आहेत.

महापालिकेतील एकूण १०२ जागांपैकी ७५ जागा जिंकल्यास भाजपा महापालिकेत देखील शक्तिमान ठरणार आहे. मग एकदा का पालिकेत एकहाती सत्ता आली की मग महापौर, सभागृहनेता, स्थायी सभापती आदीसह विविध समित्यांवर कोणाची वर्णी लावायची हे ठरवताना भाजपाकडून निष्ठावंतांना प्राधान्य दिले जाण्याची शक्यता अधिक आहे. त्यावेळी इतर पक्षातून आलेल्यांना मात्र राजकीय सहनशक्ती वाढवावी लागणार हे नक्की.

महाराष्ट्रातील महत्वाच्या मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई या महापालिका निवडणुकीसाठी भाजपा आणि शिंदे सेना यांची युती होण्याची दाट शक्यता आहे. तर याठिकाणी राष्ट्रवादीला दूर ठेवल्यामुळे नाराज अजित पवार यांनी काका शरद पवार यांनाच आर्त हाक देत काका मला वाचवाचा नारा दिला आहे. तर नगरपरिषद निवडणुकीतील पराभव लक्षात घेवून शरद पवार राष्ट्रवादी देखील हातात पुन्हा घड्याळ बांधण्यास आतूर झाल्याचे चित्र आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील बहुतांश महापालिकांच्या निवडणुकीमध्ये काका-पुतण्याची राष्ट्रवादी एकत्र लढल्यास नवल वाटायला नको. सोलापूर महापालिकेत देखील दोन्ही राष्ट्रवादी एकत्र लढतील, असे संकेत आहेत. काँग्रेस आणि उबाठा यांना हे मान्य होणार का याची उत्सुकता असणार आहे. पण काँग्रेस आणि उबाठा देखील पक्षफुटीमुळे सध्या बॅकफूटवर आहेत. त्यामुळे शरद राष्ट्रवादी-अजित राष्ट्रवादी-काँग्रेस-उबाठा-मनसे यांची महाविकास झाल्यास आश्चर्य वाटायला नको.

महायुती सध्या तरी राजकीयदृष्ट्या शक्तीमान असली तरी नाराजीनाट्यामुळे निवडणुकीत भाजपा विरुध्द भाजपा असे गोपनीय राजकारण रंग आणण्याची देखील भीती व्यक्त होत आहे. तर राजकीयदृष्ट्या पक्षाची ताकद घसरली असतानाही महाविकास आघाडीतील मित्रपक्षातील मतभेद मिटत नसल्याचे चित्र आहेत. नाराजी नाट्यामुळे महाविकास आघाडीतील पक्षाचे नेते, कार्यकर्ते पक्ष सोडून भाजपा अथवा शिवसेनेत जात असल्याचे चित्र आहे. एकूणच काय तर महापालिका निवडणुकीत सर्वच पक्षांना बंडखोरीचा मोठा धोका असल्याने सर्वच पक्ष उमेदवारी याद्या उशिरानेच जाहीर करण्याची शक्यता आहे. ज्यांची उमेदवारी निश्चित आहे, अशांना पक्षाकडून कामाला लागा आणि उमेदवारी अर्ज भरण्याच्या तयारीत राहण्याच्या सूचना दिल्या जात आहेत. काही झाले तरी यंदा बंडखोरी मात्र अटळ असल्याचे चित्र आहे.

#### 'भाजपा'च्या कार्यकर्त्यांसाठी दोन्ही देशमुखांची आरपारची लढाई

मागील पक्षांतर्गत वादामुळे भाजपाच्या दोन्ही आमदार देशमुखांना मोठी राजकीय किंमत मोजावी लागत आहे. परंतु गेल्या काही महिन्यांपासून दोन्ही देशमुखांनी आपसातील वाद संपुष्टात आणून सख्य जमवले आहे. असे असतानाही पक्षाकडून मात्र सातत्याने दोन्ही देशमुख आमदारांना साईड कॉर्नर करण्यात येत असल्याचे त्यांच्या कार्यकर्त्यांकडून सांगितले जात आहे. पक्षासाठी निष्ठेने कार्य करणाऱ्या आणि महापालिका निवडणुकीत विजयी होण्यासाठी सक्षम असलेल्या कार्यकर्त्यांच्या प्रभागात पालकमंत्र्यांकडून इतर विरोधी पक्षातील लोकांना घेवून त्यांना उमेदवारीचे शब्द दिले जात आहेत. विरोधकांना पक्ष प्रवेश दिला जाताना विश्वासात देखील घेतले जात नाही. त्यामुळे आता भाजपातील आपल्या निष्ठावंतांना न्याय देण्यासाठी पक्षाकडून उमेदवारी मिळो अथवा न मिळो आम्ही त्यांच्यासोबत असून त्यांना कुठूनही निवडून आणू, अशी भूमिका आमदार देशमुख घेत आहेत.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# देशाच्या दीपस्तंभांचे स्मारक...

दिवंगत पंतप्रधान, भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या १०१ व्या जयंतीनिमित्त उत्तरप्रदेशची राजधानी लखनौ येथे राष्ट्र प्रेरणास्थळाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. या प्रेरणास्थळात अटलबिहारी वाजपेयी यांच्यासह जनसंघाचे संस्थापकद्वय डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी आणि पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या ६५ फूट उंचीच्या भव्य अशा प्रतिमा आहेत. राष्ट्रीय सन्मान वाढवणारे स्मारक म्हणून याचा उल्लेख करावा लागेल, ज्याची आज खरोखर देशाला आवश्यकता होती. ज्यांच्यासमोर श्रद्धेने, आदराने झुकावे, नतमस्तक व्हावे, चरणस्पर्श करावा वा ज्यांच्यासमोर साष्टांग दंडवत घालावा, अशी व्यक्तिमत्त्वे आपल्या सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय जीवनातून हळूहळू कमी होत आहेत. त्या पृष्ठभूमीवर या राष्ट्र प्रेरणास्थळाचे निर्माण आणि लोकार्पण उल्लेखनीय म्हणावे लागेल. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी आणि पंडित दीनदयाल उपाध्याय यांचे पुतळे आपल्या देशात फार कमी असतील. राष्ट्रउभारणीत अनन्यसाधारण योगदान देणाऱ्या या दोन नेत्यांची, ते बहुधा जनसंघाचे आणि पर्यायाने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे असल्यामुळे, सर्वार्थाने उपेक्षा झाली. आपल्या देशात सर्वाधिक पुतळे हे राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आहेत. देशाच्या दुर्गम भागातील कोणत्याही छोट्या मोठ्या गावात आपण गेलो तर या दोन्ही महापुरुषांचे पुतळे आपल्याला जागोजागी दिसतात. आपल्या देशाच्या सामाजिक आणि राजकीय जीवनात या दोन्ही महापुरुषांचे योगदान कोणी नाकारणार नाही. त्यामुळे आपल्यासमोर आदर्श म्हणून त्यांचे पुतळे उभारण्यात गैर काही नाही. त्यानंतर आपल्याला पुतळे दिसतात ते नेहरू आणि गांधी घराण्यातील नेत्यांचे. पंडित जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी आणि राजीव गांधी यांचे पुतळेही देशाच्या अनेक भागांत आहेत. त्या तुलनेत जनसंघाच्या वा नंतरच्या भाजपाच्या नेत्यांचे पुतळे देशात दिसत नाहीत. पुतळे हा एकमेव निकष धरला तर जनसंघ आणि भाजपाच्या नेत्यांचे देशाच्या उभारणीत कोणतेही योगदान नव्हते का, असा प्रश्न कोणालाही पडू शकतो. पंडित नेहरूनंतर त्यांच्या कन्या इंदिरा गांधी देशाच्या पंतप्रधान झाल्या आणि त्यानंतर त्यांचे पुत्र राजीव गांधी यांना देशाचे पंतप्रधानपद भूषवण्याची संधी मिळाली. ही घराणेशाहीच होती. इतरांना वावच नव्हता. घराणेशाहीचा शाप आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लागला. मोतीलाल नेहरू काँग्रेस नेते होते. त्यानंतर काँग्रेसचे नेतृत्व जवाहरलाल नेहरू यांच्याकडे आले. नेहरू-गांधी कुटुंबाच्या या घराणेशाहीमुळे देशाचेच नाही तर काँग्रेस पक्षाचेही अपरिमित नुकसान झाले. ते आजही थांबलेले नाही.

राजीव गांधी यांच्यानंतर काँग्रेसचे नेतृत्व सोनिया गांधी यांच्याकडे आले. आता त्यांचे चिरंजीव राहुल गांधी यांच्याकडे काँग्रेसचे नेतृत्व आहे. राहुल गांधी यांनी आपल्या नेतृत्वाच्या काळात काँग्रेसची किती आणि कशी वाट लावली, हे देश रोज अनुभवत आहे. राष्ट्रीय प्रेरणास्थळाचे लोकार्पण करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या घराणेशाहीवर आणि काँग्रेसच्या तुष्टीकरणाच्या धोरणावर हल्ला चढवला. गेली अनेक दशके देशाची सत्ता एकाच कुटुंबाच्या हातात एकवटली होती. या कुटुंबाने संपूर्ण देशाला ओलिस धरले होते, असे जे मोदी यांनी म्हटले, ती फक्त त्यांची भावना नव्हती, तर संपूर्ण देशाच्या मनातील भावना त्यांनी व्यक्त केली असे म्हणावे लागेल. एका विशिष्ट धर्माच्या लोकांच्या तुष्टीकरणासाठी सेक्युलॅरिझम या शब्दाचा चुकीचा अर्थ लावत भलत्याच गोष्टींचा उदोउदो करण्यात आला. सेक्युलॅरिझम म्हणजे धर्मनिरपेक्षता असे लोकांच्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न झाला. कोणताही भेदभाव न करता सर्वांचा सारखा विकास म्हणजे सेक्युलॅरिझम असे मोदी यांनी यावेळी सेक्युलॅरिझमची नव्याने व्याख्या करताना सांगितले. काँग्रेसच्या शासनकाळात गठ्ठा मतांच्या राजकारणासाठी अल्पसंख्यक मुस्लिमांचे तुष्टीकरण करण्यात आले. नाहक लाड करत त्यांना डोक्यावर बसवण्यात आले, तर बहुसंख्यक असलेल्या हिंदूंची उपेक्षा करण्यात आली, त्यांना पायदळी तुडवण्यात आले. काही दिवसांपूर्वी राजधानी दिल्लीत पुस्तक प्रकाशनाच्या एका कार्यक्रमात बोलताना, केंद्रीय भूपृष्ठ परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी सेक्युलॅरिझम म्हणजे धर्मनिरपेक्षता नाही तर सर्वधर्मसमभाव, असा नेमका अर्थ सांगितला होता. सर्वधर्मसमभाव म्हणजे सर्व धर्मांच्या लोकांना सारखी वागणूक देणे, धर्माच्या आधारावर त्यांच्यात भेदभाव न करणे. पण काँग्रेसने आपल्या शासनकाळात नेमके हेच केले, राजकीय स्वार्थासाठी मुस्लिमांचे तुष्टीकरण करत हिंदूंना डावलले. धर्मनिरपेक्षता म्हणजे आम्ही कोणत्याच धर्माला मानत नाही, असा अर्थ काढता येऊ शकतो. जगातील कोणत्याही देशाची ओळख ही त्याच्या धर्माच्या आधारावर होत असते. त्यामुळे धर्माचे महत्त्व आपण नाकारू शकत नाही. मुस्लिमांचे तुष्टीकरण करताना काँग्रेसने त्या धर्माच्या लोकांचा सर्वांगीण विकास केला असेही नाही. तर आपल्या राजकीय स्वार्थासाठी त्या लोकांचा फक्त वापर करून घेतला. आपली राजकीय उद्देशपूर्ती झाल्यावर त्या समाजाला वाऱ्यावरही सोडले. काँग्रेसने केलेल्या तुष्टीकरणातून मुस्लिम धर्मातील लोकांचा फायदा झाला, असे नाही. उलट या धर्मातील लोकांचे नुकसानच झाले. आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय अशा सर्व आघाड्यांवर या धर्मातील लोक अजूनही मागासलेलेच आहेत. यातून देशात हिंदू आणि मुस्लिम अशी कायमस्वरूपी उभी फूट पडली. त्याचा फटका मुस्लिम धर्मातील लोकांनाच बसला. गरीब अधिक गरीब झाला, तर श्रीमंत अधिक श्रीमंत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या विसंगतीकडेच या कार्यक्रमातून लक्ष वेधले. काँग्रेसच्या या भूमिकेमुळे देशातील दलित, शोषित, पीडित, वंचित वर्ग आणखी गरीब झाला, दोनवेळचे पोटभर जेवण करणेही त्याला अशक्य झाले. अर्धपोटी जगण्याची वेळ त्याच्यावर आली. या लोकांच्या सर्वांगीण कल्याणाचा शाश्वत मार्ग पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी आपल्या अंत्योदय या विचारातून दाखवला. समाजातील शेवटच्या माणसाचे कल्याण म्हणजे अंत्योदय. मोदी सरकारची गेल्या अकरा वर्षांतील वाटचाल अंत्योदयाच्या धोरणानुसार चालू आहे. गेल्या अकरा वर्षांच्या कार्यकाळातील मोदी सरकारच्या कल्याणकारी योजनांचा आढावा घेतला तर याची खात्री पटते. लखनौच्या राष्ट्र प्रेरणास्थळातील पंडित दीनदयाल उपाध्याय यांचा पुतळा त्यांच्या अंत्योदयाच्या धोरणाची जाणीव करून देण्यासाठी उभारण्यात आला आहे, असे म्हणायला हरकत नाही.

डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे घटनेतील ३७० कलम रद्द करण्यासाठी सर्वतोपरी आवाज उठवला. 'एक देश में दोन विधान, दोन निशान और दो प्रधान नहीं चलेंगे' म्हणत लढा देणारे डॉ. मुखर्जीच होते. जम्मू-काश्मीरची एकेकाळी वेगळी घटना होती, ध्वज वेगळा होता आणि जम्मू-काश्मीरच्या राजकीय नेतृत्वाला मुख्यमंत्रीच नाही तर पंतप्रधान म्हटले जात होते. जम्मू-काश्मीर आज जे देशाच्या मुख्य प्रवाहात आले आहे, त्याचे श्रेय डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनाच आहे. हे करताना डॉ. मुखर्जी यांना आपल्या प्राणाचे बलिदान करावे लागले. देशाचे पंतप्रधान म्हणून अटलबिहारी वाजपेयी यांचे योगदान अनन्यसाधारण असे आहे. पोखरण येथील अणुचाचण्या त्यांच्याच कार्यकाळात करण्यात आला. खरोखरच या तिन्ही महापुरुषांकडून देशाने प्रेरणा घेण्याची गरज आहे. ज्यांना आदर्श मानावे म्हणून आपले आतापर्यंत ब्रेनवॉशिंग करण्यात आले, त्यातील अनेकांचे योगदान तपासले तर हे तीन अस्सल महापुरुष देशाचे दीपस्तंभ ठरतात. या तिन्ही नेत्यांच्या देशावर असलेल्या उपकाराची कोणत्याच मार्गाने परतफेड करता येणार नाही. फूल ना फुलाची पाकळी म्हणून लखनौत या तिन्ही महापुरुषांचे भव्यदिव्य असे पुतळे उभारण्यात आले, याबद्दल योगी सरकारचे तसेच मोदी सरकारचेही अभिनंदन केले पाहिजे. कारण त्यांनी देशाच्या खऱ्या महानायकांचा देशाला नव्याने परिचय करून दिला. आता मोदी सरकारने डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी आणि पंडित दीनदयाल उपाध्याय यांना मरणोत्तर भारतरत्न देऊन सन्मानित केले पाहिजे.

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# रशीद मामू आणि मराठी मामा?

महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या दोन मोठ्या घडामोडी घडल्या आहेत. छत्रपती संभाजीनगरचे रशीद मामू यांना उद्धव ठाकरे गटाने पक्षात सामावून घेतले आहे. मामू यांच्यावर दंगलीतील सहभागासह गंभीर आरोप आहेत. त्यामुळेच या प्रवेशावरून मोठा वाद निर्माण झाला आहे. चंद्रकांत खैरे यांनी उघडपणे विरोध केला आणि असा प्रवेश झाल्याने हिंदू मतदारांचा मोठा भाग दुरावेल, असा दावा केला. अंबादास दानवे यांनी मात्र हा प्रवेश मातोश्रीवर घडवून आणला आणि खैरे यांना माहिती न देता निर्णय घेतला. यामुळे उबाठा गटात खैरे-दानवे वाद पुन्हा उफाळला.

एकीकडे रशीद मामूसारख्या व्यक्तीला पक्षात सामावून घेण्यामुळे शिवसेनेच्या उबाठा गटात अंतर्गत कलह उफाळून आला आहे, तर दुसरीकडे विरोधकांकडून यावरून उद्धव ठाकरेंवर जोरदार टीका होत आहे. याच पृष्ठभूमीवर, मनसेचे नेते प्रकाश महाजन यांनी मनसेला रामराम ठोकून एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे. या दोन्ही घटना सलग घडल्यामुळे हा एक स्पष्ट पॅटर्न आहे असं वाटतं. मामू फॅक्टर (मराठी-मुस्लिम समीकरण) राबवून मुस्लिम मतांचा पाठिंबा मिळवण्यासाठी मराठी माणसाला मामा म्हणजे मूर्ख बनवण्याचा. प्रकाश महाजन काही महिन्यांपूर्वी मनसेला सोडचिठ्ठी दिली होती. आता शिवसेनेत प्रवेश करताना त्यांनी ''चंदू मामा नंतर आले, आधी रशीद मामू आला'' अशी टीका केली. तसेच ''एकनाथ शिंदे माझ्यासारख्या मराठी माणसाला रात्री १२.३० वाजता भेटले. हे दुर्मिळ आहे,'' असंही त्यांनी म्हटलं. महाजन यांनी एकाच दगडात दोन्ही ठाकरेंवर निशाणा साधला आहे. उद्धव ठाकरे दंगलखोरांना पक्षात प्रवेश देतात तर राज ठाकरे ते सहन करतात. पण आपल्याच नेत्यांना ते भेटत नाहीत, असा संदेश त्यांना द्यायचा आहे. प्रकाश महाजन हे ज्येष्ठ नेते आहेत. त्यांनी मनसेची बाजू सामान्य जनतेमध्ये आणि जिथे मनसेच्या नेत्यांना पक्षाचा संदेश व्यवस्थित मांडता येत नव्हता, तेव्हा महाजन मनसेची बाजू व्यवस्थित लावून धरत होते. ते एक चांगले प्रवक्ता, वक्ता आहेत यात वाद नाही. पण त्याचबरोबर ते ज्येष्ठ व अनुभवी देखील आहेत. त्यांनी वेळोवेळी मराठी अस्मितेसाठी आवाज उठवला आहेच, त्याचबरोबर ते हिंदुत्ववादी देखील आहेत



आणि त्यासाठी ते पुढाकार घेत असतात. मनसेने राजकीय धोरण म्हणून हिंदुत्व स्वीकारलं तेव्हा त्यांना प्रचंड आनंद झाला होता. असा नेता पक्षातून गेला याचं वाईट पक्षातील इतर लोकांना वाटत नाही, हे विशेष.

रशीद मामू हे छत्रपती संभाजीनगरचे माजी महापौर आणि काँग्रेसचे नेते म्हणून ओळखले जातात. त्यांचा राजकीय प्रवास विवादास्पद राहिला आहे. १९८६ मध्ये समान नागरी कायद्यासाठी शिवसेनेच्या मोर्चादरम्यान दगडफेक झाली होती आणि त्यात रशीद मामूंचा सहभाग असल्याचा आरोप आहे. या घटनेमुळे त्यांना एक वर्षाची तुरुंगवासाची शिक्षा झाली होती. शिवसेनेचे ज्येष्ठ नेते चंद्रकांत खैरे यांनी स्वतः या घटनेचा उल्लेख करून रशीद मामूंच्या पक्षप्रवेशाला कडाडून विरोध केला आहे. खैरे म्हणतात की, ''ते दगड आम्ही खाल्ले आहेत. त्याची माहिती कदाचित पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यापर्यंत दिली गेली नसेल म्हणून अजाणतेपणी त्यांनी रशीद मामूला प्रवेश दिला असावा. मात्र त्यांना उमेदवारी मिळू देणार नाही. त्यांना तिकीट मिळणारही नाही. तसे झाले तर बघा मी काय करतो.'' भाजप महाराष्ट्र या अधिकृत पेजवरून ठाकरेंवर टीका करण्यात आली आहे. ''पाकिस्तान जिंदाबादच्या घोषणा देणारा, हिंदूंची घरे जाळणारा आणि दंगलीत सहभागी असलेला माणूस आता उबाठा गटाचा लाडका बनला आहे.'' छत्रपती संभाजीनगर नामांतराला रशीद मामूंनी विरोध केला होता, ही माहितीही भाजपने एक्सद्वारे समोर आणली आहे.

त्यामुळे रशीद मामू हे नगरसेवक होण्यासाठी, म्हणजे तिकीट मिळवण्यासाठी उबाठा गटात सामील झालेत हे उघड. रशीद मामूंच्या इनकमिंगमुळे ठाकरे गटाला छत्रपती संभाजीनगरमध्ये फायदा होऊ शकतो. कारण मुस्लिम मतदार उद्धव ठाकरेंवर आधीच मेहेरबान आहेत. गेल्या लोकसभा निवडणुकीत मुस्लिम मतदारांनी उद्धव ठाकरेंना भरभरून मते दिली होती. त्यांच्या बळावर ठाकरे पुन्हा एकदा डोकं वर काढू शकले. आता अब्दुल रशीद खान यांच्या प्रवेशाने आणखी मदत लाभत आहे. मामूंचा जनसंपर्क चांगला आहे. केवळ छत्रपती संभाजीनगरच नव्हे तर या प्रवेशामुळे इतर ठिकाणी देखील मुस्लिम मते मिळविण्यास ठाकरेंना मदत होईल.

उबाठा-मनसे युती होण्याआधी मामू फॅक्टर (मराठी व मुस्लिम मतदारांचे समीकरण) राबवले जाईल अशी चर्चा होत होती आणि रशीद मामूंच्या पक्षप्रवेशाने या फॅक्टरवर शिक्कामोर्तब झाला आहे. म्हणजे मराठी माणसाला साद घालायची... गुजराथी, उत्तर प्रदेश किंवा इतर लोकांविरुद्ध मराठी माणसाला भडकवायचं, या राजकारणापोटी अर्णव खैरेसारख्या लहान मराठी मुलाला जीव गमवावा लागतो, मराठी माणसाला बॉसच्या कानाखाली मारा असं म्हणत त्याला नोकरी सोडायला लावायची, म्हणजे मराठी मुलांच्या हातात दगड देऊन त्यांची कारकीर्द उद्ध्वस्त करायची आणि हे सगळं केल्यानंतर रशीद मामूला पक्षात प्रवेश द्यायचा. का? तर मामू फॅक्टर यशस्वी झाला पाहिजे? आणि या सर्वांत मोठे म्हणजे मराठी माणसाला मामा बनवायचं? तुम्हाला काय वाटतं मराठी जनांनो?

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**चंद्रकांत लोहाणा**

# काँग्रेसची अवस्था आणि कारणे

संस्कृती आणि दिशाहीन झालेला काँग्रेस पक्ष सत्तेसाठी एवढा हपापलेला आहे की, विदेशामध्येही भाजपा नेतृत्वातील केंद्र सरकारला बदनाम करून राहुल गांधी यांना सत्ता हस्तगत करायची आहे. स्वकर्तृत्वाने काँग्रेसला सत्ता मिळणे शक्यच नाही. भारतीय नागरिक आणि या देशाच्या संस्कृतीशी समरस होईल, असा राहुल गांधींजवळ ना कोणता मुद्दा आहे, ना कोणतेही व्हिजन. यांचे कर्तृत्वही देशाला मान खाली घालवणारे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपाला दररोज बदनाम करण्याचे कारस्थान काँग्रेसने अतिशय नियोजन करून आखले आहे. राहुल गांधी यांचा प्रत्येक विदेश दौरा त्यासाठीच असतो की काय अशी दाट शंका आता नागरिकांना येऊ लागली आहे. राहुल गांधी यांच्या नुकत्याच झालेल्या जर्मनीच्या दौऱ्याने ही बाब पुन्हा अधोरेखित झाली आहे. लोकशाही मार्गाने आपण निवडून येऊ शकत नाही, हे विदारक सत्य काँग्रेस पक्षाला उमगले आहे. त्यामुळे मागील अकरा वर्षांचा कालखंड सत्तेविना घालविलेल्या काँग्रेसची अवस्था तर राहुल गांधी यांनी 'न घरका न घाटका' अशी करून ठेवली आहे. भारतीय संस्कृती, परंपरा आणि संस्कार याच्याशी या पक्षाचा काडीमात्रही संबंध नसताना लोकांनी तरी का बरं या पक्षाला निवडून द्यावं?

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सत्तेतून हटविण्यासाठी राहुल गांधी यांनी आपल्या देशामध्ये अनेक प्रयोग करून बघितले. नेपाळ, श्रीलंका या देशामध्ये युवकांनी सरकारविरुद्ध केलेल्या उठावाच्या पृष्ठभूमीवर येथेही तरुणांची डोकी भडविण्याची काँग्रेसची चाल फसली. निवडणूक आयोग व त्यासारखा अन्य संस्थांना लक्ष्य करूनही आपण सत्तेत खुर्चीपर्यंत पोहोचू शकत नाही, हे लक्षात आल्यावर राहुल गांधी यांनी नरेंद्र मोदी यांना परदेशामध्ये बदनाम करण्याचा कट आखल्याचे दिसून येत आहे. जगामध्ये असा एकही नेता नाही, जो परकीय भूमीवर आपल्याच देशाची बदनामी करून सत्ता मिळविण्याचा प्रयत्न करीत असेल. खरं तर परकीय भूमीवर स्वकीयांचे असे कृत्य देशद्रोही यासारखा गुन्हा मानला जायला हवा. परंतु, दुर्दैवाने तसे होताना दिसून येत नाही. आपल्या घराणेशाहीची परंपरा कायम ठेवण्यासाठी कोणीएक देशालाच वेठीस धरत असेल तर हे एक अक्षम्य पाप आहे. त्याचीच शिक्षा आज काँग्रेस पक्ष भोगत आहे. जनतेला गृहीत धरून अनेक दशके सत्ता काँग्रेसने उपभोगली. सत्तेच्या आवेशाखाली प्रत्येकवेळी विरोधकांना ठेचून काढण्याची या पक्षाची मनोवृत्ती. फक्त आम्हीच लायक ही या पक्षाची मगरुरी. त्यामुळे सत्तेसाठी वाट्टेल ते करण्याची यांची तयारी असते. त्यामुळे काँग्रेस पक्ष बेताल झाला आहे. जनतेने २०१४ पूर्वीचा आणि त्यानंतरचा काळ बघितला आहे. असंख्य घोटाळे आणि मानवतेला लाजवेल असा आणिबाणीचा क्रूर काळ लोकांनी अनुभवला आहे. आपल्या कार्यकाळामध्ये अनेक संस्थांना आपली स्थावर मालमत्ता समजून काँग्रेस पक्षाने आपल्या स्वार्थासाठी उपयोग केला आहे. त्यासाठी प्रत्येकवेळी येथील हिंदूंना वेठीस धरून दुय्यम वागणूक दिली आहे. या सर्व बाबींना छेद देत नरेंद्र मोदी यांनी खऱ्या अर्थाने २०१४ साली लोकशाहीची पुनर्स्थापना केली. नेमके हेच काँग्रेस पक्षाला नको आहे.

सत्ता उपभोगणे हा आमचा जन्मसिद्ध अधिकार असल्याच्या तोऱ्यात आजही राहुल गांधी आहेत. राहुल गांधी हे अपघाताने राजकारणात आले की, त्यांना त्यात रसच नाही. अनेक राज्यांतील विधानसभा निवडणुका व लोकसभा निवडणुका राहुल गांधी यांच्याच नेतृत्वात लढल्या गेल्या. केंद्रात सत्ता स्थापनेसाठी दोन डझन पक्षांनी एकत्र येऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पराभूत करण्यासाठी जीवाचे रान केले, नको ते आरोप केले. असे असतानाही तीन लोकसभा निवडणुका व अनेक राज्ये काँग्रेसने गमावली. राहुल गांधी यांचे नेतृत्व जनतेला मान्य नसल्याचे अनेक निवडणुकांत सिद्ध झाले आहे. विदेशात भारताच्या प्रतिमेला तडे जावेत असा त्यांचा सतत प्रयत्न असतो. विदेशात जाऊन वाटेल ते बरळण्याची सवय त्यांची गेलेली नाही. जेव्हा जेव्हा काँग्रेसचे युवराज विदेश दौऱ्यावर गेले तेव्हा त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर बिनबुडाचे आरोप करून त्यांची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न केला. हे देश आणि जनतेच्या हिताचे नक्कीच नाही.

९८८१७१७८५६

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# सर्व काही खुर्चीसाठी!

२०१९ मध्ये भाजपासोबत निवडणूक लढून निकालानंतर आपल्या मित्रपक्षाच्या पाठीत खंजीर खुपसून, केवळ खुर्चीसाठी भिन्न विचारांच्या पक्षासोबत आघाडी केली. ज्या पक्षाच्या जिवावर मुख्यमंत्रिपदाच्या खुर्चीचा लाभ घेतला, आता महापालिकेच्या सत्तामोहात त्या पक्षांसोबत दगाफटका केला आणि संपलेल्या पक्षासोबत युती केली. आता पालिका निवडणुकीचे निकाल लागले आणि यदाकदाचित उबाठाला सर्वाधिक जागा मिळाल्या आणि सत्ता स्थापन करण्यासाठी काही जागा कमी पडल्या, नेमक्या तेवढ्या जागा काँग्रेस किंवा शरद पवारांकडे असल्या तर, हे सत्तेसाठी भावाच्या पाठीत खंजीर खुपसतील आणि त्यांच्यासोबत जाऊन टुणकन खुर्चीत बसतील. नंतर पुन्हा भावाने माझ्या पाठीत खंजीर कसा खुपसला याची रुदाली करत हेच फिरतील. पहिले युतीच्या पाठीत खंजीर खुपसला. आता आता वज्रमूठ खिळखिळी करत आघाडीच्या पाठीत वार केला. ही यांची मोडस ऑपरेंडी आहे. शेवटी ''एक खुर्ची का सवाल है भाई...'' त्यासाठी आमचे उद्धव साहेब कोणत्याही थराला जाऊ शकतात. हे वेगळ्याने सांगायची गरज नाही.

एकेकाळी संपलेल्या पक्षाबद्दल बोलायलाही यांना लाज वाटायची. मात्र, त्याच पक्षासोबत मोठा गाजावाजा करत एकत्र येण्याची घोषणा करताना लाज नाही वाटली. गोरेगावच्या पत्राचाळीतील ६७२ मराठी कुटुंबांना गेल्या अनेक वर्षांपासून बेघर करून ठेवलेल्यांनी मराठी अस्मितेसाठी एकत्र येत असल्याची घोषणा केली, तेव्हा लाज नाही वाटली. १९९५ मध्ये दोन-पाच जागांचा फरक होता. शेवटच्या काळात मुख्यमंत्री बदलवला मात्र, भाजपाला मुख्यमंत्रिपद दिलं नाही. आणि २०१९ मध्ये निम्म्याहून कमी जागा मिळूनही मुख्यमंत्रिपद मागताना लाज वाटली नाही. मी कुठलीही निवडणूक लढवणार नाही किंवा माझ्या कुटुंबातलं कुणी निवडणूक लढवणार नाही. ठाकरे घराणं कुठल्याही सत्तेचं लोभी नाही, आम्ही सत्तेच्या पलीकडे लोकांची सेवा करण्यासाठी राजकारणात आहोत, या बाळासाहेब ठाकरेंच्या भूमिकेला तडा देताना यांना लाज वाटली नाही. बाळासाहेबांच्या कडवट हिंदुत्वाच्या भूमिकेशी फारकत घेताना यांना लाज वाटली नाही. सत्ता पदासाठी हपापलेले, त्यासाठी वाट्टेल ते करणारे लाचार, बेडर राजकारणी मी जवळून पाहिले, त्यांच्या रांगेत मला जायचे नाही, असे ठामपणे सांगणाऱ्या आपल्या वडिलांच्याच शब्दांना मातीत मिळवताना यांना लाज वाटली नाही. स्वतः आपल्याच वडिलांनी या महाराष्ट्राच्या जनतेला दिलेले शब्द पाळायचे नाहीत आणि इतरांवर दिलेला शब्द पाळत नसल्याचे आरोप करताना यांना लाज वाटत नाही. कारण ''निर्लज्जम् सदा सुखी'' म्हणतात ना तसल्या प्रकारात



हे लोक मोडतात.

बरं स्वतःचे धोक्यात असलेले राजकीय भवितव्य, अस्तित्व टिकविण्यासाठी हे दोन दगलबाज मोठ्या आणाभाका घेऊन, मराठी माणसांसाठी, मराठी अस्मितेसाठी एकत्र आल्याचा स्टंट काल परवा गळ्यातगळे टाकून करताना दिसले. गेली २० वर्षे स्वतःच्या सत्तेच्या हव्यासापोटी, स्वार्थासाठी एकमेकांचे कपडे फाडण्यात व्यस्त असताना, हा मराठी माणूस यांना आठवला नाही.

लोकसभेत विजय मिळाला, तेव्हा विशिष्ट समाजाचे आभार मानताना मराठी माणूस नाही आठवला. स्टॅलिन, खडगे हे हिंदूंना कॅन्सर म्हणत होते तेव्हा त्यांच्या मांडीला मांडी लावून बसत, आमचं हिंदुत्व वेगळे असल्याचे दाखले देत एका विशिष्ट समाजाला चुचकारण्याचा यांचा मागील काळात प्रयत्न दिसला. त्यामुळे यांना लाज नसली तरी, छत्रपतींच्या या मातीतल्या स्वाभिमानी मराठी आणि हिंदू समाजाने लाज विकलेली नाही. लोकसभेच्या वेळी खोट्या प्रचाराला बळी पडलेल्यांचे डोळे आता उघडलेले आहे. त्यामुळेच विधानसभेत आणि नगर पालिका- नगर पंचायतींच्या निवडणुकांमध्ये यांची जागा यांना दाखवून दिली. आणि आता मुंबईसह राज्याच्या विविध भागांतील महानगर पालिकेत देखील हा मराठी माणूस यांची लायकी दाखविल्याशिवाय राहणार नाही.

मुळात कधी कधी प्रश्न पडतो राज आणि उद्धव या दोघांना खरंच पक्ष चालवायचे आहेत का? मग हे लोक आपले पक्षच व्यवस्थित चालवू शकत नसतील तर महापालिका कशी चालवतील असा प्रश्न अनेकांना पडला आहे? आता बघा शिवसेनेत बंड झालं आणि पक्षाची सूत्रे एकनाथ शिंदेंकडे गेली. यावेळी उद्धव ठाकरेंनी जाहीर सभांमध्ये बोलताना, मी नव्यानं पक्ष उभा करेन, अशा तोऱ्यात बाता केल्या, पण रडगाणं गाण्यापलीकडे काही केल्याचं पुढील काळात दिसलं नाही. मुख्यमंत्रिपद गेलं, पक्ष हातचा गेला, आमदार-खासदारांनी साथ सोडली, नेते वेगळी वाट धरायला लागले. तरीही उद्धव साहेबांचा तोरा कमी होताना दिसत नाही आहे. पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी काही पावलं उचललेली ऐकिवात नाही. मग साहेब आणि युवराज दोघेही व्यस्त कुठे आहेत तर, म्हणे मातोश्री दोनच्या इंटेरिअर करण्यात, कलाकारांच्या कार्यक्रमांमध्ये, उद्योगपतींच्या विविह सोहळ्यांना हजेरी लावण्यात. असं करत राहिल्यास यांच्या हाती सत्ता दिली तर त्याचेही आपल्या पक्षाप्रमाणे तीनतेरा करतील, असे आता जनतेला वाटू लागले आहे. तिकडे सोबत आलेल्या दुसऱ्या भिडूची काही वेगळी परिस्थिती नाही. पक्षाला जनाधारच नाही. निवडणुकांमध्ये कितीही कोणतेही मुद्दे हाताळले तरी लोक मतच देत नाहीत. स्वतःच्या मुलाला निवडून आणू शकले नाही. नेते कार्यकर्त्यांना साहेब भेटत नसल्याची ओरड आहे. एवढी परिस्थिती असूनही, ज्यांना पक्षात राहायचं आहे त्यांनी राहावं, ज्यांना जायंच आहे त्यांनी जावं, हा तोरा काही यांचाही कमी झालेला नाही. आणि वरून म्हणतात एकदा हा महाराष्ट्र माझ्या हातात द्या. बघा कसा सुतासारखा सरळ करतो. अरे बाबा पहिले स्वतः सरळ वाग, अशी आता जनता म्हणू लागली आहे.

खरं तर पार्टटाईम राजकारणी असलेले हे दोन्ही भाऊ उतार वयातही ऐशोआराम करत असतात आणि निवडणुका आल्या की, मराठी माणसांवरचं यांचं प्रेम उफाळून येतं. मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याचा डाव यांना अचानक आठवतो. पण दहा वर्षे पूर्ण बहुमतातलं केंद्रात सरकार असताना, काश्मीरसारखा आंतरराष्ट्रीय पातळीवर वादात अडकलेला मुद्दा एका दणक्यात संपुष्टात आणणाऱ्यांसाठी मुंबई स्वतंत्र करायचीच असती तर, काय वेळ लागला असता? हे साधं गणित या दोन भावांना समजलं नसलं तरी, या महाराष्ट्राला आणि मुंबईकरांना उमजलं आहे. आपल्या निवडणूक चिन्हाचं तोंड दोन वेळा बदलणाऱ्यांनी आपली भूमिका किती वेळा बदलली, हे काय जनतेला माहिती नाही? राजकारणामुळे दुरावलेले दोघे राजकारणासाठी एकत्र आले. यातला स्वार्थ न समजण्याएवढी जनता दुधखुळी आहे? त्यामुळे स्वतःच्या स्वार्थासाठी राजकारण करणाऱ्यांची ही नौटंकी यावेळी चालणार नाही. किंबहुना मराठी माणूस चालू देणार नाही, एवढं मात्र निश्चित!

९२७०३३३८८६

## मुंबईचे लोकसंख्याशास्त्रीय बदल आणि घुसखोरीचे संकट

टाटा सामाजिक विज्ञान संस्था (टीआयएसएस), मुंबई या संस्थेने डिसेंबर २०२५ मध्ये एक महत्त्वपूर्ण अहवाल सादर केला आहे. त्यानुसार, मुंबईच्या लोकसंख्याशास्त्रात वेगाने बदल होत असून, २०२५ पर्यंत शहरातील हिंदूंची संख्या ५४ टक्क्यांपर्यंत खाली येण्याची शक्यता वर्तवली आहे. आशिया खंडातील समाजकार्य आणि संशोधनातील अग्रगण्य संस्था असलेल्या टीआयएसएसने अभ्यासात म्हटले आहे की, अवैध घुसखोरीमुळे मुंबई शहराच्या मूळ ओळखीला आणि सांस्कृतिक रचनेला मोठा धोका निर्माण होऊ शकतो. आज देशातील विविध राज्यांमध्ये बांगलादेशी आणि रोहिंग्यांची संख्या वाढत आहे. विशेषतः आसामसारख्या राज्यांमध्ये परिस्थिती अधिक चिंताजनक आहे. तेथील काही जिल्ह्यांतील लोकसंख्येचे प्रमाण इतके बदलले आहे की, एकेकाळी अल्पसंख्यक असलेला समाज आता बहुसंख्यकांच्या बरोबरीने उभा राहिला आहे. जगातील प्रत्येक सार्वभौम देश आपल्या सीमांचे रक्षण करण्यासाठी कठोर कायदे करतो आणि घुसखोरांना कायदेशीर प्रक्रियेद्वारे परत पाठवतो. मात्र, पश्चिम बंगाल सरकारने अद्याप जमीन उपलब्ध करून न दिल्यामुळे सीमेच्या मोठ्या भागावर कुंपण घालण्याचे काम रखडले आहे. येथे एकूण ९१३ किमी सीमेपैकी बहुतांश भाग अद्याप उघडा आहे. भौगोलिक आव्हाने : सुमारे ३७२ किमीची सीमा नदी क्षेत्रात येते, जिथे कुंपण घालणे कठीण आहे. सध्या केवळ ४०४ किमी सीमेवर कुंपण पूर्ण झाले आहे. या भौगोलिक आणि प्रशासकीय त्रुटींचा फायदा घेऊन घुसखोर सहजपणे भारतीय हद्दीत प्रवेश करतात. दुर्दैवाची बाब म्हणजे, स्थानिक पातळीवरील काही राजकीय हितसंबंधांमुळे या घुसखोरांना आधार कार्ड आणि मतदार ओळखपत्रासारखे भारतीय नागरिकत्वाचे पुरावे सहज उपलब्ध करून दिले जातात. टीआयएसएससारख्या प्रतिष्ठित संस्थेने दिलेला हा इशारा भविष्यातील सामाजिक संघर्षाची नांदी ठरू शकतो.

**अविनाश देशपांडे**/९२८४६७९६२३

## वाचक पत्रे

## तरुण भारतच्या शताब्दीनिमित्त सुरेख सांस्कृतिक कार्यक्रम

दै. तरुण भारतच्या शताब्दीनिमित्त वर्धात आयोजित एक सुंदर, आगळावेगळा कार्यक्रम गुरुवारी पाहण्यात आला. मुंबईच्या मेघना आणि हेमंत साने यांचा कथा- काव्य-नाट्य - गीत असा सगळा संगम त्यात होता. या प्रकारचा हा पहिलाच अनुभव! फोटोसेशन ही कथा आजच्या जिकडे तिकडे फसवणूक होत असलेल्या जगात माणसातील चांगुलपणाही टिकून आहे, हे सांगणारी! तर टायगरचा सल्ल्यामध्ये ज्योतिष सल्ला देणारा वगैरे प्रसंग असले तरी वेळप्रसंगी आपल्या प्रश्नांचं उत्तर हे आपल्या वागणुकीतच दडलेलं असतं, हे सांगणारी!

कवी सुरेश भटांच्या आठवणी त्यांच्याच शैलीत सांगितल्या. तसेच आईवडिलांच्या आठवणीतून - बाबा घाबरतात आईला हे वैश्विक सत्य मांडून हास्याची खसखस पिकवली! कांदे-पोहे कार्यक्रमाचा दमदार अनुभव गाठीशी असलेल्या नववधूचे रंगतदार किस्से ऐकताना मजा आली. मेघना साने यांचं कथाकथन, एकपात्री प्रयोग यांच्या मध्ये हेमंत साने यांनी गीते सादर केली. झाली फुले कळ्यांची, येशील, येशील, येशील राणी, वारा गाई गाणे ही अतिशय सुरेख गीते तितकीच सुंदर ते गायिले. सोबतच मेघना यांच्या वडिलांनी लिहिलेले एक गीतही स्वतः चाल लावून त्यांनी प्रस्तुत केले. शेवटी मेघना यांनी स्वरचित लावणी सादर केली. तासाभरात कलाविश्वाचा सुरेख असा फेरफटका श्रोते मारून आले.

**हर्षदा मशानकर**/८२३७८२१४४९

## आजचे संघगीत-८९

शनिवार, २७ डिसेंबर २०२५

### भगवंताचे जया लाभले चिरविजयी वरदान

भगवंताचे जया लाभले । चिरविजयी वरदान ।
संघावाचुन, कोण स्विकारिल । काळाचे आव्हान? ॥धृ॥

परंपरेचे, पौरुषाचे। पराक्रमी पुरुषांचे ।
पुनीत पावन, घडते येथे । पूजन वसुंधरेचे ।
मांगल्याचे, पावित्र्याचे । राष्ट्रीय चारित्र्याचे ।
संघशक्तिने, चरित्र घडते । बाल-तरुण-प्रौढांचे ।
इथेच मिळतो मायभूमिला । अग्रपुजेचा मान ॥१॥

पुण्यपुरातन, इथे सनातन । ध्वज भगवा आमुचा ।
ग्राम नगर गिरिकंदरि डोले । जगी दिग्विजयाचा।
विश्वगुरुपदी सदा नांदला । विजयी जगताचा ।
नानक गुरुचा, महाराणाचा । विक्रमी शिवबाचा ।
नील अंबरी फडकत असता । चढे नवे अवसान ॥२॥

काल्पनीक प्रांतांच्या सीमा । भेद इथे ते सरले ।
जाति-पंथ-भाषेचे अंकुर । कधी न इथे रुजले ।
भिन्नत्वातुन अभिन्नतेचे । विशाल मंदिर उठले ।
अजिंक्य-अविचल मंदिरात या । केशवदर्शन घडले ।
कोटि कोटि हृदयांत चिरंतन । कार्याचा अभिमान ॥३॥

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### लोकमंगल कृषी महाविद्यालयात जीवन मूल्यांविषयी मार्गदर्शन

**सोलापूर, दि. २६ डिसेंबर-**

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्नित, लोकमंगल कृषी महाविद्यालय वडाळा येथे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक भान जनजागृती साठी आणि जीवनमूल्य रुजविण्याकरिता मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित केले होते. या व्याख्यानास प्रमुख मार्गदर्शक म्हणून लोकमंगल फाउंडेशनचे संचालक मारुती तोडकर होते. रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. अजित कुरे यांनी प्रास्ताविक केले. प्रमुख मार्गदर्शक मारुती तोडकर यांचा कृषी विस्तार विभागातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. वर्षाराणी दावणे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. सध्याच्या धावत्या युगामध्ये लोप पावत चाललेला संवाद आणि कौटुंबिक स्थिती आणि त्याचे होणारे दीर्घ असे गंभीर परिणाम यावर प्रकाश टाकला. तसेच त्यांनी समाजामध्ये वावरत असताना सर्वांनी सामाजिक भान राखणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन श्री. तोडकर केले. कार्यक्रमास कृषि महाविद्यालयाच्या कृषि विस्तार विभाग प्रमुखा डॉ.दावणे व्ही. टी., राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. अजित कुरे आदी उपस्थित होते. या व्याख्यानाचे आयोजन प्राचार्य डॉ.अमोल शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. सूत्रसंचालन प्रा. अजित कुरे यांनी केले.



### 'प्लास्टिक पुनर्वापर' विषयांतर्गत विविध मॉडेल्सचे सादरीकरण

**सोलापूर, दि. २६ डिसेंबर-**

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना एककातर्फे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रानमसले, ता. उत्तर सोलापूर येथे प्लास्टिक पुनर्वापर या विषयांतर्गत विविध मॉडेल्सचे सादरीकरण आयोजित करण्यात आले होते. यामध्ये रासेयो स्वयंसेवकांनी महाविद्यालयातील टाकाऊ प्लॅस्टिकचा पुनर्वापर करून तयार करण्यात आलेल्या विविध मॉडेल्सचे सादरीकरण केले. यामध्ये इस्रो जी.एस. एल. वी. रॉकेट प्रक्षेपण, किल्ला प्रतिकृती, वर्टिकल गार्डनिंग सिस्टीम, विविध प्रकारच्या प्लास्टिक कुंड्या तसेच विविध शोभेच्या वस्तूंचा समावेश होता. या सादरीकरणात रासेयो स्वयंसेवकांनी प्लास्टिक मुळे होणारे प्रदूषण, पर्यावरणाची होणारी हानी, टाकाऊ प्लास्टिकचा पुनर्वापर का आवश्यक आहे, प्लास्टिक घनकचरा व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन केले. या उपक्रमाअंतर्गत शाळेतील विद्यार्थ्यांनी टाकाऊ प्लास्टिकचा वापर करून विविध प्रकारच्या उपयुक्त वस्तु तयार केल्या व त्याचा वापर शाळेतील परिसरात केला. याप्रसंगी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका प्रतिभा पाटील, शिक्षकवृंद कृष्णात तगारे, दत्तात्रय माने, आनंदराव पाटील, सचिन धुमाळे, महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक प्रा. आशिष सरकाळे, शाळेतील सर्व विद्यार्थी व रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते. यासाठी प्राचार्य सागर महाजन, सरपंच मनोहर क्षीरसागर व उपसरपंच रमेश सुतार यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# 'मानधन' वाढवताच आठवड्यातच २१ हजार आयुष्मान कार्ड वाढले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ डिसेंबर-**

आयुष्मान भारत ही योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविणाऱ्या आणि प्रत्येक नागरिकांचे आरोग्य कार्ड काढणाऱ्या आशाताई, रेशन दुकानदार आणि महाईसेवा केंद्रधारकांना आता प्रतिकार्ड ८ ऐवजी ३० रुपये मानधन दिले जात आहे. यामुळे जिल्ह्यातील कार्डसंख्या गतीने वाढण्यास मदत होत असून, अवघ्या ७ दिवसात जिल्ह्यात नव्याने २१ हजार कार्डधारक वाढले असल्याची माहिती नूतन जिल्हा समन्वयक डॉ. प्रविण गुंजाळ यांनी दैनिक तरुण भारतशी संवाद साधताना दिली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेनुसार राज्यात आयुष्यमान भारत ही महत्वाकांक्षी योजना सर्वसामान्यांसाठी राबविली जात आहे. सोलापूर जिल्ह्यातील या योजनेची गतीमानता तपासण्यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जि.प.चे सीईओ कुलदीप जंगम यांनी नुकतीच आढावा बैठक घेतली. शहर-जिल्ह्यात ४० लाख ९१ हजार लाभार्थींपैकी १४ लाख ३३



हजार जणांना आयुष्मान कार्ड मिळाले आहेत. नागरिकांना आयुष्मान कार्ड करुन देणाऱ्या सेवाधारकांना प्रतिकार्ड ८ ऐवजी ३० रुपये मानधन दिले जाणार असल्याचेही यावेळी त्यांनी स्पष्ट केले होते. यामुळे एकाच आठवड्यात २१ हजार आयुष्मान कार्ड वाढली आहेत आणि याचा वेग असाच वाढण्याची शक्यताही डॉ. गुंजाळ यांनी बोलून दाखविली.

आयुष्मान भारत या योजनेत सोलापूर महापालिका प्रशासन व योजनेच्या तत्कालिन जिल्हा समन्वयकांची कामगिरी असमाधानकारक असल्याची खंत आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी सोलापूर दौऱ्यात मध्यंतरी व्यक्त केली होती. जिल्ह्यातील ११४ हॉस्पीटलमध्ये आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना वैद्यकीय उपचार देण्यात येतात. रुग्ण व हॉस्पीटल या दोघांचे नुकसान होणार नाही, याची दक्षता घेण्यात आली आहे. जिल्ह्यातील ४०-४५ टक्के लाभार्थ्यांना कार्ड वितरित करण्यात आले आहेत. उर्वरित लोकांनाही आता लवकरच आयुष्मान कार्ड देण्यात येणार असल्याचीही माहिती डॉ. गुंजाळ यांनी दिली.


> 'वय वंदना आरोग्य योजना' ही आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजने अंतर्गत ७० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांसाठी असलेली एक विशेष आरोग्य विमा योजना आहे. जी त्यांना दरवर्षी ५ लाखांपर्यंत मोफत वैद्यकीय उपचार (कॅशलेस) पुरवते, त्यात आता सुधारणा करुन १० लाखांचे उपचार केले आहेत. यासाठी कोणतेही उत्पन्न किंवा सामाजिक-आर्थिक निकष तपासले जात नाहीत. यासाठी 'आयुष्मान वय वंदना कार्ड' दिले जाते. आपल्या जिल्ह्यात अशी ८ हजार ४०० आरोग्य कार्ड दिली आहेत, असे जिल्हा समन्वयक डॉ.प्रवीण गुंजाळ यांनी सांगितले.

## दृष्टी परत देणारा सेवायज्ञ
# मोफत मोतीबिंदू नेत्र भिंगारोपण शस्त्रक्रिया शिबीर ४ जानेवारीला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ डिसेंबर-**

गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांच्या जीवनात नवीन उजेड आणण्यासाठी श्री सोलापूर गुजराती मित्र मंडळ, रोटरी सोलापूर परिवार आणि शंकरशेठ साबळे आय हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दि. ४ जानेवारी रोजी मोफत मोतीबिंदू (फेको) नेत्र भिंगारोपण शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.ह्याचे उद्घाटन पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांच्या हस्ते होणार आहे.

या शिबिराच्या माध्यमातून डोळ्यांतील अंधुकता दूर करून जीवनात पुन्हा स्पष्टता व आत्मविश्वास देण्याचा हा एक संवेदनशील व मानवतावादी प्रयत्न आहे. शिबिरामध्ये तपासणीअंती शस्त्रक्रियेची आवश्यकता असलेल्या पिवळ्या रेशन



कार्डधारक गरजू रुग्णांवर विनामूल्य नेत्र भिंगारोपण शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.

हे शिबीर गुजरात भवन, सोलापूर येथील वातानुकूलित सभागृहात आयोजित करण्यात आले असून, गरजू रुग्णांनी सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत गुजरात भवन येथे येऊन आपली नावे नोंदवावीत. दृष्टी ही केवळ डोळ्यांची नसून, जीवनाकडे पाहण्याची आशा आहे. ही आशा पुन्हा जागवण्यासाठी नागरिकांनी या सेवायज्ञाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## सोलापूर महापालिका निवडणूक
# रुजू न झालेल्या कर्मचारी, अधिकाऱ्यांना बजावल्या नोटीसा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ डिसेंबर-**

सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने निवडणूक कामकाजासाठी नियुक्त करण्यात आलेल्या काही अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अद्याप नेमून दिलेल्या क्षेत्रीय अधिकारी तसेच संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाकडे रूजू न झाल्याचे निदर्शनास आले आहे. निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शक व सुरळीत अंमलबजावणीस अडथळा निर्माण करणारी असल्याने त्यांच्यावर कारवाई करण्याचे निर्देश देत आयुक्त डॉ. ओम्बासे कारणे दाखवा नोटीसा दिल्या आहेत.

निवडणूक आचारसंहिता पालनासाठी महानगरपालिका प्रशासनाकडून स्थिर देखरेख पथक व इतर निवडणूक कामांसाठी नियुक्तीचे आदेश निर्गमित करण्यात आले होते. संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना निवडणूक कार्यालयामार्फत तसेच निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून वेळोवेळी कर्तव्यावर हजर राहण्याबाबत सूचित करण्यात आले होते. आदेश बजावून देखील काही अधिकारी व कर्मचारी निवडणूक कर्तव्यावर हजर न राहिल्याचे संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांनी कळविले आहे.या पार्श्वभूमीवर आयुक्त तथा निवडणूक अधिकारी, सोलापूर महानगरपालिका डॉ. सचिन ओम्बासे यांनी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

कामकाजात जाणीवपूर्वक टाळाटाळ केल्याप्रकरणी त्यांच्यावर लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ अंतर्गत कारवाई का करण्यात येऊ नये, याबाबत खुलासा सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.तसेच, क्षेत्रीय अधिकारी तसेच निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाकडे रूजू न झालेल्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उद्या सकाळी १० वाजेपर्यंत कर्तव्यावर उपस्थित राहावे, असे निर्देश दिले आहेत.

निवडणूक प्रक्रिया ही लोकशाही व्यवस्थेचा अत्यंत महत्त्वाचा भाग असून, विहित वेळेत उपस्थित न राहणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम ३४ नुसार कठोर कारवाई करण्यात येईल. निवडणूक कामात कोणत्याही प्रकारची दिरंगाई अथवा आदेशांचे उल्लंघन सहन केले जाणार नाही असा इशाराही प्रशासनाकडून देण्यात आला.

# प्रतीक्षा कोळी, आर्या करंटे, इशिता साठे यांची बाजी

- शिवस्मारकतर्फे जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा उत्साहात
- विहिंपचे प्रदेशाध्यक्ष प्राचार्य धरणे यांच्या हस्ते वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ डिसेंबर-**

श्री छत्रपती शिवाजी महाराज स्मारक मंडळ शिवस्मारकतर्फे घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत प्रतीक्षा कोळी, आर्या करंटे आणि इशिता साठे यांनी प्रथम क्रमांक मिळवत बाजी मारली. शिवस्मारक सभागृहात झालेल्या कार्यक्रमात विश्व हिंदू परिषदेचे पश्चिम महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष प्राचार्य गजानन धरणे यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर विश्व हिंदू परिषदेचे पश्चिम महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष प्राचार्य गजानन धरणे, परीक्षक श्रीकांत गोटे, लक्ष्मी जमादार-कुलकर्णी, शिवस्मारकचे सचिव गंगाधर गवसने, कोषाध्यक्ष धनंजय कुलकर्णी, संचालिका माधवी कुलकर्णी, व्यवस्थापक मल्लिनाथ व्हटकर आदी उपस्थित होते. उपस्थित होते. या स्पर्धेतील



प्रथम विजेत्यांना तीन हजार रुपये, द्वितीय विजेत्यांना दोन हजार रुपये, तृतीय विजेत्यांना एक हजार रुपये तसेच उत्तेजनार्थ पारितोषिक म्हणून एक रुपये, स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र देण्यात आले. शिवस्मारकचे अध्यक्ष रंगनाथ बंकापूर यांनी प्रास्ताविक केले. संचालक प्रसाद जिरांकलगीकर यांनी सूत्रसंचालन तर कोषाध्यक्ष धनंजय कुलकर्णी यांनी आभार प्रदर्शन केले.

**अंतिम निकाल (प्रथम तीन व २ उत्तेजनार्थ ) : ५वी ते ७ वी** - प्रतिक्षा कोळी (सिद्धेश्वर कन्या प्रशाला), श्राविका केसकर (मल्लिकार्जुन हायस्कूल), शिवांजली देशमुख (लोटस स्कूल), देवांश क्षीरसागर (बीएफ दमाणी हायस्कूल), अस्मिता बिराजदार (सुरवसे हायस्कूल).

**८ वी ते १०वी** - आर्या करंटे (वि. मो. मेहता प्रशाला), संहिता गद्रे (वि. मो. मेहता प्रशाला), प्राची बिराजदार (शांती इंग्लिश मीडियम स्कूल), प्रतिक्षा वायचळे (दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला), पृथ्वी विभुते (शांती इंग्लिश मीडियम स्कूल).

**महाविद्यालयीन** - इशिता साठे (एसईएस पॉलिटेक्निक), साक्षी उप्पीन (ए. जी. पाटील कॉलेज), प्रणिता पारेकर (हिराचंद नेमचंद महाविद्यालय),श्रावणी लंके (ए. जी. पाटील ), वैष्णवी कंटेकुरे (एसईएस पॉलिटेक्निक).

**CHANGE IN NAME**

I HAVE DECLRAE THAT MY OLD NAME IS **AARZU KHAJAHUSSAIN NADAF** HAS BEEN CHANGED TO **AARZU KHWAJA NADAF**

Resi. - 40,Modikhana Panch Kandil Chowk, Solapur.

**KINDLY NOTE**

**THE SAME. (62798 Dtd.24.12.2025)**

# मोजमाप उपकरणांची पडताळणी २४ महिन्यांसाठी एकसमान

**सोलापूर, दि. २६ डिसेंबर-**

केंद्र सरकारने कायदेशीर मापनशास्त्र (जनरल) सातवी दुरुस्ती नियम, २०२५ अधिसूचित करत व्यापारी व ग्राहक व्यवहारांशी संबंधित महत्त्वपूर्ण बदल केला आहे. हे नियम कायदेशीर मापनशास्त्र अधिनियम, २००९ अंतर्गत जारी करण्यात आले असून, राजपत्रात प्रसिद्ध झाल्यापासून लागू झाले आहेत. या दुरुस्तीमुळे कायदेशीर मापनशास्त्रात सुधारणा करण्यात आली आहे.

नव्या नियमानुसार, खालील सर्व मोजमाप उपकरणांसाठी पडताळणीची वैधता थेट २४ महिने (२ वर्षे) निश्चित करण्यात आली आहे. या निर्णयाचे सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्स आणि व्यापारी बांधवांनी स्वागत केले आहे. या निर्णयामध्ये सर्व प्रकारची वजन मापे, क्षमतेची मापे (लिटर, मिलीलीटर इ.), लांबीची मापे व मोजपट्ट्या, बीम स्केल, काउंटर मशीन, पेट्रोल व डिझेल इंधन वितरण यंत्रे आदींचा समावेश आहे. पूर्वी वेगवेगळ्या उपकरणांसाठी पडताळणी कालावधी भिन्न होता, ज्यामुळे व्यापाऱ्यांना वारंवार नूतनीकरण करावे लागत होते. या निर्णयामुळे व्यापाऱ्यांना वारंवार पडताळणीची गरज नाही, दंड व दंडात्मक कारवाईचा धोका कमी, व्यवहारांमध्ये स्पष्टता व विश्वास वाढणार, नियम समजून घेणे अधिक सोपे होणार आहे. विशेषतः किरकोळ व्यापारी, धान्य विक्रेते, किराणा दुकाने, इंधन पंप चालवणारे, हॉटेल व ढाबा व्यावसायिक यांना याचा मोठा फायदा होणार आहे. एकसमान पडताळणी कालावधीमुळे मोजमापांतील अचूकता टिकून राहणार असून, ग्राहकांची फसवणूक रोखण्यास मदत होणार आहे. त्यामुळे व्यापारी व ग्राहक यांच्यातील विश्वास अधिक मजबूत होईल. केंद्र सरकारचा हा निर्णय व्यापार सुलभीकरणाच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. व्यापाऱ्यांसाठी नियमांचे पालन सोपे होणार असून, ग्राहक हितांचे संरक्षणही अबाधित राहणार आहे. व्यापारी समुदायाने या बदलाची योग्य माहिती घेऊन त्याची अंमलबजावणी करणे अत्यंत गरजेचे आहे.

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE**
**T-11/2025-26**

MSETCL EHV PC O&M Zone, Karad invites online bids from reputed and registered bidders on Mahatransco SRM E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in/** for following works:-

Supply of Equipments/ Material, Erection, Testing and Commissioning For the work Augmentation by providing additional 1 x 25 MVA, 132- 110/33 kV T/F along with HV & LV bays with allied Civil works at 110 kV Boargaon S/s. under Karad Zone, against MBR No. CMD/MSETCL/1285 Dtd. 18.11.2025 on Turnkey basis RFx. No. **7000038450**. The Estimated amount for the said tender is **Rs.1,99,46,881.04/-** (Including Taxes) and due date for submission is 07.01.2026, 10:00 Hrs. For further details visit our above said website.

**Note:-** For further Tender Calls, No any advertisement will be given in the New Papers & bidders are requested to visit official website of Mahatransco.

**Chief Engineer**
**EHV PC O&M Zone, Karad.**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः सोलापूर शहर व आजूबाजूच्या परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, **मिळकतीचे वर्णनः-** डि व सब डि शहर सोलापूर महानगरपालिका शहर हद्दीतील व ग.व.सु. विभागातील पेठ शास्त्री नगर ब झोपडपट्टी या नावाने ओळखल्या जाणाऱ्या नगरातील झोपडी घर नं. २७८ ही घरजागा आमचे अशिल अ. रशीद घुडुभाई बागवान यांचे मयत वडिल पै. घुडुभाई इस्माईल बागवान यांचे मालकी व कब्जेवहिवाटीची आहे. सदर ठिकाणी त्यांचे नावे दोन खोल्या आहेत, याची नोंद सोलापूर महानगरपालिकेच्या ग.व.सु कर आकारणी विभागास आहे. त्यांचे दिनांक १८/०९/१९९२ रोजी सोलापूर येथे राहत्या घरी मृत्यू झालेला आहे. तसेच आमचे अशिलांची आई पै. चाँदबी घुडुभाई बागवान ही दिनांक १९/११/१९७९ रोजी मृत्यू झालेला आहे. त्यांच्या पश्चात आमचे अशिल अ. रशीद घुडुभाई बागवान हे त्यांचे कायदेशीर मुलगा या नात्याने वारसदार आहेत, त्यांचेशिवाय अन्य कोणीही नाही. सदरहू मिळकतीवरील मयत पै. घुडुभाई इस्माईल बागवान यांचे नावाची मनपातील नोंद कमी होऊन त्यांचा मुलगा अ. रशीद घुडुभाई बागवान याचे एकटयाच नावाची नोंद होणेकामी सोमपाचे कर आकारणी विभागास वारस नोंद होऊन मिळणेकरिता अर्ज दाखल करणार आहेत. तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत अन्य कोणाचेही, कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबध, दावा, लीज, टाच, बोजा, साठेखत, कोर्ट केसेस, गहाण, दान, बक्षीस, वहिवाटी हक्क, वारसदार वाटणी हक्क, खरेदी-विक्री वगैरे अन्य स्वरुपाचा हक्क व हितसंबध, तसेच वारसदारांच्या बाबत कोणाताही वाद असल्यास त्यांनी खालील नमुद पत्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत लेखी हरकत नोंदवावी. अन्यथा मुदतीत कोणाचेही कसल्याही प्रकारची तक्रार व हरकत चालणार नाही याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली तारीख २६/१२/२०२५

**सही/-**
**ॲड. एस.एम. ढेकणे**
**पत्ता : १३६-ए, वाणी गल्ली, बाळे,**
**ता. उत्तर सोलापूर,**
**जि. सोलापूर पिन - ४१३२२५**
**मो. ८४५९४२०८०३**

## IDFC FIRST Bank Limited

**(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792**
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

IDFC FIRST Bank

### आर्थिक मालमत्तांचे प्रतिभूतीकरण आणि पुनर्रचना आणि सुरक्षा हितसंबंधांची अंमलबजावणी अधिनियम, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जी **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली आहेत. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांच्या कर्जांना त्यांच्या संबंधित मालमत्तांच्या गहाणाद्वारे सुरक्षितता प्रदान करण्यात आली आहे. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी व शर्तींचे पालन केले नाही आणि ते अनियमित झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांची कर्जे एनपीए (अनुत्पादक मालमत्ता) म्हणून वर्गीकृत करण्यात आली आहेत. **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जी **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) यांना त्यांच्याकडून देय असलेल्या रकमा खालील तकत्यामध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि या रकमेवर पुढील व्याज देखील लागू होईल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून करारानुसार दराने आकारले जाईल.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 136370834 | मालमत्तेवर कर्ज | 1. उषा संजय फुगारे<br>2. संजय महादेव फुगारे | 06/12/2025 | INR 8,55,785.47J/- |

**मालमत्तेचा पत्ता :** निवासी घराचा सर्व तुकडा आणि पार्सल ग्रामपंचायत मिळकत क्र. 166/3, एकूण जमीन क्षेत्रफळ 1189.00 चौ. फूट आणि दगड, विटा आणि काँक्रीटने बांधलेले घर ज्याचे क्षेत्रफळ तळमजला = 450.00 चौ. फूट, एकूण बांधलेले क्षेत्रफळ = 450.00 चौ. फूट, गाव: कोंढार्की येथे स्थित, ग्रामपंचायत हद्दीत कोंढार्की, तालुका; पंढरपूर, जिल्हा : सोलापूर, महाराष्ट्र -413304, आणि चतु:सिमा :- पूर्व - रस्ता, पश्चिम - नंदा दानंद चंदनशिवे, उत्तर - विश्वास किसन सलागर, दक्षिण - तुकाराम रंगनाथ नागणे

या प्रसिध्दीकरणाच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्तयात दाखवलेल्या तपशीलांनुसार **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली** आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी)** कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम 13 (4) आणि कलम 14 अंतर्गत, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि **सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास अधीन असेल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम 13 (13) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर कोणत्याही प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

**सही/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये एकत्र केलेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँकलिमिटेड म्हणून ओळखले जाते)**

**दिनांक : 27/12/2025**
**स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र**

## बँक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra

**प्रधान कार्यालय/ Head Office**
**लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5**
**आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur**
**आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड़, जुले सोलापूर, सोलापुर - 413004**
**फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal_sol@mahabank.co.in**

### नियम - ८ (१)
### ताबा सूचना

यास्तव, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट क्ट, 2002 अंतर्गत बँक ऑफ महाराष्ट्रचा प्राधिकृत अधिकारी असून, आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, 2002 च्या नियम 3 सह वाचलेल्या कलम 13 च्या उप-कलम (12) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि जामीनदारांना सदर सूचना मिळाल्याच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत संपूर्ण देय रक्कम परत करण्याची मागणी करणारी मागणी सूचना दिनांक 22/09/2025 रोजी जारी केली आहे..

कर्जदाराने रक्कम परत करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, याद्वारे कर्जदार, जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचित करण्यात येते की, अधोस्वाक्षरीकर्त्याने 20/12/2025 रोजी कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (4) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रूल्स, 2002 च्या नियम 8 सह वाचून, खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा सांकेतिक ताबा घेतला आहे.

विशेषतः कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सावध करण्यात येते की त्यांनी या मालमत्तांशी कोणताही व्यवहार करू नये आणि मालमत्तांशी केलेला कोणताही व्यवहार वर नमूद केलेल्या रकमेसाठी बँक ऑफ महाराष्ट्रच्या भाराच्या अधीन असेल.

सुरक्षित मालमत्ता सोडवण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात, कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम 13 च्या उप-कलम (8) च्या तरतुदींकडे वेधले जाते. आहे.

| अ.क्र. | शाखा, कर्जदार आणि जामीनदार यांचे नाव | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | डिमांड नोटिसची तारीख आणि एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| 1 | **शाखा- नवी पेठ**<br>**कर्जदार -**<br>**1. श्री. परमेश्वर बंडप्पा हावळे**<br>8, गोकुळ अपार्टमेंट, सम्राट चौक, बुधवार पेठ, जुना कारंबा नाका जि-सोलापूर 413002<br>**2. श्रीमती विजयालक्ष्मी परमेश्वर हावळे**<br>8, गोकुळ अपार्टमेंट, सम्राट चौक, बुधवार पेठ, जुना कारंबा नाका जि-सोलापूर 413002<br>मोब-8530959600 | सर्व्हे क्रमांक 85/A/3A/1/85/A/3A/2, प्लॉट क्रमांक 7, रो हाऊस युनिट क्रमांक 6/102 आणि 6/202, तळमजला आणि दुसरा मजला, पर्वत नगर, देगाव, उत्तर सोलापूर, जिल्हा सोलापूर-413007 येथील मालमत्तेचे नोंदणीकृत गहाण/साम्यिक गहाण समाधानकारकपणे पूर्ण झाले आहे.<br>**सीमा :-** पूर्व : रो हाऊस क्रमांक 6/103, दक्षिण : पुढील मोकळी जागा, पश्चिम : मागील मोकळी जागा, उत्तर : रो हाऊस क्रमांक 6/101 | **मागणी सूचना :**<br>दिनांक : 22/09/2025<br>रु. 27,76,711.00/- (रुपये सत्तावीस लाख शहात्तर हजार सातशे अकरा फक्त) अधिक लागू न केलेले व्याज २२/०९/२०२५ पासून कर्जाची रक्कम वसूल होईपर्यंत<br>**सांकेतिक ताबा दिनांक :**<br>२०/१२/२०२५ |

**ठिकाण - सोलापूर**
**दिनांक - २०/१२/२०२५**

**सही/-**
**मुख्य व्यवस्थापक आणि**
**प्राधिकृत अधिकारी, सोलापूर झोन.**

## बँक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra

**प्रधान कार्यालय/ Head Office**
**लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5**
**आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur**
**आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड़, जुले सोलापूर, सोलापुर - 413004**
**फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal_sol@mahabank.co.in**

### नियम - ८ (१)
### ताबा सूचना

जेथे, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट क्ट, 2002 अंतर्गत बँक ऑफ महाराष्ट्रचा प्राधिकृत अधिकारी असून, आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, 2002 च्या नियम ३ सह वाचलेल्या कलम 13 च्या उप-कलम (12) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि जामीनदारांना सदर सूचना मिळाल्याच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत संपूर्ण देय रक्कम परत करण्याची मागणी करणारी मागणी सूचना दिनांक 22/09/2025 रोजी जारी केली आहे.

कर्जदाराने रक्कम परत करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, याद्वारे कर्जदार, जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचित करण्यात येते की, अधोस्वाक्षरीकर्त्याने 20.12.2025 रोजी कायद्याच्या कलम 13 च्या उप-कलम (4) सह सुरक्षा हित अंमलबजावणी नियम, 2002 च्या नियम 8 अंतर्गत त्याला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा सांकेतिक ताबा घेतला आहे.

विशेषतः कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सावध करण्यात येते की, त्यांनी या मालमत्तांशी कोणताही व्यवहार करू नये आणि या मालमत्तांशी केलेला कोणताही व्यवहार, वर नमूद केलेल्या रकमेसाठी बँक ऑफ महाराष्ट्रच्या भाराच्या अधीन असेल.

सुरक्षित मालमत्ता परत मिळवण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात, अधिनियमाच्या कलम 13 च्या उप-कलम (8) मधील तरतुदींकडे कर्जदाराचे लक्ष वेधण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाखा, कर्जदार आणि जामीनदार यांचे नाव | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | डिमांड नोटिसची तारीख आणि एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| 1 | **शाखा- नवी पेठ**<br>**कर्जदार -**<br>**श्री. माधव किसन शिकरे**<br>**(कर्जदार)**<br>पत्ता: 255 उद्धव नगर, लक्ष्मी मंदिराच्या मागे, सैफुल विजापूर रोड, सोलापूर, इंदिरा नगर सोलापूर 413004.<br>**सौ. अंजू माधव शिकरे**<br>पत्ता : 255 उद्धव नगर, लक्ष्मी मंदिराच्या मागे, सैफुल विजापूर रोड, सोलापूर, इंदिरा नगर सोलापूर 413004 | प्लॉट क्रमांक 255, जुना सर्वेक्षण क्रमांक 340, नवीन सर्वेक्षण क्रमांक 100, क्षेत्रफळ 92.93 चौरस मीटर, जो सोलापूर महानगरपालिकेच्या शहर विस्तारित हद्दीतील, उत्तर सोलापूर येथील माजरेवाडी, उद्धव नगर भाग 1 येथे स्थित आहे, त्याचा समन्यायी गहाणखत.<br>**चतुःसीमा खालीलप्रमाणे:-** पूर्व - 18 फूट रुंद रस्ता, दक्षिण - 18 फूट रुंद रस्ता, पश्चिम - प्लॉट क्रमांक 256, उत्तर - प्लॉट क्रमांक 258 | **मागणी सूचना:**<br>दिनांक : 22/09/2025.<br>रु. 8,86,316/- (आठ लाख शहाऐंशी हजार तीनशे सोळा रुपये फक्त) अधिक लागू नसलेले व्याज 22/09/2025 पासून कर्ज वसूल होईपर्यंत<br>**सांकेतिक ताबा दिनांक :**<br>२०/१२/२०२५ |

**ठिकाण - सोलापूर**
**दिनांक - २०/१२/२०२५**

**सही/-**
**मुख्य व्यवस्थापक आणि**
**प्राधिकृत अधिकारी, सोलापूर झोन.**


CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## कोहली, पंतची अर्धशतके, दिल्लीचा गुजरातवर विजय

**बंगळुरू, दि.२६ डिसेंबर-**

येथील भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या सेंटर ऑफ एक्सलन्स (सीओई) मैदानावर विजय हजारे ट्रॉफीच्या एलिट गट ड सामन्यात विराट कोहली व ऋषभ पंतने झळकावलेल्या अर्धशतकांच्या बळावर दिल्लीने गुजरातवर ७ धावांनी निसटता विजय मिळवला.


रुद्र नगराळे


कबीर कीर्तीकर

## मास्टर क्रिकेट : एनजी व रोहन अकादमीचे विजय

**सोलापूर, दि.२६ डिसेंबर-**

मास्टर क्रिकेट अकदमीच्या १२ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेत निलेश गायकवाड व रोहन अकादमीने विजय मिळविले. डोणगाव रोडवरील पुष्प अकदमीच्या मैदानावर झालेल्या या सामन्याचे मानकरी कबीर कीर्तीकर व रुद्र नगराळे हे ठरले. गुरुवारी झालेल्या सामन्यात एनजीक्रिकेट अकॅडमीने साळुंखे अकादमीस ३५ धावांनी हरविले. शुक्रवारी झालेल्या सामन्यात रोहन अकॅडमीने साळुंखे अकादमीवर ८ गडी राखून मात केली. **संक्षिप्त धावफलक :** नागेश साळुंखे अकॅडमी : ३६.४ षटकांत सर्वबाद १२०( तनुजा माळी ३१, रुद्र नगराळे ३-३८) पराभूत विरुद्ध रोहन क्रिकेट अकॅडमी : २७.१ षटकात २ बाद १२४ (वेदांत हक्के नाबाद ५०, श्लोक अधटराव १-२४). निलेश गायकवाड क्रिकेट अकॅडमी : ४७.५ षटकांत सर्वबाद २२१(कबीर कीर्तीकर ४८, संज्योत मोरे ४-४२) वि. वि. साळुंखे क्रिकेट अकॅडमी : ४८ षटकात सर्वबाद १८६ (अर्णव भोसले ३३, कबीर कीर्तिकर २-२९)

## सुयश गुरुकूलमध्ये आजपासून कै. श्रीकांतराव किर्लोस्कर बॅडमिंटन स्पर्धा

**सोलापूर, दि. २६ डिसेंबर-**

कै. श्रीकांतराव किर्लोस्कर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ कै. श्रीकांतराव किर्लोस्कर बॅडमिंटन स्पर्धा (पर्व ४थे) शनिवार २७ डिसेंबरला सकाळी ११.३० विजापूर रोडवरील आत्मन, सुयश गुरुकुल येथे आयोजित केली आहे. या स्पर्धेचे उद्घाटन सोलापूर शहर पोलीस आयुक्त एम. राजकुमार, प्रिसीजन कॅमशॉफ्टचे चेअरमन यतीन शहा, प्रिसीजन फौऊंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. यामध्ये प्रिसिजन, गुप्ता बँगल्स, क्रॉस इंटरनॅशनल,विवेकानंद प्रतिष्ठान,कोकिळाबेन अंबानी हॉस्पिटल, शुद्धहोम ज्वेलर्स, मधूमिता, गृहलक्ष्मी हॉटेल असे आठ संघ भाग घेणार आहेत. स्पर्धेतील विजेत्या, उपविजेत्या व तृतीय संघास अनुक्रमे ३०, २० व ११ हजार रुपयांची बक्षिसे देण्यात येणार आहेत. या स्पर्धेसाठी किरण देशपांडे (मुख्य पंच) आणि त्यांची काम पाहतील. क्रीडाप्रेमींनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आवाहन टीम मधुमिता इव्हेंट्सचे महेंद्र देवस्थळी यांनी केले आहे.

## शिवाजी महाविद्यालय बार्शीत २९ डिसेंबरपासून राज्य व्हॉलिबॉल स्पर्धा

**बार्शी दि. २६ डिसेंबर-**

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शीचे संस्थापक व संवर्धक कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२३व्या जयंतीनिमित येथील श्री शिवाजी महाविद्यालयात २९ व ३० डिसेंबर या कालावधीत राज्य निमंत्रित पुरुष गट व्हॉलिबॉल स्पर्धा आयोजित केल्याची माहिती प्राचार्य डॉ. अब्दुल शेख यांनी दिली. या स्पर्धा श्री शिवाजी महाविद्यालय बार्शी, महाराष्ट्र आणि सोलापूर जिल्हा व्हॉलीबॉल असोसिएशन तसेच क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केली आहे. या स्पर्धेत राज्यातील दहा संघ सहभागी होणार आहेत. या स्पर्धेतील प्रथम, द्वितीय क्रमांकास २१, १५, ११ हजार रुपये रोख, प्रमाणपत्र व ट्रॉफी दिली जाणार आहे. क्रीडाप्रेमींनी याचा लाभ घेण्याचे आवाहन संयोजकांनी केले आहे.




नवी दिल्ली येथे वीर बाल दिवसनिमित्त आयोजित समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी क्रिकेटपटू वैभव सूर्यवंशीला प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार प्रदान केला


# भारताची वैष्णवी आडकर एकेरीत उपांत्य, दुहेरीत अंतिम फेरीत

### जामश्री-इलिझियम सोलापूर ओपन महिलांच्या आयटीएफ टेनिस स्पर्धा : चौधरी, भामिदिप्ती यांचा उपांत्य फेरीत प्रवेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, २६ डिसेंबर-**

महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटना व सोलापूर जिल्हा लॉन टेनिस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या ओॲसिस, प्रिसीजन, इलिझियम-जामश्री व बालाजी अमाईन्स पुरस्कृत जामश्री-इलिझियम सोलापूर ओपन महिलांच्या ३० हजार रकमेच्या आयटीएफ टेनिस स्पर्धेत एकेरीत वैष्णवी आडकर, वैदेही चौधरी, श्रीवल्ली रश्मिका भामिदिप्ती या तीन भारतीय खेळाडूंनी दिमाखात उपांत्य फेरीत प्रवेश केला. वैष्वीने दुहेरीतही अंतिम फेरी गाठली.

कुमठा नाका जिल्हा क्रीडा संकुलातील एमएसएलटीए टेनिस सेंटर येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत एकेरीत उपांत्यपूर्व फेरीत भारताच्या दुसऱ्या मानांकित श्रीवल्ली रश्मिका भामिदिप्ती हिने भारताच्या १६ वर्षीय माया राजेश्वरन रेवतीचा ६-२, ५-७, ६-१ असा संघर्षपूर्ण पराभव करून आपली विजयी घौडदौड कायम ठेवली. हा सामना १ तास ५३ मिनिटे चालला. आठव्या मानांकित भारताच्या वैष्णवी आडकर हिने अव्वल मानांकित खेळाडूला पराभवाचा धक्का देणाऱ्या रशियाच्या मारिया गोलोविनाचा ६-२, ३-६, ७-६(७) असा पराभव



करून दिमाखात उपांत्य फेरी गाठली. हा सामना २ तास ५१ मिनिटे चालला. आणखी एका चुरशीच्या लढतीत भारताच्या वैदेही चौधरी हिने फ्रांसच्या सेनिया इफारमोव्हाचे आव्हान ४-६, ६-४, ७-५असे संपुष्टात आणले. जपानच्या मिचिका ओझेकी हिने होनोका कोबायाशीचा ६-४, ६-२ असा पराभव करून उपांत्य फेरीत धडक मारली.

दुहेरीत उपांत्य फेरीत दुसऱ्या मानांकित भारताच्या वैष्णवी आडकर व अंकिता रैना या जोडीने चौथ्या मानांकित भारताच्या श्रीवल्ली रश्मिका भामिदिप्ती व वैदेही चौधरी यांचा २-६, ७-६(१), १०-३ असा पराभव करून अंतिम फेरीत धडक मारली. दुसऱ्या उपांत्य सामन्यात झील



देसाई (भारत)/एलिना नेपली या जोडीने होनोका कोबायाशी व मिचिका ओझेकी (जपान) या जोडीस ३-६, ६-२, १०-६ असे हरविले.

## ॲशेस कसोटी मालिकेत पहिल्या दिवशी विक्रमी २० बळी

मेलबर्न : प्रतिष्ठेच्या ॲशेस कसोटी मालिकेतील चौथ्या सामन्याच्या पहिल्याच दिवशी जागतिक विक्रमी प्रेक्षकांसमोर विक्रमी २० बळींची नोंद झाली. ऑस्ट्रेलियाच्या १५२ धावांना प्रत्युत्तर देताना इंग्लंडचा संपूर्ण संघ ११० धावंतच गारद झाला. तरीही ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात इंग्लंडवर ४२ धावांची आघाडी घेतली. खेळ थांबला तेव्हा ऑस्ट्रेलियाने दुसऱ्या डावांत बिनबाद ४ धावा केल्या. आता ऑस्ट्रेलिया सध्या ४६ धावांनी आघाडीवर आहे. दिवसाचा खेळ मेलबर्न क्रिकेट मैदानावर क्रिकेटच्या एका दिवसासाठीच्या जागतिक विक्रमी प्रेक्षकांसमोर खेळला गेला. ९४,१९९ ही उपस्थितीची संख्या एमसीजीवर २०१५ च्या विश्वचषक अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड यांच्यातील सामन्याच्या ९३,०१३ च्या संख्येला मागे टाकणारी होती. इंग्लंडने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर जोश टंगने कारकिर्दीतील सर्वोत्तम ४५ धावांत ५ बळी अशी कामगिरी करत ऑस्ट्रेलियाला सर्वबाद १५२ धावांवर रोखले. प्रत्युत्तरात, इंग्लंडने २९.५ षटकांत ११० धावा केल्या, यात मायकेल नेसरने ४५ धावांत ४ बळी घेतले. जोश टंगने सुरुवातीला तीन बळी घेतले.

# किशोर किशोरी गटात सोलापूरसह, सातारा, धाराशिवचा उपउपांत्य फेरीत प्रवेश



### ३९ वी किशोर-किशोरी राज्य अजिंक्यपद खो खो स्पर्धा

**मुंबई, दि. २६ डिसेंबर-**

वडाळ्यातील शारीरिक शिक्षण मंडळाच्या मैदानावर सुरू असलेल्या ३९ व्या किशोरकिशोरी (सब ज्युनिअर) राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेने दुसऱ्या दिवशी अक्षरशः रंगत पकडली. प्रत्येक सामन्यात वेग, चपळता, रणनीती आणि जिद्दीचा संगम दिसून आला.

किशोर व किशोरी गटात धाराशिव, मुंबई, मुंबई उपनगर, पुणे, अहिल्यानगर, सोलापूर, सांगली आणि सातारा संघांनी दमदार खेळाचे प्रदर्शन करत उपउपांत्य फेरीत प्रवेश केला आणि स्पर्धेची धग अधिकच वाढवली.

**किशोर गट : धाराशिवची बीडवर ठसठशीत सरशी**

धाराशिव संघाने बीडवर २८-१० असा विजय मिळवत एक डाव राखून १८ गुणांनी बाजी मारली. धाराशिवकडून प्रफुल वसावे (४.५० मि. संरक्षण, ६ गुण), सुरज काकडे (नाबाद १.२० मि. संरक्षण, ४ गुण), ओम पवार (२ मि. संरक्षण, ४ गुण) यांनी सलग प्रभावी खेळ केला. बीडकडून सौरभ खरात (१.३५ मि. संरक्षण, ४ गुण), श्रीयश जाधव (१ मि. संरक्षण) यांनी लढत दिली.

**किशोरी गट : लातूरचा संभाजीनगरवर अटीतटीचा विजय**

किशोरी गटात लातूर विरुद्ध छत्रपती संभाजीनगर हा सामना उत्कंठावर्धक ठरला. लातूरने २६-२४ असा २ गुणांनी विजय मिळवला. मध्यंतराला १२१३ अशी पिछाडी असतानाही दुसऱ्या डावात लातूरने खेळ उंचावला. लातूरकडून सायली देशमुख (२.४० व १.२० मि. संरक्षण, ६ गुण), संस्कृती शिंदे (१.४० मि., नाबाद १.२० मि. संरक्षण), संध्या घोगरे (६ गुण) यांनी निर्णायक खेळी केली. संभाजीनगरकडून ओजस्वी शिंदे (१.३५ व १.२० मि. संरक्षण, २ गुण), मधुरा पवार (८ गुण) यांचे प्रयत्न कमी पडले.

**जालन्याचा नांदेडवर संयमी विजय**

जालना विरुद्ध नांदेड सामन्यात जालनाने ३१-२४ असा ७ गुणांनी विजय मिळवला. मध्यंतराला मिळालेली एक गुणाची आघाडी जालनाने कायम राखली. जालनाकडून समिक्षा (३.३० मि. संरक्षण), क्रांती मदन (२.२० व १.४० मि. संरक्षण, ८ गुण) यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. नांदेडकडून संगीता मटके (२.२० व १.२० मि. संरक्षण), प्राची डिकळे (६ गुण) यांनी झुंज दिली.

**संक्षिप्त निकाल : किशोर गट :**

रायगड वि.वि. लातूर ३१-१९. नंदुरबारने वि.वि. सिंधुदुर्गवर ४१-०८ (एक डावाने), रत्नागिरी वि. वि. धुळ्याचा २६-१७ (मध्यंतर १०-१०) अहिल्यानगर वि. वि. नांदेड २९-१३ ( एक डावाने), मुंबई वि. वि. परभणी २६-२५ (मध्यंतर १४-११. मुंबई उपनगर वि. वि. हिंगोलीवर ३२-०५ (एक डावाने).

**किशोरी गट :** नंदुरबार वि. वि. रायगडचा ४८-२०. अहिल्यानगर वि. वि. सिंधुदुर्गचा ४४-०२ ( एक डावाने) बीड वि. वि. मुंबई उपनगरवर ३०-२४ (मध्यंतर २०-१२) असा १.२० मि. राखून.

**असे होणार उपउपांत्यपूर्व सामने**

**मुले :** धाराशिव विरुद्ध पालघर, नंदुरबार विरुद्ध रत्नागिरी, रायगड विरुद्ध सातारा, पुणे विरुद्ध मुंबई उपनगर, सांगली विरुद्ध नाशिक, जालना विरुद्ध ठाणे, मुंबई विरुद्ध अहिल्यानगर, सोलापूर विरुद्ध संभाजीनगर.

**मुली:** सोलापूर विरुद्ध अहिल्यानगर, ठाणे विरुद्ध मुंबई, सांगली विरुद्ध जळगाव, परभणी विरुद्ध सातारा, नंदुरबार विरुद्ध धाराशिव, लातूर विरुद्ध पुणे, बीड विरुद्ध जालना, नाशिक विरुद्ध नांदेड.




# मॉडेल क्रिकेट अकॅडमीस आपटे चषक

### लातूरच्या रोहन क्रिकेट अकॅडमीचा दणदणीत पराभव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ डिसेंबर -**

सोळा वर्षांखालील मुलांच्या वन डे क्रिकेट स्पर्धेत अंतिम सामन्यात लातूरच्या रोहन क्रिकेट अकॅडमीचा दणदणीत पराभव करत येथील मॉडेल क्रिकेट अकॅडमीने आपटे चषकावर आपले नाव कोरले. येथील दयानंद महाविद्यालयाच्या मैदानावर ५० षटकांच्या वन डे क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यात मॉडेल क्रिकेट अकॅडमीसह आठ संघांनी सहभाग नोंदवला होता. या संपूर्ण स्पर्धेत मॉडेल क्रिकेट अकॅडमीने कर्णधार झैद शेख याच्या नेतृत्वाखाली उत्कृष्ट आणि सांघिक कामगिरी करत भंडारी स्पोर्टस् क्लब, युनायटेड क्रिकेट अकॅडमी, रोहन क्रिकेट अकॅडमी, साऊथ सोलापूर क्रिकेट अकॅडमी यांचा पराभव करुन अंतिम फेरीत शानदार प्रवेश केला.

अंतिम सामना हा लातूरच्या रोहन क्रिकेट अकॅडमी बरोबर झाला. यात प्रथम फलंदाजी करताना रोहन क्रिकेट अकॅडमीने ४० षटकात ८ बाद १५३ धावा केल्या. मॉडेल कडून कर्णधार झैद शेख याने ८ षटकांत २८ धावांत २, आदित्य जाधव याने ५ षटकांत २२ धावात २, तर प्रतिक्षा नंदर्गीने ६ षटकांत १८ धावा देत १ बळी मिळवून उत्कृष्ट गोलंदाजी केली. रोहन क्रिकेट अकॅडमीने दिलेल्या लक्ष्याचा यशस्वी पाठलाग करताना, मॉडेल क्रिकेट अकॅडमीने ३६. ३ षटकांत ६ बाद १५७ धावा केल्या आणि ४ गडी राखून दणदणीत विजय प्राप्त करुन, आपटे चषकावर आपले नाव कोरले. मॉडेल कडून ययाती देवकते ५१, आदिराज रणसिंग ३८ आणि श्लोक आनंद यांनी २९ धावा करुन उत्कृष्ट फलंदाजीचे प्रदर्शन करुन या विजयात आपले महत्त्वपूर्ण योगदान दिले. कर्णधार झैद शेख हा सामनावीर ठरला. या विजयात संघातील अर्जुन दिड्डी (यष्टीरक्षक), हर्ष राऊत, आयुषा भोसले, संस्कार गवळी, राधेश्याम मेरगू, शौर्य जाधव, निमिष कालेल यांनी ही लक्षवेधी कामगिरी करत आपला मोलाचा वाटा उचलला.

या नेत्रदीपक विजयाबद्दल मॉडेल ॲकॅडमीचे प्रमुख मार्गदर्शक माजी रणजीपटू तथा महाराष्ट्र राज्य रणजी निवड समिती सदस्य रोहित जाधव, महाराष्ट्र राज्य क्रिकेट संघाचे माजी खेळाडू तथा कोचिंग बियाँड लेव्हल वन कोच सत्यजीत जाधव, युनिव्हर्सिटीचे माजी खेळाडू अक्षय हावळे तसेच सहाय्यक प्रशिक्षक गौरव वडे यांनी संघातील सर्व खेळाडुंचे अभिनंदन करुन त्यांना शुभेच्छा दिल्या.

# अर्जुन पुरस्काराच्या शिफारशीवरून खो-खो वर्तुळात खळबळ; महाराष्ट्र असोसिएशनचा तीव्र आक्षेप!

### महाराष्ट्रातील गुणवंत खेळाडूंवर अन्याय; केंद्रीय क्रीडामंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांकडे सखोल चौकशीची मागणी

**अजितकुमार संगवे । तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, २६ डिसेंबर-**

केंद्रीय क्रीडा मंत्रालयाने सन २०२४-२५ च्या प्रतिष्ठित अर्जुन पुरस्कारासाठी खो-खो खेळाकरिता केलेल्या एका शिफारशीवरून आता नवा वाद पेटला आहे. महाराष्ट्र खो-खो असोसिएशनने या शिफारशीवर तीव्र आक्षेप नोंदवला असून, या प्रकरणाची तातडीने निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केंद्रीय क्रीडा मंत्रालयाकडे केली आहे.

**नेमके प्रकरण काय?**

महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सरचिटणीस डॉ. चंद्रजित जाधव यांनी केंद्रीय युवा कार्य आणि क्रीडा मंत्री रक्षा खडसे आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष अजित पवार यांना पत्र लिहून या गंभीर विषयाकडे लक्ष वेधले आहे. अर्जुन पुरस्कारासाठी दिल्लीच्या निर्मला भाटी यांच्या नावाची शिफारस करण्यात आली आहे; मात्र ही शिफारस करताना सादर केलेली प्रमाणपत्रे आणि कागदपत्रे संशयास्पद असल्याचा दावा असोसिएशनने केला आहे.




**महाराष्ट्र असोसिएशनचे प्रमुख आक्षेप**

**अनधिकृत स्पर्धांचा आधार:** निर्मला भाटी यांनी सादर केलेली आंतरराष्ट्रीय सहभागाची प्रमाणपत्रे भारत सरकार किंवा भारतीय क्रीडा प्राधिकरणद्वारे मान्यताप्राप्त नसलेल्या स्पर्धांची असल्याचा दावा पत्रात करण्यात आला आहे.

**मैत्रीपूर्ण सामन्यांचा बनाव:** भारत-नेपाळ दरम्यान झालेल्या ज्या टेस्ट मॅचचा आधार या निवडीसाठी घेण्यात आला आहे, ती केवळ एक मैत्रीपूर्ण लढत होती. त्यासाठी कोणतीही अधिकृत राष्ट्रीय निवड प्रक्रिया राबवण्यात आली नव्हती. त्यात प्रामुख्याने फक्त उत्तर भारतातील काही मोजक्या राज्यांचे खेळाडू सहभागी झाले होते.

> **गुणवत्तेच्या आधारावरच निवड व्हावी**
> ''महाराष्ट्राकडून अर्ज केलेल्या प्रियांका इंगळे, सुयश गरगटे आणि अनिकेत पोटे यांसारख्या उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या आंतरराष्ट्रीय सुवर्णपदक विजेत्या खेळाडूंवर हा अन्याय आहे. केवळ पारदर्शकता आणि गुणवत्तेच्या आधारावरच खेळाडूंची निवड व्हावी, ही आमची ठाम भूमिका आहे.''
> **- प्रा. डॉ. चंद्रजित जाधव,**
> सरचिटणीस,
> महाराष्ट्र खो-खो असोसिएशन

**गुणवत्तेकडे दुर्लक्ष**

निर्मला भाटी यांनी राष्ट्रीय स्तरावर एकही सुवर्णपदक जिंकलेले नाही. याउलट, महाराष्ट्रातील प्रियांका इंगळे (भारतीय महिला संघ कर्णधार), सुयश गरगटे (विश्वचषक फायनलमधील सर्वोत्तम खेळाडू) आणि अनिकेत पोटे (मुंबई उपनगर) यांसारख्या अनेक सुवर्णपदक विजेत्या व जागतिक स्तरावर चमकलेल्या खेळाडूंनी या पुरस्कारासाठी अर्ज केला होता, तरीही त्यांच्याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे.

महाराष्ट्र खो-खो असोसिएशनने या अन्यायाविरुद्ध दाद मागितली असून, आता केंद्र सरकार यावर काय निर्णय घेणार, याकडे क्रीडा प्रेमींचे लक्ष लागले आहे.

**आतापर्यंतचे खो-खोतील अर्जुन पुरस्कार विजेते मानकरी**

**महाराष्ट्रातील:** श्रीरंग इनामदार व उषा नगरकर (१९७५, पुणे), शेखर धारवाडकर (१९७७ ), हेमंत टाकळकर (१९८२, दोघे पुणे), वीणा परब-गोरे (१९८३, मुंबई उपनगर), सुरेखा कुलकर्णी (१९८४, पुणे), सारिका काळे-खोत (२०१९, धाराशिव)

**महाराष्ट्राबाहेरील :** सुधीर परब, अचला देवरे, भावना पारीख (१९७१ ते ७३, सर्व बडोदा) सुषमा सारोळकर (१९७४, इंदूर), एन. प्रकाश (१९८५), शोभा नारायण (१९९८, दोघे कर्नाटक), नसरीन (२०२२, दिल्ली).

# आरोपीस दिल्लीतून अटक; फिर्यादीस परत केली गुन्ह्यातील रक्कम

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि २६ डिसेंबर -**

शहर पोलिसांनी चार वर्षापूर्वी दाखल असलेल्या गुन्हयातील आरोपी दिल्लीतून अटक करुन फिर्यादीस संपूर्ण रक्कम हस्तगत करुन दिली.

याबाबत सविस्तर हकिकत अशी की, दि. १३ फेब्रुवारी २०२२ रोजी यातील फिर्यादी महादेव विठ्ठल मिरगणे, वय ५३ वर्षे, धंदा शिक्षक, रा. म्हाडा कॉलनी, नवीन पाण्याचे टाकीसमोर, गाडेगांव रोड यांना क्रेडीट कार्ड डिपार्टमेंट मधून बोलत असल्याचे सांगून त्यांची पुर्ण माहिती विचारुन घेतली. क्रेडीट कार्ड ब्लॉक करण्यासाठी मोबाईलवर आलेला ओ.टी. पी. सांगितल्याने काही वेळातच फिर्यादीच्या क्रेडीट कार्डवरुन एकूण १ लाख ९८ हजार २०८ एवढी रक्कम कट झालेबाबत मेसेज आला होता. त्यांनतर बार्शी शहर पोलीस ठाणेस गुन्हा दाखल झाला होता. सदर गुन्हयाचा तपास सायबर पोलीस ठाणे, तसेच बार्शी शहर पोलीस ठाणे करीत होते.



पोलीस अधीक्षक श्री अतुल कुलकर्णी यांनी २०२२ मधील गुन्हयांचा आढावा घेतला असता सदरचा गुन्हा प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले. सदरचा गुन्हा पुढील तपासासाठी बार्शी शहर पोलीस ठाणेस वर्ग करुन नमुद गुन्हयात मार्गदर्शन करुन योग्य त्या सुचना केल्या.

गुन्हयातील आरोपी हा दिल्ली येथील असल्याने दिल्ली येथे जाण्यास पोलीस अधीक्षक यांच्या पूर्वपरवानगीने पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांनी पोसई महेश गळगटे, पोकॉ दिगंबर बरबडे, पोकॉ सचिन नितनात यांचे एक पथक दिल्ली येथे पाठविले. सदरच्या पथकाने नमूद आरोपीची गोपनीय माहिती काढून तो सदर बजार नॉर्थ दिल्ली या परिसरातच राहत असल्याची खात्री केली.

पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांनी मागील आठवडयात पोसई अभय माकणे, पोकॉ दिगंबर बरबडे, पोकों सचिन नितनात, पोकों अवी पवार यांचे एक पथक दिल्ली येथे पाठविले. सदर बजार पोलीस ठाणे, नॉर्थ दिल्ली, दिल्ली या परिसरात आरोपी नरेश महेशचंद शर्मा, वय ४५ वर्षे, व्यवसाय मजुरी, रा. २२४०, बगीची रघुनाथ, नार्थ दिल्ली, दिल्ली यास कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करुन आरोपीस बार्शी शहर पोलीस ठाणे येथे आणले. बार्शी येथे आल्या नंतर आरोपीने फिर्यादीची संपूर्ण रक्कम १,९८,२०८/- रु काही वेळातच फिर्यादीस परत केली.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अशोक सायकर, पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे, यांच्या मार्गदर्शनाखाली पोसई महेश गळगटे, पोसई अभय माकणे, पो.कॉ. दिगंबर बरबडे, पो.कॉ. सचिन नितनात, पोकों अवि पवार, साबयर पोलीस ठाणेचे पोकों रतन जाधव यांनी केली.

बार्शी शहर पोलीस ठाणे पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांनी बार्शी शहरातील नागरिकांना आवाहन केले की, क्रेडीट कार्ड, ए.टी.एम. कार्ड, आधार कार्ड संदर्भात तसेच बँकेतून बोलत असल्याचे सांगणाऱ्या अनोळखी व्यक्तींना कोणत्याही प्रकारे ओ.टी.पी. देऊ नये. तसेच आपल्यासोबत सायबर फसवणूक झाली आहे असे समजताच १९३० यावर कॉल करून तात्काळ तक्रार नोंदवावी.

## महत्वाचे...



## सांगोल्यातील आपुलकी प्रतिष्ठानचे पुरस्कार जाहीर; एक जानेवारीला वितरण

**सांगोला, दि.२६ डिसेंबर -**

सांगोल्यातील आपुलकी प्रतिष्ठानच्या वतीने यावर्षी कृष्णाबाई आगतराव खटकाळे, तानाजी नामदेव सांगोलकर, बसवेश्वर गुंडाप्पा झाडबुके, वैभव विठ्ठल गलांडे व न्यू स्टार गणेश तरुण मंडळ, तिप्पेहाळी यांना पुरस्कार जाहीर करण्यात आले असून दि.१ जानेवारी २०२६ रोजी सायं.५ वा. सदानंद मल्टिपर्पज हॉल, मिरज रोड, सांगोला येथे मान्यवरांच्या उपस्थितीत हे पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती आपुलकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र यादव व सचिव संतोष महिमकर यांनी दिली. पतीच्या निधनानंतर वेळोवेळी प्रोत्साहन देत मुलांना स्वत:च्या पायावर उभे करण्यासाठी अविरत कष्ट घेवून समाजापुढे आदर्श निर्माण केलेल्या सांगोल्यातील कृष्णाबाई खटकाळे यांना कृतिशील आदर्श माता पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. २० एकरात ११ हजार डाळिंब झाडांची लागवड करुन प्रत्येक वर्षी भरघोस असे उत्पन्न मिळवण्यात यशस्वी झालेले बलवडी येथील तानाजी सांगोलकर यांना सृजनशील शेतकरी पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. व्यसनमुक्तीसाठी, गोहत्या बंदी चळवळीत कार्य करणारे, नदी स्वच्छता अभियानातही उत्साहाने सामाजिक कार्य करत असलेले मेडशिंगी येथील बसवेश्वर झाडबुके यांना समाजसेवा प्रेरणा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. तर लहान वयात दोन्ही हात गमावलेल्या परंतु जिद्दीने मार्गक्रमण करत असलेल्या एखतपूर येथील वैभव गलांडे यास सार्थ स्वाभिमान पुरस्कार जाहीर झाला आहे. विविध उपक्रम राबवून सामाजिक बांधिलकी जपण्याचे कार्य करत असलेल्या सातकी वस्ती, तिप्पेहळी येथील न्यू स्टार गणेश तरुण मंडळास आदर्श सामाजिक संस्था पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

## सांगोल्यातील डॉ. सौरभ निंबाळकर यांचे केंद्रीय वैद्यकीय सेवा परीक्षेत यश

**सांगोला, दि.२६ डिसेंबर-**



केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या वतीने घेण्यात आलेल्या केंद्रीय वैद्यकीय सेवा परीक्षेत सांगोल्यातील डॉ.सौरभ संतोषकुमार निंबाळकर याने ऑल इंडिया रँक ७७ मिळवत उल्लेखनीय यश मिळविले आहे. त्याचे प्राथमिक शिक्षण पुजारवाडी (सांगोला) येथील प्राथमिक शाळेत, माध्यमिक शिक्षक सांगोला विद्यामंदिर प्रशालेत झाले. सध्या तो एमबीबीएसचे शिक्षण मुंबई येथील नायर हॉस्पिटल मधून पूर्ण करत आहे. या यशाबद्दल डॉ.सौरभ निंबाळकर याचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे. भविष्यात तो केंद्र सरकारच्या वैद्यकीय सेवेमध्ये देशसेवेसाठी महत्त्वाचे योगदान देईल असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## तू घरात राहायचे नाही, असे म्हणून एका ३९ वर्षीय महिलेला दगडाने केली मारहाण

**मंगळवेढा, दि.२६ डिसेंबर**

आंधळगाव येथे एका ३९ वर्षीय महिलेस तू राहत असलेले घर हे माझ्या पतीचे असून तू सदर घरात राहयचे नाही असे म्हणून शिवीगाळी करीत दगड घेवून मारुन गंभीर जखमी केल्याप्रकरणी वनिता दाजी




लेंडवे यांच्याविरुध्द पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील जखमी फिर्यादी संगीता लेंडवे यांना दि.२४ डिसेंबर रोजी दुपारी ३ वाजता यातील आरोपी महिलेने घराच्या समोर येवून राहत असलेले घर हे माझे पती दाजी बापू लेंडवे यांच्या नावावर असून तू सदर घरात राहयचे नाही असे म्हणून शिवीगाळी दमदाटी करत तेथे पडलेला दगड घेवून फिर्यादीच्या हातावर व चेहर्यावर मारुन गंभीर जखमी केल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलीस हवालदार निंबाळकर हे करीत आहेत.



## न.प.निवडणुकीत शिवसेनेबरोबर युतीची गरज होती; सांगोल्यातील जुन्या भाजप कार्यकर्त्याची खंत

**सांगोला, दि.२६ डिसेंबर -**

ज्याप्रमाणे राज्य सरकारमध्ये भाजप व शिवसेना यांची युती आहे त्याचप्रमाणे सांगोला नगरपालिका निवडणुकीत शेकाप बरोबर युती न करता शिवसेनेबरोबर युतीची गरज होती अशी खंत सांगोल्यातील जुन्या भाजप कार्यकर्त्यांनी आयोजित पत्रकार परिषदेमध्ये व्यक्त केली. यावेळी भाजपचे शिवाजीराव गायकवाड, राजश्री नागणे, नवनाथ पवार, नागेश जोशी, वैजयंती देशपांडे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. सांगोला नगरपालिका निवडणुकीमध्ये भाजपने पूर्ण पॅनल उभा करण्याची गरज होती. तसेच ज्याप्रमाणे नुकत्याच प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांना उमेदवारी दिली त्याचप्रमाणे जुन्या कार्यकर्त्यांचा ही उमेदवारी देताना पक्षाने विचार करण्याची गरज होती. नगराध्यक्ष पदासाठी उभारलेल्या उमेदवाराला कमळ चिन्ह मिळाले परंतु नगरसेवक पदासाठी उभारलेल्या भाजपच्या उमेदवारांना कमळ चिन्ह मिळाले नाही त्यामुळे मोठे नुकसान झाले अशी खंत यावेळी भाजपच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी बोलताना व्यक्त केली.

## निधन वृत्त...

### शंकर उरणे गुरुजी

**वेळापूर, दि. २६ डिसेंबर-**



येथील शंकर शिवराम उरणे गुरुजी (वय ९९) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, नातवंडे व परतुंडे असा परिवार आहे. ते अरुण उरणे व उदय उरणे यांचे वडील होत.



## शिवाजी पॉलिटेक्निकमध्ये राष्ट्रीय गणित दिन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२६ डिसेंबर -**

थोर भारतीय गणित तज्ञ श्रीनिवास राम ानुजन यांच्या जयंतीनिमित्त दि.२२ डिसेंबर रोजी सांगोल्यातील शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये राष्ट्रीय गणित दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरूवात सांगोला विद्यामंदिर प्रशालाचे माजी प्राचार्य भीमाशंकर पैलवान, संस्थेचे उपाध्यक्ष एम.आर.गायकवाड, कॉलेजचे प्राचार्य डॉ.आर.ए.देशमुख, प्रथम वर्ष विभागाचे विभागप्रमुख पी.जी.पवार यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व रामानुजन यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.

डॉ.आर.ए.देशमुख यांनी मनोगतात रामानुजन यांनी संख्या सिद्धांत, अनंत श्रेणी, गणितीय सूत्रे व गणितीय विश्लेषण या क्षेत्रात केलेल्या अमूल्य योगदानावर प्रकाश टाकला. यावेळी भीमाशंकर पैलवान म्हणाले, रामानुजन यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत गणितात जागतिक दर्जाचे संशोधन केले. वयाच्या अवघ्या ३२ वर्षांच्या आयुष्यात त्यांनी दिलेली गणितीय सूत्रे आजही जगातील मोठ्या वैज्ञानिकांना थक्क करतात. अभियांत्रिकी, विज्ञान, संगणक तंत्रज्ञान, अर्थशास्त्र तसेच दैनंदिन जीवनात गणिताचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. एम.आर.गायकवाड यांनी विद्यार्थ्यांनी गणिताचा उपयोग आधुनिक तंत्रज्ञान व संशोधनासाठी करावा असे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी प्रथम वर्ष विभागाचे सर्व विद्यार्थी व शिक्षकवृंद उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आर.एस.भोसले व आभार प्रदर्शन पी.जी.पवार यांनी केले.

## युडायसमध्ये टॅब नसल्याने दिव्यांग शाळेतील विद्यार्थ्यांची लागतेय अनुपस्थिति

### इयत्तेचा टॅब टाकून देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ डिसेंबर -**

केंद्र व राज्य सरकारने मोफत सक्तीचा शिक्षण कायदा केला.त्यातच सरल पोर्टल व युडायस प्रणाली वापरून पारदर्शकता आणली.मात्र दिव्यांग (म तिमंद, मुकबधिर) प्रवर्गातील शाळांमध्ये सामान्य शाळांप्रमाणे इयत्ता नसल्याने युडायसमध्ये विद्यार्थी नोंदविताना अडचण होत आहे.संपूर्ण राज्यातील दिव्यांग शाळांमध्ये ही समस्या असून विद्यार्थी उपस्थित असून देखील त्याची अनुपस्थिती लागतेय.त्यामुळे युडायसमध्ये या शाळांतील विद्यार्थी नोंदविण्यासाठी टॅब तयार करून देण्याची मागणी होत आहे.

राज्यातील दिव्यांग शाळांची पटपडताळणी करण्याचे आदेश राज्याच्या दिव्यांग आयुक्तांनी दिले. मात्र पटपडताळणीसाठी युडायसमध्ये नोंद केलेले विद्यार्थीच ग्राह्य धरले जात आहेत.मतिमंद प्रवर्गाच्या शाळांसाठी पूर्वप्राथमिक,पहिली, दुसरी, व्यवसायपूर्व अभ्यासक्रम असे वर्ग आहेत. दहावीच्या वर्गात जाईपर्यंत विद्यार्थी नापास करायचा नाही,हे पूर्वी शासनाचे धोरण असल्याने बौद्धिक क्षमता नसलेले विद्यार्थीही नववीपर्यंत पुढच्या वर्गात ढकलले जायचे.दहावीला शाळेच्या गुणवत्तेचा टक्का घसरतो म्हणून त्या विद्यार्थ्यांची गाडी नववीच्या पुढे सरकत नाही आणि आपला पाल्य मतिमंद आहे,हे लक्षात आल्यावर मग आठवी, नववीच्या विद्यार्थ्याला मतिमंद शाळेत पाठविण्यासाठी पालक पळापळी करतात.मतिमंद शाळेत प्रवेशही दिला जातो.मात्र युडायसमध्ये विद्यार्थी नोंदविण्यासाठी इयत्तेचा टॅब नसल्याने विद्यार्थी ऑफलाईन प्रवेशित होतोय. त्यात विद्यार्थ्याचे मोठे नुकसान होते.

> मुळातच मुलगा मतिमंद आहे,हे लक्षात आल्यावर व त्याचे दिव्यांग प्रमाणपत्र निघाल्यावर पालकांनी अशा मुलांना सामान्य शाळेत ठेवण्याचा आग्रह करु नये.राज्याचे दिव्यांग कल्याण सचिव तुकाराम मुंढे यांनी बौद्धिकदृष्ट्या अकार्यक्षम विद्यार्थ्यांसाठी असलेल्या शाळांमध्ये दिशा अभ्यासक्रम सक्तीचा करण्याचा घेतलेला निर्णय हा मतिमंद शिक्षण क्षेत्रातील क्रांतीकारी निर्णय आहे. इतर प्रवर्गातील विद्यार्थी सामान्य शाळेत जाऊ शकतात.मात्र मतिमंद विद्यार्थ्यांना त्याच प्रवर्गाच्या शाळांमध्ये ठेवले तरच त्यांचा बौद्धिक विकास होईल.
>
> **- अजित साळुंखे (मानसोपचार तज्ज्ञ)**

> इयत्तेचा टॅब उपलब्ध नसल्याने विद्यार्थी ऑनलाईन प्रवेशित करता येत नाही.म तिमंद प्रवर्गाच्या शाळांमध्ये सामान्य शाळेतील विद्यार्थी प्रवेशित करण्यासाठी युडायस पोर्टलवर टॅब निर्माण करण्याची मी मागणी सप्टेंबरमध्ये जिल्हा प्राथमिक शिक्षणाधिकारी, उत्तर सोलापूर तालुक्याच्या गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे केली आहे.मात्र संपूर्ण राज्याचा हा तांत्रिक प्रश्न असल्याचे सांगितले.तेव्हा सामान्य शाळेतून आलेल्या विद्यार्थ्याला मतिमंद शाळेत ऑनलाईन प्रवेश देण्यासाठी युडायस पोर्टलवर टॅब तरी निर्माण करुन द्यावा अन्यथा ऑनलाईन उपस्थिती तरी ग्राह्य धरण्यात यावी,ही राज्यातील मतिमंद शाळांची मागणी आहे.
>
> **- संजयकुमार वाघमारे, मुख्याध्यापक**

## मोहिते-पाटील विद्यालयाच्या ३२ विद्यार्थ्यांची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड



### राज्यस्तरीय अबॅकस स्पर्धेत घवघवीत यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ डिसेंबर -**

उदयसिंह मोहिते पाटील इंग्लिश स्कूल मंगळवेढा येथील विद्यार्थ्यांचे राज्यस्तरीय अबॅकस स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवला होता. ही स्पर्धा सोलापूर येथे पार पडली या परीक्षेला कर्नाटक महाराष्ट्र या राज्यातून आणि पाच जिल्ह्यातून सुमारे १००० विद्यार्थ्यांचा सहभाग नोंदवला होता. यामध्ये सोलापूर, धाराशिव, लातूर, पुणे, सातारा या जिल्ह्यातून मुलांनी सहभाग घेतला होता. यामध्ये वेगवेगळ्या कॅटेगरीतून मुलांना यश प्राप्त केले. यामधील क्रमांक पुढील प्रमाणे :

**प्रथम क्रमांक** : श्रेय नागणे, पियुष पाटील, राणाईशान पाटील, तनिष्का वाले, समर्थ देवकते, स्वालीया तांबोळी, शिवराज देवकर, इंद्रभूषण शिंदे, साक्षी कोळी,अभिनव सूर्यवंशी.

**द्वितीय क्रमांक** : स्वरा शिंदे, विजया नागणे, संस्कार निगडी, अक्षरा ढगे, श्रेया माळी, ईशान्वी पवार, सफा खतीब, **तृतीय** : अद्विक काळुंगे, आरोही खरात, श्रेया शिंदे, समृद्धी देवकते, **चतुर्थ क्रमांक** : आरोही गवळी, रोहित चौगुले, रागिनी जाधव, श्रीवर्धन पाटील, श्रीरत्न लोकरे, श्रेयश मेडिदर, प्रणव जाधव, सुदर्शन जाधव, संचिती पाटील, शौर्य काकेकर, शाहू मस्के, संकेत मारनूर, कालिंदी खराडे, आर्यन पाटील, तर गोल्ड मेडलिस्ट मध्ये सोमेश्वरी पाटील, ईश्वरी पाटील, श्री चव्हाण, आयुष बेद्रे, आरोही चोपडे, कार्तिक गवळी, दिव्या लंगोटे, राजवीर घोडके, आरुष काकडे, आरोही शेणवे, रेवा शेणवे, मनश्री जगताप, मयुरेश जगताप, स्वरा पांढरे, सार्थक पवार, शौर्य काकेकर, अद्वैत बनसोडे, आदर्श लिगाडे, समर्थ पांढरे, शिवम कदम, श्रवण राजमाने, आर्या इंगळे या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना प्राजक्ता भगरे यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले.

या कार्यक्रमासाठी मंगळवेढा मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटलचे विश्वस्त डॉ.नंदकुमार शिंदे व प्रख्यात स्त्रीरोगतज्ञ डॉ. पुष्पांजली शिंदे यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले. प्राचार्या सुधीर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साह पूर्ण वातावरणामध्ये सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडला.

## वाडकर वाचनालयाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन



**तभा वृत्तसेवा,**
**कासेगाव, दि.२६ डिसेंबर-**

कासेगाव (ता.दक्षिण सोलापूर) येथील माननीय श्री संभाजीराव जनार्धन वाडकर सार्वजनिक वाचनालयाच्या नूतन वर्ष २०२६ च्या दिनदर्शिकेचे प्रकाशन विजय राठोड यांच्या हस्ते करण्यात आले.


यावेळी संभाजी ब्रिगेड धाराशिव जिल्हाध्यक्ष शरद पवार, माजी उपसभापती अप्पा धनके, विजय राठोड यांनी आपले मनोगत व्यक्त केले व संस्थेस सर्वोतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. श्री. पवार यांनी ५००० चे ग्रंथ भेट म्हणून दिले. यावेळी उपसरपंच ज्ञानेश्वर रोकडे, गंगेवाडीचे माजी सरपंच महादेव जाधव,माजी सरपंच जनार्धन काळे, संतोष भोजने, बापू जाधव, माजी तंटामुक्त अध्यक्ष चंद्रकांत चव्हाण, बबन खारे, शिवाजी हेडे, हरी गरड, सुरज परीट, तात्या चौगुले, अक्षय माळी, अजित जाधव, नवनाथ माने, लक्ष्मण ढेकळे, तुकाराम चौगुले, तानाजी हब्बू व ग्रामस्थ उपस्थित होते. भरत जाधव यांनी सूत्रसंचालन केले. नतीन वाडकर यांनी आभार मानले.

## हिवाळ्यात होणाऱ्या दातांच्या समस्या व घ्यावयाची आवश्यक काळजी

**तभा वृत्तसेवा । राजाराम मस्के**
**सोलापूर, दि. २६ डिसेंबर-**

हिवाळा ऋतू आरोग्यासाठी अनेक प्रकारे आव्हानात्मक ठरतो. थंडीमुळे सर्दी-खोकला, त्वचेचा कोरडेपणा यासोबतच दात व तोंडाच्या आरोग्यावरही प्रतिकूल परिणाम होतो. हिवाळ्यात दातांशी संबंधित समस्या वाढताना दिसतात. त्यामुळे या समस्यांची कारणे समजून घेऊन योग्य काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे.

हिवाळ्यातील सर्वसाधारण समस्या म्हणजे दातांची संवेदनशीलता थंड पाणी, थंड पेये किंवा गार वाऱ्यामुळे दातांमध्ये अचानक कळ येते. याचे मुख्य कारण म्हणजे थंडीमुळे हिरड्या आकुंचन पावतात व दातांचा आतील थर उघडा पडतो. त्यामुळे दात अधिक संवेदनशील बनतात.




दुसरी महत्त्वाची समस्या म्हणजे हिरड्यांची सूज व रक्तस्राव त्यासोबत दात किडणे, दात व हिरड्या मध्ये होणारा जंतूससर्ग. हिवाळ्यात लोक पाणी कमी पितात, त्याम ुळे तोंड कोरडे राहते. लाळेचे प्रमाण कमी झाल्याने जंतुसंसर्ग वाढतो व हिरड्यांना सूज येते. यामुळे तोंडातून दुर्गंधी येणे, हिरड्या दुखणे व रक्त येणे अशा तक्रारी दिसून येतात.

याशिवाय तोंडातील कोरडेपणा हि पण एक सामान्य समस्या आहे. थंड हवामानात श्वासोच्छ्वास तोंडातून अधिक प्रमाणात घेतला जातो. त्यामुळे तोंड कोरडे पडते. लाळ कमी झाल्यास दातांची नैसर्गिक स्वच्छता होत नाही व दात किडण्याचा धोका वाढतो. लहान मुलं सतत कांहीतरी खात असतात, मुलांना गोड पदार्थ, चॉकलेट वगैरे खावयास आवडते. वेळीच पाणी पिऊन स्वच्छ न केल्याने दात दुखणं व किडण्याचं प्रमाण जास्त असतं. दररोज कोमट पाण्याने गुळण्या कराव्यात. शक्य असल्यास मिठाच्या कोमट पाण्याने गुळण्या केल्यास हिरड्यांची सूज कमी होते. थंड पदार्थ व अतिशय गार पाणी टाळावे. पाणी पिण्याचे प्रमाण वाढवून तोंडातील ओलावा टिकवावा. तसेच, तंबाखू, गुटखा, सिगारेट यांचे सेवन टाळावे, कारण यामुळे हिरड्यांचे आजार वाढतात. आहारात कॅल्शियम, जीवनसत्त्व 'ड' व 'ऊ' यांचा समावेश करावा. दूध, फळे, हिरव्या भाज्या यांचे सेवन दात व हिरड्यांसाठी उपयुक्त ठरते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे दर सहा महिन्यांनी दंततज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. लहान समस्या वेळेवर ओळखल्यास मोठे त्रास टाळता येतात. एकंदरीत, हिवाळ्यात दातांची योग्य काळजी घेतल्यास वेदना, संसर्ग व खर्चिक उपचार टाळता येऊ शकतात. आरोग्यदायी दात म्हणजेच आरोग्यदायी जीवनहे लक्षात ठेवून प्रत्येकाने दंतस्वच्छतेकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे.



> दात दुखत असेल तर सर्वप्रथम दंततज्ञाचा सल्ला घ्यावा.दातामधील अडकलेलं अन्न दातामध्ये पिन, काड्या वापर करू नये. दात किडलेलं असेल तर कीड काढणे, किंवा रुट कॅनल करून नविन कॅप घालून उपचार करता येतात. दुखणं आहें म्हणून पेन किलर गोळ्या सतत घेतल्याने शरिरावर विपरीत परिणाम होऊ शकतो वेळीच उपचार न घेतल्याने दातांची पूर्णता झिज होऊन दात निकामी होऊ शकतात.
>
> **- डॉ. किरण राठोड, दंतरोग तज्ञ, विजयनिर्मल मल्टीस्पेशलीटी डेंटल हॉस्पिटल, सोलापूर.**



> आयुर्वेदानुसार दंतधावन म्हणून विधी सांगितला असे सकाळी उठल्यानंतर तोंडांत चिकटा असतो आयुर्वेदाने याला कफ म्हटले आहे तो कमी होण्यासाठी तुरट व कडू चवीची चुर्ण वापरतात त्यामुळे कफ कमी होतो तुरट रस हा हिरड्या आवळल्या जातात त्यामुळे त्या घट्ट होतात हा रस जंतुनाशक मुख दुर्गंधी नाशक म्हणून पण काम करतो त्यात वापरली जाणाऱ्या वनस्पती म्हणजे वज्रदंती म्हणजे बकुळ त्याबरोबर वड, खैर,करंज निंब बेल उंबर आघाडा अशा वनस्पती पासून बनवलेले मंजन वापरावे
>
> **- वैद्य प्रविण बिरजे, आयुर्वेदाचार्य, बिरजे हॉस्पिटल, सोलापूर.**

# ‘महाविकास आघाडी’ची बैठक; शिवसेना ‘उबाठा’ नेत्यांचा काढता पाय

### प्रभाग क्रमांक ६ मधील एका जागेसाठी दावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२६ डिसेंबर-**
सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने ‘महाविकास आघाडी’तील मित्रपक्ष बैठकांवर बैठका घेत आहेत. परंतु शुक्रवारी सकाळी आणि दुपारी झालेली चर्चा निष्फळ ठरली. शिवसेनेच्या उपनेत्या अस्मिता गायकवाड, जिल्हाप्रमुख प्रा.अजय दासरी यांनी बैठकीतून काढता पाय घेतला. दरम्यान, प्रभाग क्रमांक ६ मधील एका जागेसाठी शिवसेना उबाठा आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने दावा केल्याने ‘महाविकास आघाडी’चे घोडे अडल्याचे सांगण्यात आले.

प्रभाग क्रमांक ६ मधील चारही जागा शिवसेना ‘उबाठा’ला मिळावेत, असा आग्रह उपनेत्या अस्मिता गायकवाड, जिल्हाप्रमुख प्रा.अजय दासरी यांनी धरला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाला एक जागा तेही आपल्या एका कार्यकर्त्याला मिळावा, अशी भूमिका शहराध्यक्ष महेश गादेकर यांनी घेतली. त्यामुळे शुक्रवारी झालेल्या बैठकांमधील चर्चा निष्फळ ठरली. दरम्यान, जागा वाटपसंदर्भात वाटाघाटी सुरु असल्याचे दोन्ही पक्षाकडून सांगण्यात आले. शुक्रवारी झालेल्या बैठकीत प्रभाग क्रमांक ६ आणि प्रभाग क्रमांक १४ मधील जागांवर विशेष चर्चा करण्यात आली. मात्र ठोस निर्णय घेण्यात आला नाही, असे सांगण्यात आले. या बैठकीस ‘माकपा’चे माजी आमदार नरसय्या आडम, काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे, प्रवक्ते प्रा.अशोक निंबर्गी, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पार्टीचे शहराध्यक्ष महेश गादेकर यांच्यासह भारत जाधव, शंकर पाटील, प्रशांत बाबर, चंद्रकांत पवार, एम.एच शेख, नसीमा शेख आदींची उपस्थिती होती.



#### आज होणार ‘फुल अ‍ॅन्ड फायनल’

‘महाविकास आघाडी’मध्ये एक-दोन जागांवर एकमत झाले नाही. शिवसेना नेत्यांची भूमिका आग्रही होती. आज ‘फुल अ‍ॅन्ड फायनल’ करण्यात येईल, असे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे शहराध्यक्ष महेश गादेकर यांनी सांगितले.

#### आमच्या जागांवर आमचा दावा

शुक्रवारी घेण्यात आलेल्या दोन्ही सत्रातील बैठकीत निर्णय झाला नाही. आमच्या जागेवर आम्ही आमचा दावा केलेला आहे. आज पुन्हा बैठक घेण्यात येणार आहे, असे शिवसेना ‘उबाठा’चे जिल्हाप्रमुख प्रा.अजय दासरी यांनी सांगितले.

#### दोन्ही मित्रपक्षांकडून मागणी

प्रभाग क्रमांक ६ मध्ये शिवसेना ‘उबाठा’ने चारही जागा मागितल्या आहेत. गणेश वानकर हे विद्यमान नगरसेवक आहेत. राष्ट्रवादी शरद पवार गटाने चंद्रकांत पवार यांच्यासाठी जागा मागितली आहे, असे काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे यांनी सांगितले.

## महत्वाचे...



### आता लढणारा शिवबा व्हा : सहमंत्री पिसे बजरंग दलातर्फे महाआरती

**सोलापूर,दि.२६ डिसेंबर-**
देश,देव,धर्म, परिवारासाठी संस्कारक्षम, वीर पराक्रम आणि संघर्षाचा मुकाबला करण्यासाठी आपली एकजूट हवी. ज्यामुळे कुणी वाकड्या नजरेने बघणार नाही. लहान मुले, कुटुंबावर संस्कार झाले पाहिजेत. रूढी परंपरांचे जतन माता,भगिनींकडून झाले पाहिजे. तरुण बजरंगी यांनी जिहादी तत्त्वांचा बिमोड करण्यासाठी प्रशिक्षित झाले पाहिजे. आता लढणारा शिवबा होण्याचे आवाहन विहिंप विभाग सहमंत्री व माजी संपादक विजयकुमार पिसे यांनी केले. विश्व हिंदू परिषद बजरंग दलतर्फे अंत्रोळीकर नगर गणेश मंदिर तसेच प्र.२१ परिसरातील हुच्चेश्वर मठ, शिवगंगा नगर, अंत्रोळीकर नगर गुरूद्वारा येथे महाआरती व तुलसी पूजन पार पडले. महाआरतीचे आयोजन माधव प्रखंड मंत्री कृष्णा देशपांडे, बजरंग दल सुरक्षा प्रमुख राजू मनसावाले, बजरंगी देविदास सत्तारवाले, दिगंबर बडूरवाले व समरसता आयामचे विकास कुलकर्णी, विजय यामजले, सुनील चौधरी, विजय गोरे, सागर मुगळे यांनी केले. शेकडो बजरंगी, माता भगिनी व बाल यांची उपस्थिती होती. याप्रसंगी जिल्हा मंत्री संजयकुमार जमादार, धर्माचार्य प्रमुख रवी बोल्ली यांचे मार्गदर्शन लाभले.



### दिव्यांगाचे बोगस प्रमाणपत्र जोडलेल्या शिक्षकांची चौकशी करा

**सोलापूर, दि.२६ डिसेंबर-**
सोलापूर जिल्ह्यामधील प्राथमिक शिक्षकांनी बोगस दिव्यांग प्रमाणपत्र जोडून स्वताच्या सोयीनुसार इच्छित स्थळी बदली करुन घेऊन प्रशासनाची फसवणूक केली आहे. सदर प्रकरणाची कसून चौकशी करुन दिव्यांग बोगस प्रमाणपत्र सिध्द झाल्यास त्यांच्यावर कठोर कायदेशिर कारवाई करावी, अशी मागणी आरक्षण हक्क कृती समितीच्या वतीने निवेदनाद्वारे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्याकडे केली आहे. चालु शैक्षणिक वर्ष सन २०२५-२६ मध्ये जिल्हा परिषदेतील प्राथमिक शिक्षकांच्या प्रशासकीय स्तरावरुन ऑनलाईनद्वारे झालेल्या बदल्या त्याबाबत असलेल्या निकषाचे नियमानुसार बदली होणे क्रमप्राप्त असते. त्यांच्या सोबत शिक्षकांनी दिव्यांग प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक असल्यामुळे जि.प मधील कार्यरत असलेल्या अनेक शिक्षक कर्मचा-यानी दिव्यांग असल्याचे बोगस प्रमाणपत्र जोडल्याचे समजले आहे. दरम्यान, झालेल्या या बदल्यामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षक कर्मचा-यांना बोगस दिव्यांग प्रमाणपत्र जोडलेल्या असल्यामुळे संवर्ग ४ मधील सरळ सेवेतून होणा-या अन्य शिक्षकांच्या बदल्यामध्ये बाधा निर्माण झाल्याने त्या शिक्षकांवर मोठ्या प्रमाणात अन्याय झाल्याचे निदर्शनास येत आहे.यावेळी जिल्हा समन्वयक कमलाकर बनसोडे, राजा सोनकांबळे आदींसह पदाधिकारी आणि सदस्य उपस्थित होते.

### लाचखोर मोटार वाहन निरीक्षकाची पोलिस कोठडीत रवानगी

**सोलापूर, दि. २६ डिसेंबर -**
लाचखोर मोटार वाहन निरीक्षक, तानाजी धुमाळ याचा बेकायदेशीर अटकेचा अर्ज न्यायालयाने फेटाळुन लावत, एक दिवसासाठी पोलिस कोठडीत रवानगी केली आहे. सोलापूरातील जिल्हा व सत्र न्यायाधीश कटारीया यांचे न्यायालयासमोर लाचखोर मोटार वाहन निरीक्षक, तानाजी शिवाजी धुमाळ आणि खासगी इसम अमोल अप्पासाहेब पाटील यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक करुन हजर केले असता आरोपीच्या वकीलाने सदर आरोपीस बेकायदेशीररीत्या अटक केली आहे आणि त्यास अटकेची कारणे सांगितली नाहीत म्हणुन ताबडतोब मुक्त करणेसाठीचा अर्ज न्यायालयात दाखल केला होता. जिल्हा सरकारी वकील अ‍ॅड. डॉ.प्रदीपसिंह राजपुत यांनी युक्तीवाद केला की, सदर प्रकरणात आरोपी खासगी इसम अमोल पाटील याने मुळ फिर्यादीकडे ३,०००/- रुपयांची लाचेची मागणी करुन तडजोडीअंती २,५००/- रुपये रकमेची लाच स्वत:करीता व मोटार वाहन निरीक्षक प्रादेशीक परीवहन कार्यालय, सोलापूर तानाजी धुमाळ यांचेकरीता स्विकारली त्यावेळी जालना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सदर गोष्टीची पडताळणी करुन आरोपीला सापळा रचुन लाच घेताना रंगेहाथ पकडून त्यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम ७अ, १२ चे अन्वये गुन्हा दाखल केला आहे आणि सदर आरोपीस अटक करतेवेळी आरोपीच्या मित्रांना अटकेची माहीत कळवून सदर आरोपीस नोटीस देवुन अटकेची कारणेदेखील सांगितली आहेत. सर्वोच्च न्यायालय याबाबत घालुन दिलेल्या सर्व अटी व शर्थीचे पालन करुन लाच लुचपत प्रतिबंधक विभाग जालना आणि लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर यांनी पालन केले आहे त्यामुळे आरोपीचा बेकायदेशीर अटकेचा अर्ज फेटाळला जाण्यास पात्र आहे तसेच आणखी युक्तीवाद सादर केला की, सदर आरोपी मोटार वाहन निरीक्षक याने लाच स्विकारणेसाठी नांदणी येथील चेकपोस्ट नाकावर आणखी किती खासगी इसमांची नेमणुक करुन त्यांचेद्वारे किती रकमा स्विकारलेले आहेत याचा तपास करणे गरजेचे व आवश्यक असल्याने सदर आरोपीस पोलीस कोठडीची आवश्यकता आहे. सदर प्रकरणात जिल्हा सरकारी वकील अ‍ॅड. डॉ.प्रदीपसिंह राजपूत यांनी केलेला युक्तीवाद ग्राहय धरुन दोन्ही आरोपींना एक दिवसाची पोलिस कोठडी सुनावली आहे. सदर प्रकरणात जिल्हा सरकारी वकील अ‍ॅड.डॉ. प्रदीपसिंह मो. राजपूत यांनी व आरोपीतर्फे अ‍ॅड. निलेश जोशी तसेच तपासी अंमलदार म्हणुन पोलिस उपअधिक्षक प्रशांत चौगुले, यांनी काम पाहिले.

## सोलापूर महापालिका निवडणूक

# सहा जणांनी दाखल केले उमेदवारी अर्ज

### आतापर्यंत २ हजार ९६३ अर्जांची विक्री

### राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाने मारली बाजी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२६ डिसेंबर-**
सोलापूर महापालिका निवडणुकीसाठी शुक्रवार, २६ डिसेंबर २०२५ रोजी सहा जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. आजरोजी ८५४ तर आतापर्यंत एकूण २ हजार ९६३ अर्जांची विक्री झाली आहे. दरम्यान, उमेदवारी अर्ज दाखल करण्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने बाजी मारली.

शुक्रवार, दि.२६ डिसेंबर रोजी नामनिर्देशन पत्र घेतलेल्यांमध्ये ‘भाजपा’चे संजय कोळी, वंदना गायकवाड, ‘काँग्रेस’चे विवेक खरटमल, भीमाशंकर टेकाळे, प्रवीण निकाळजे, अनुराधा काटकर यांच्यासह अजित गायकवाड, रेश्मा मुल्ला, अबुबकार सय्यद आदींचा समावेश आहे.



निवडणूक निर्णय अधिकारी क्रमांक ४ कार्यालयात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे रुपेश भोसले, प्रीती देवकते, दीपाली जाधव व भास्कर आडकी या चौघांनी प्रभाग क्रमांक १० मधून उमेदवारी अर्ज दाखल केले. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे रुपेश भोसले म्हणाले, आमच्यासमोर कोणताही बलाढ्य पक्ष नाही. आमचा विजय निश्चित आहे.

शुक्रवार, दि. २६ डिसेंबर २०२५ रोजी दाखल झालेले उमेदवारी अर्ज याप्रमाणे; प्रभाग १२-ब (पुरुष ), प्रभाग १०-अ (महिला), प्रभाग १०-ब (महिला), प्रभाग १०-क (पुरुष), प्रभाग १०-ड (पुरुष), प्रभाग ११ (पुरुष).

निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयनिहाय अर्ज विक्री याप्रमाणे; निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय १ : १५२, निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय २ : ९१, निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय ३ : १२२, निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय ४ : १२४, निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय ५ : १४८, निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय ६ : ५५, निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय ७ : १६२.



# उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घातले सोलापुरात विशेष लक्ष

### ना. भरणे आज, ना. बनसोडे उद्या सोलापुरात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२६ डिसेंबर**
सोलापूर शहरात सध्याच्या घडत असलेल्या राजकीय घडामोडी पाहता, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला ताकद देण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विशेष लक्ष घातले आहे. किसन जाधव यांच्या पक्ष बदलानंतर राष्ट्रवादीने सोलापूर शहरात विशेष लक्ष देण्यास सुरुवात केली आहे. अजित पवार यांनी राष्ट्रवादीचे संपर्कमंत्री दत्तात्रय भरणे व सहसंपर्कमंत्री अण्णा बनसोडे यांना तातडीने सोलापूर येथे जाऊन इच्छुक उमेदवार, पदाधिकारी यांच्याशी संवाद साधण्याच्या सूचना दिल्या आहेत.

शनिवार, दि.२७ डिसेंबर रोजी संपर्कमंत्री दत्तात्रय भरणे दुपारी १२ वाजता राष्ट्रवादी भवनात बैठक घेणार आहेत. त्यानंतर दुपारी ४ वाजता प्रभाग ४ आणि ५ येथे आनंद चंदनशिवे यांच्या प्रचार कार्यालयाचे उदघाटन करणार आहे. रविवार, दि.२८ डिसेंबर रोजी सहसंपर्कमंत्री अण्णा बनसोडे सोलापूर महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बैठक घेणार आहेत, असे शहर-जिल्हाध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान, प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी सांगितले.

दरम्यान, सोलापूर राष्ट्रवादीमधील राजकीय परिस्थिती व घडामोडी तसेच इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती व अन्य बाबींसंदर्भातील आढावा शुक्रवारी सोलापूर शहर जिल्हा राष्ट्रवादीचे अध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान आणि प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी पुण्यात पक्षाचे सहसंपर्क मंत्री अण्णा बनसोडे यांच्यासोबत झालेल्या पहिल्या बैठकीत मांडला. त्यानंतर विचार विनिमय होऊन पुण्यातील बारामती होस्टेल येथे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या समवेत महत्वपूर्ण बैठक झाली. यावेळी सहसंपर्कमंत्री अण्णा बनसोडे, शहर-जिल्हाध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान, प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे, राष्ट्रवादीचे जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांमधील धाडसी वृत्तीसाठी शौर्याची गाथा गरजेची : डॉ.साठे

### न्यू हायस्कूल वडाळामध्ये बाल शौर्यदिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**उत्तर सोलापूर, दि.२६ डिसेंबर-**
शिखांचे दहावे धर्मगुरू गुरु गोविंद सिंहजी यांचे पुत्र साहिबजादा जोरावर सिंह आणि साहिबजादा फतेह सिंह यांनी कोवळ्या वयात बलिदान दिले.त्यांच्या बालशौर्याची गाथा लहान मुलांपर्यंत पोहोचवावी, त्यांच्यामधील धाडसी वृत्ती जागृत होऊन देशसेवेचे बाळकडू लहानपणापासून अंगी बानले जावे, यासाठी प्रत्येक शाळेत बालशौर्य दिन साजरा करावा,असे प्रतिपादन वडाळा येथील श्री भारत शिक्षण प्रसारक मंडळ संचलित न्यू हायस्कूल कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.वैशाली जितेंद्र साठे यांनी केले.




न्यू हायस्कूलमध्ये लोकमंगल नर्सिंग कॉलेजच्या सहकार्याने बालशौर्य दिन साजरा करण्यात आला. त्यावेळी प्राचार्या डॉ.साठे बोलत होत्या. लोकमंगल नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य बाळासाहेब बिराजदार यांची प्रमुख उपस्थिती होती. प्राचार्या डॉ.साठे पुढे म्हणाल्या की, संकटाच्या काळात स्वतःच्या जीवाची पर्वा न करता इतरांचे प्राण वाचवणाऱ्या बालकांचा आदर्श विद्यार्थ्यांनी आपल्या डोळ्यांसमोर ठेवावा.

यावेळी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते सादर करून उपस्थितांची मने जिंकली. प्राचार्य बिराजदार यांचा सत्कार करण्यात आला. पर्यवेक्षक प्रा.पी.आर पाटील यांनी प्रास्ताविक केले. संदीप सोनटक्के यांनी आभार मानले.

# वस्तीतील आरोग्य सेवांच्या सुधारणेत ‘मास’ची महत्वपूर्ण भूमिका

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २६ डिसेंबर -**
वस्तीतील आरोग्य प्रश्न प्रभावीपणे सोडवण्यासाठी महिलांचे संघटन अत्यंत महत्त्वाचे असून, यामध्ये महिला आरोग्य समित्या (मास) केंद्रस्थानी आहेत. मासचा योग्य आणि सक्रिय वापर झाला तर वस्ती पातळीवरील आरोग्य सेवा अधिक सक्षम होऊ शकतात, असे मत डॉ. वाळवेकर यांनी व्यक्त केले.

अनुसंधान ट्रस्ट ‘साथी’ संस्थेच्या तृप्ती मालती यांनी सांगितले की, महिला आरोग्य समित्या या वस्ती, समुदाय आणि शासकीय यंत्रणा यांच्यातील महत्त्वाचा दुवा आहेत. शहरी भागातील आरोग्य सेवा सुधारण्यासाठी मासची भूमिका निर्णायक आहे. वस्तीतील आरोग्य सेवांतील अडचणी संघटितपणे मांडल्यास त्यावर तोडगा निघू शकतो.



सोलापूर शहरातील पिढी घरकुल, रामवाडी, जिजामाता आणि दाराशा या चार नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांतील ५० महिला आरोग्य समिती सदस्यांचे सक्षमीकरण आणि सक्रिय करण्याची प्रक्रिया राबविण्यात येत आहे. प्रास्ताविक तब्बू नगारे यांनी केले. सूत्रसंचालन पल्लवी वडणे यांनी केले. आभार शहाजी गडहिरे यांनी मानले. यावेळी डॉ. वाळवेकर, पूजा बाबर, तृप्ती मालती, रेश्मा कदम यांच्यासह चारही नागरी प्राथमिक केंद्रातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बार्शी तालुक्याच्या सुपुत्राची ‘एमपीएससी’त गरुडझेप

### ज्ञानेश्वर घायतिडक यांची एकाच वेळी तीन पदांवर निवड

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. २६ डिसेंबर -**
महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (चझडउ) परीक्षेत बार्शी तालुक्याचे नाव पुन्हा एकदा उज्ज्वल झाले आहे. तालुक्यातील काळेगाव येथील तरुण ज्ञानेश्वर कुबेर घायतिडक यांनी आपल्या कौशल्याच्या जोरावर एकाच वेळी तीन विविध शासकीय पदांवर निवड होऊन ऐतिहासिक यश संपादन केले आहे.

त्रिपदांवर निवडीचा बहुमानः महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत नुकत्याच जाहीर झालेल्या निकालात ज्ञानेश्वर यांची उद्योग निरीक्षक (Industry Inspector), कर सहाय्यक (Tax ssistant) आणि मंत्रालयीन लिपिक (चरर्पीीरश्रूर उश्रशीज्ञ) या तीनही पदांसाठी पात्र म्हणून निवड झाली आहे. एकाच वेळी तीन मोठ्या पदांना गवसणी घातल्याने तालुक्यातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. जिद्द आणि चिकाटीचे फळ: ज्ञानेश्वर यांनी ग्रामीण भागातील प्रतिकूल परिस्थितीवर मात करत स्पर्धा परीक्षेचा अभ्यास केला. त्यांच्या या यशामागे सातत्यपूर्ण मेहनत आणि योग्य मार्गदर्शनाचा मोठा वाटा आहे.



त्यांच्या या निवडीमुळे बार्शी तालुक्यातील स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या इतर विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## परंडा येथे घरफोडी; ३.२५ लाखांचा मुद्देमाल लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ डिसेंबर -**

परंडा पोलिस ठाणे हद्दीतील पाचपिंपळा (ता. परंडा, जि. धाराशिव) येथे अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून सोन्या-चांदीचे दागिने, रोख रक्कम व मोबाईल फोन असा एकूण ३ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना घडली आहे.

याबाबत फिर्यादी श्रीराम बाबुराव गरड (वय ३५, रा. पाचपिंपळा) यांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. २४ डिसेंबर २०२५ रोजी रात्री १०.०० ते दि. २५ डिसेंबर २०२५ रोजी पहाटे ५.०० वाजेच्या सुमारास अज्ञात व्यक्तीने त्यांच्या राहत्या घराचा कडी-कोंडा तोडून घरात प्रवेश केला. त्यानंतर घरातील कपाटातून सोन्या-चांदीचे दागिने व ५० हजार रुपये रोख रक्कम चोरून नेण्यात आली. याशिवाय, गावातील उसतोड मजूर मुकेश ईदु भिलचंद्र (रा. मेढाराणा, राज्य-प्रदेश, हमु. पाचपिंपळा) तसेच सौदागर विलास ढोंगे (रा. पाचपिंपळा) यांचे असे दोन मोबाईल देखील चोरट्यांनी लंपास केले.

या प्रकरणी श्रीराम गरड यांनीदिलेल्या फियार्दीवरून गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## ⏩ संक्षिप्त वृत्त...



### नळदुर्ग शहर भाजपच्या वतीने वीर बाल दिवस साजरा

**नळदुर्ग, दि.२६ डिसेंबर -**

नळदुर्ग शहर भाजप कार्यालयात शहर भाजपच्या वतीने वीर बाल दिवस श्रद्धा व उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने शीख धर्माचे दहावे गुरु गुरु गोविंदसिंग यांचे थोर सुपुत्र वीर साहेबजादे यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. दि.२६ डिसेंबर रोजी देशभरात वीर बाल दिवस साजरा करण्यात आला. याच पार्श्वभूमीवर नळदुर्ग शहर भाजपच्या वतीने आयोजित कार्यक्रमात अमित येडगे यांच्या हस्ते वीर साहेबजाद्यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी भाजपचे साहेबराव घुगे, श्रमिक पोतदार, बबन चौधरी यांच्यासह प्रशांत पवार, अमर पिचे, संजय घोडके, खंडेराव चव्हाण, अबुलहसन रजवी, प्रमोद जाधव, आदिजन आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



### बालाजी बिराजदार यांना पत्रकाररत्न पुरस्कार प्रदान

**लोहारा, दि.२६ डिसेंबर -**

उमरगा शहरातील प्रा. श्यामराव रघुनाथ चव्हाण स्मृती पुरस्कार समितीच्या वतीने दिला जाणारा प्रतिष्ठित पत्रकाररत्न पुरस्कार लोहारा शहरातील पत्रकार बालाजी बिराजदार यांना सुप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ कॉम्रेड अजित अभ्यंकर यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. या पुरस्कार वितरण सोहळ्यास आ. प्रवीण स्वामी, बाबा पाटील, वसंत नागदे, ॲड. शीतल चव्हाण,हरीष डावरे, कैलास शिंदे, दिलीप भालेराव, प्रकाश आष्टे, सुनीता चावला, निळकंठ कांबळे, शहाजी जाधव, अमोल बिराजदार यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.



### पोदार इंटरनॅशनल स्कूलचा नाताळ उत्सव उत्साहात साजरा

**धाराशिव, दि.२६ डिसेंबर -**

पोदार इंटरनॅशनल स्कूल, धाराशिव येथे प्राचार्य डॉ. वाल्मिक सोमासेसर यांच्या मार्गदर्शनाखाली नाताळ उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे नियोजन इयत्ता पाचवी 'ब' वर्गाच्या वर्गशिक्षिका आनंदी पाटील यांनी अत्यंत नियोजनबद्ध व प्रभावी पद्धतीने केले. या कार्यक्रमाला उपप्राचार्य निलेश जाधव, प्रशासकीय अधिकारी जीवन कुलकर्णी, प्रदीप शिंदे, कार्यक्रमाधिकारी दिपक अंकुश, पालकवर्ग तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व उपस्थितांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे कौतुक केले.



### माळी मोबाईल अँड इलेक्ट्रॉनिक्सची बंपर सोडत उत्साहात

**मंगरूळ, दि.२६ डिसेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील मंगरूळ व इटकळ येथील माळी मोबाईल अँड इलेक्ट्रॉनिक्स यांच्या वतीने गणेशोत्सव, दसरा, दिवाळी ते नववर्षपूर्व कालावधीत १० हजार रुपयांपेक्षा अधिक खरेदी करणाऱ्या ग्राहकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या बंपर लकी ड्रॉ सोडतीचा कार्यक्रम गुरुवारी (दि.२५) सायंकाळी साडेसहा वाजता उत्साहात पार पडला. या सोडतीत मुख्य बक्षीस मोटारसायकल अक्कलकोट तालुक्यातील चुंगी येथील दीपक अशोक माने यांनी पटकावले. विशेष म्हणजे त्यांनी सोडतीच्या दिवशीच एलईडी टीव्ही खरेदी करून लकी ड्रॉमध्ये सहभाग घेतला होता. कार्यक्रमाची सुरुवात ग्रामदैवत कंचेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन ाने झाली. यावेळी स्मार्ट टीव्ही, वॉशिंग मशीन, कुलर, वॉटर प्युरिफायर, होम थिएटर, फॅन, मिक्सर, इस्त्री, पैठणी आदी आकर्षक बक्षिसांची सोडत काढण्यात आली.

### दोन मोबाईल चोरी; आरोपी ताब्यात

**धाराशिव, दि.२६ डिसेंबर -**

तुळजापूर येथील जुने बसस्थानक समोरील रसवंती गृहात दि.२५ डिसेंबर अज्ञात व्यक्तीने दोन मोबाईल फोन चोरून नेल्याची घटना घडली होती. याप्रकरणी वेताळ नगर येथील मारुती अभिमन्यु रसाळ (वय ५४) यांनी तुळजापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. तपासादरम्यान मिळालेल्या गुप्त माहितीवरून सुदर्शन अंकुश कदम (वय ३९, रा. माडवखेळ, जि. बीड) यास ताब्यात घेण्यात आले. चौकशीत आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली.

# प्रस्तावित लातूर-कल्याण महामार्ग कळंब मार्गेच

## ⏩ एमएसआरडीसीच्या व्यवस्थापकीय संचालकांसोबत सकारात्मक चर्चा : आ. राणाजगजितसिंह पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ डिसेंबर -**

लातूर-कल्याण या प्रस्तावित महामार्गाच्या मार्गरेषेत आवश्यक बदल करून हा महामार्ग धाराशिव जिल्ह्यातील कळंब तालुक्यातून नेण्यात यावा, अशी ठोस मागणी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या (MSRDC) व्यवस्थापकीय संचालकांकडे केली आहे. शुक्रवारी झालेल्या या भेटीत तांत्रिक बाबींवर सविस्तर व सकारात्मक चर्चा झाल्याची माहिती आमदार पाटील यांनी दिली.

कळंब तालुक्याची भौगोलिक रचना तुलनेने सपाट असल्याने येथे कट-फिल कामाचे प्रमाण कमी राहील. त्यामुळे मर्यादित भूसंपादन, मोठे पूल व उड्डाणपुलांची गरज कमी भासेल आणि परिणामी प्रकल्पाचा एकूण खर्च नियंत्रणात राहून कामाची गती वाढेल, असा तांत्रिक आढावा सादर करण्यात आला.

तज्ज्ञांच्या प्राथमिक अभ्यासानुसार, महामार्ग कळंब तालुक्यातून गेल्यास एकूण लांबी सुमारे १५ ते २० किलोमीटरने कमी होऊ शकते. त्यामुळे लातूर ते कल्याण प्रवासाचा कालावधी अंदाजे ३० ते ४५ मिनिटांनी कमी होईल. सरळ, वेगवान व सिग्नल-फ्री मार्गामुळे इंधन खर्चात ८ ते १२ टक्क्यांपर्यंत बचत अपेक्षित आहे. अवजड वाहतूक, मालवाहतूक आणि लॉजिस्टिकसाठीही हा मार्ग अधिक किफायतशीर ठरणार असल्याचे आमदार पाटील यांनी स्पष्ट केले.




महामार्ग धाराशिव जिल्ह्यातून गेल्यास मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र तसेच मुंबई-ठाणे-नवी मुंबई या आर्थिक केंद्रांशी थेट आणि जलद संपर्क निर्माण होईल. त्यामुळे शेतमालाला मोठ्या बाजारपेठेत सहज प्रवेश मिळून उद्योग, वेअरहाऊसिंग व सेवा क्षेत्रात गुंतवणूक वाढेल. स्थानिक तरुणांसाठी रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होतील आणि संपूर्ण धाराशिव जिल्ह्याच्या आर्थिक घडामोडींना मोठी चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

या मार्गबदलासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या माध्यमातून सकारात्मक व निर्णायक पाठिंबा मिळेल, असा ठाम विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला.

लातूर-कल्याण महामार्ग धाराशिव जिल्ह्यातूनच जावा, यासाठी आपले आग्रही प्रयत्न सुरू असून जिल्ह्याच्या हिताचा निर्णय निश्चितपणे होईल, असेही त्यांनी सांगितले.

## आरळी बुद्रुकचे संदीप बचाटे यांची महाराष्ट्र पोलीस दलात उपनिरीक्षकपदी निवड



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ डिसेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील आरळी बुद्रुक येथील तरुण संदीप विरनाथ बचाटे यांनी कठोर परिश्रम, चिकाटी आणि सातत्याच्या जोरावर महाराष्ट्र पोलीस सेवेत घवघवीत यश मिळवले आहे. त्यांनी महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक येथे सत्र क्रमांक १२६ अंतर्गत पोलीस उपनिरीक्षक (PSI) पदाचे प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करून सेवेत दाखल झाले आहेत.

आरळी बुद्रुक या ग्रामीण भागातून प्रथमच फौजदार घडल्याने ही बाब संपूर्ण गावासाठी अभिमानाची ठरली आहे. संदीप यांनी दहावीपर्यंतचे शिक्षण जि.प.प्र., आरळी बुद्रुक येथून पूर्ण केले. तर पदवीचे शिक्षण अणदूर येथे पूर्ण केले. ग्रामीण भागातील साध्या शैक्षणिक प्रवासातून त्यांनी मोठ्या प्रशासकीय सेवेत स्थान मिळवले. उच्च शिक्षणानंतर त्यांनी पुणे येथे सलग चार वर्षे निवासी राहून एमपीएससी परीक्षेची तयारी केली. या सातत्यपूर्ण प्रयत्नातून त्यांनी एमपीएससी संयुक्त गट-ब परीक्षा २०२१ उत्तीर्ण करत यश संपादन केले.

नाशिक येथे पार पडलेल्या दीक्षा समारंभास त्यांचे वडील विरनाथ बचाटे, भाऊ नागनाथ बचाटे, वहिनी मिनाक्षी सुधाकर बचाटे तसेच संस्कृती नागनाथ बचाटे उपस्थित होते.

## एलसीबी पोलिसांवर गंभीर आरोप; धाराशिवमध्ये उपोषण

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ डिसेंबर -**

लातूर स्थानिक गुन्हे शाखेच्या (एलसीबी) पोलिसांनी आदिवासी पारधी समाजातील व्यक्तींना बेकायदेशीरपणे उचलून नेऊन चार दिवस अटक न दाखवता ठेवले, अमानुष मारहाण केली व महिलांचा विनयभंग केल्याचा गंभीर आरोप अश्विनी केशव पवार (रा. खंडाळा, ता. तुळजापूर) यांनी केला आहे. या प्रकरणी दोषींवर कारवाईच्या मागणीसाठी धाराशिव जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू आहे.

तक्रार मागे न घेतल्याच्या सूडातून ही कारवाई केल्याचा आरोप असून, बनावट गुन्हे दाखल करण्यात आल्याचा दावाही करण्यात आला आहे.

निष्पक्ष चौकशी व दोषींवर कठोर कारवाईची मागणी करण्यात आली असून, न्याय न मिळाल्यास १० जानेवारी २०२६ रोजी विधान भवनासमोर आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

# नळदुर्ग शहराचा सर्वांगीण विकास हाच आमचा ध्यास : नगराध्यक्ष धरणे

## ⏩ नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेवकांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२६ डिसेंबर -**

नळदुर्ग शहराचा सर्वांगीण विकास हाच आमचा मुख्य ध्यास असून शहराच्या प्रगतीसाठी सर्वांना सोबत घेऊन काम करणार आहे. तसेच शिवसेनेला स्वीकृत नगरसेवकपद देण्याचा आमच्या नेत्यांनी दिलेला शब्द निश्चितपणे पूर्ण केला जाईल, असे प्रतिपादन नवनिर्वाचित नगराध्यक्ष बसवराज धरणे यांनी केले.

दि.२५ डिसेंबर रोजी शिवसेना (शिंदे गट) उपजिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर घोडके यांच्या वतीने नुकत्याच पार पडलेल्या नगरपालिका निवडणुकीत भाजप-शिवसेना महायुतीकडून विजयी झालेल्या नगराध्यक्ष व नगरसेवकांच्या सत्काराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

यावेळी नूतन नगराध्यक्ष बसवराज धरणे यांच्यासह महायुतीचे नवनिर्वाचित नगरसेवक नय्यर जहागीरदार, दत्तात्रय दासकर, तानाजी जाधव, रीजवान काझी, शशिकांत पुदाले, सुमन ठाकुर, छमाबाई राठोड, मिनाक्षी काळे, राणी सुरवसे व साक्षी नळदुर्गकर यांचा शिवसेनेच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला.

सत्काराला उत्तर देताना नगराध्यक्ष बसवराज धरणे म्हणाले की, नळदुर्ग नगरपालिकेवर भाजप-शिवसेना महायुतीची सत्ता आली असून आता शहराचा विकास थांबणार नाही. ही निवडणूक आमदार राणाजगजितसिंह पाटील आणि भाजप नेते सुनील चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली लढवण्यात आली असून महायुतीला दणदणीत विजय मिळाला आहे.

या विजयाचे श्रेय सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शहरवासीयांनाच जाते. जनतेने दाखविलेल्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही आणि सर्व नगरसेवकांना सोबत घेऊन नळदुर्गचा सर्वांगीण विकास करून दाखवू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी नगरसेवक नय्यर जहागीरदार व दत्तात्रय दासकर यांनीही मनोगत व्यक्त करत नळदुर्गकरांच्या विश्वासास पात्र ठरेल असे प्रामाणिकपणे विकासकामे करण्याचे आश्वासन दिले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिवसेना उपजिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर घोडके यांनी केले. कार्यक्रमास शिवाजी सुरवसे, विजय ठाकुर, गौस कुरेशी, शंकर वाघमारे, मारुती घोडके, मनोज मिश्रा, दयानंद चौरे, जमनसिंग ठाकुर, रवी ठाकुर, आकाश घोडके, विश्वजीत कांबळे, प्रमोद कोकणे, लक्ष्मण घोडके यांच्यासह महायुतीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### गोजवाडा येथे वीर बाल दिवस उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२६ डिसेंबर -**

जिल्हा परिषद शाळा गोजवाडा येथे वीर बाल दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक घुले होते. प्रमुख पाहुणे म्हणून जाणीव संघटना व वंचित विकास संस्था यांचे रामभाऊ लगाडे उपस्थित होते.

कार्यक्रमाची प्रस्तावना शिक्षक बळीराम जगताप यांनी केली. त्यांनी धर्म आणि राष्ट्रासाठी बलिदान देणारे शहीद साहेबजादे फत्तेसिंग व जोरासिंग यांच्या शौर्याची माहिती देत शीख धर्माच्या महान कार्याबाबत आपले विचार मांडले. कार्यक्रमास सुमारे १०० ते १५० विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

# प्रा. शामराव चव्हाण स्मृती गौरव पुरस्कारांचे उत्साहात वितरण

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२६ डिसेंबर -**

प्रा. शामराव रघुनाथराव चव्हाण यांच्या स्मृतीप्रित्यर्थ उमरगा-लोहारा तालुक्यात वाचन संस्कृती रुजवण्यासाठी एकूण १३ वाचनालये, उमरगा शहरात एक वाचन टपरी तसेच दोन वाचन कट्टे सुरू करण्यात आले आहेत. ग्रंथतूला, पुस्तकपालखी, विवेकयात्रा, पुस्तक वाचणारा गणपती, मकरसंक्रांतीला पुस्तकांचे वाण वाटप, पुस्तक गुढी यांसारखे अभिनव उपक्रम वाचनालयाच्या वतीने सातत्याने राबवले जात आहेत.

वाचनालयाच्या वतीने दरवर्षी विविध क्षेत्रातील मान्यवरांना प्रा. शामराव रघुनाथराव चव्हाण स्मृती गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. पुरस्कार वितरणाचा हा ७ वा वर्षपूर्ती सोहळा उमरगा शहरातील शांताई मंगल कार्यालयात उत्साहात पार पडला.



यावेळी डॉ. दामोदर पतंगे जीवन गौरव, वसंतराव नागदे सहकाररत्न, डॉ. दीपक पोफळे समाजरत्न, अनिल जगताप कृषीरत्न, सतीश पवार उद्योगरत्न, बालाजी बिराजदार पत्रकाररत्न, रामजी साळुंके शिक्षकरत्न, भाग्यश्री औरादे ग्रंथसेवा, विशाल काणेकर कलारत्न, महादेव शिंदे उत्कृष्ट वाचक, गौरी कांबळे संगीतरत्न या पुरस्कारांनी सन्मान करण्यात आला.

### अनिल जगताप यांना 'कृषीरत्न' पुरस्कार

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लेखक, अर्थतज्ज्ञ व डाव्या-पुरोगामी चळवळीतील ज्येष्ठ नेते कॉ. अजित अभ्यंकर होते. दीपप्रज्वलन उमरगा-लोहारा मतदारसंघाचे आमदार प्रवीण स्वामी यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून केशव उर्फ बाबा पाटील, प्रकाश आष्टे, दिलीप भालेराव, कैलास शिंदे, हरीश डावरे, कॉ. सुनिता रेणके, अमर देशटवार, विठ्ठल चिकुंद्रे, रविकिरण बनसोडे, ड. दिलीप सगर, सुनंदा माने, रेखा पवार, राजू तोरकडे, रणधीर पवार, उद्धवराव गायकवाड, सुधाकर पाटील, अमोल बिराजदार, डॉ. उदय मोरे, विवेक हराळकर आदी उपस्थित होते. आमदार प्रवीण स्वामी यांनी वाचनालयास सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. वसंतराव नागदे व डॉ. दीपक पोफळे यांनी मनोगते व्यक्त केली.

सूत्रसंचालन ॲड.एस.पी. इनामदार यांनी केले तर आभार ॲड. ख्वाजा शेख यांनी मानले.

### जि.प.कें.प्रा. शाळेत आनंद बाजाराचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२६ डिसेंबर -**

जिल्हा परिषद केंद्र प्राथमिक शाळा वाशी येथे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आनंद बाजार हा उपक्रम उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाचे उद्घाटन गटशिक्षणाधिकारी सोमनाथ घोलप, शिक्षणविस्ताराधिकारी सुधाकर कोल्हे, टेकाळे, साधन व्यक्ती काझी यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष हंसराज कवडे, उपाध्यक्ष विकास क्षिरसागर, समितीचे सर्व सदस्य तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका सविता मोळवणे, शिक्षका सुनिता वाकडे, ज्ञानेश्वर जानगेवाड, सविता महामुनी आदी उपस्थित होते.

# उपनगराध्यक्ष व स्वीकृत सदस्य कोण? शहराचे लक्ष नेतृत्वाच्या निर्णयाकडे

### नळदुर्ग न.पा.वर प्रथमच भाजप-शिवसेना महायुतीची सत्ता

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२६ डिसेंबर -**

नुकत्याच पार पडलेल्या नगरपालिका निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर नळदुर्ग नगरपालिकेवर कोणाची सत्ता राहणार हे स्पष्ट झाले असून नगरपालिकेच्या इतिहासात प्रथमच भाजप-शिवसेना महायुतीचा झेंडा फडकला आहे. नगरपालिकेवर भाजपचे वर्चस्व असून नवनिर्वाचित नगराध्यक्ष बसवराज धरणे यांनी सर्वांना धक्का देत दणदणीत विजय मिळविला आहे.

नगराध्यक्षपदाचा निकाल जाहीर झाल्यानंतर आता उपनगराध्यक्ष आणि स्वीकृत सदस्य कोण होणार, याबाबत शहरात मोठी उत्सुकता आहे. नळदुर्ग नगरपालिकेत भाजप-शिवसेना महायुतीचे ११ तर काँग्रेसचे ९ नगरसेवक निवडून आले आहेत. बहुमत महायुतीकडे असल्यामुळे उपनगराध्यक्षपद भाजपकडे जाणार हे जवळपास निश्चित मानले जात आहे. यावेळी नगरपालिकेत तीन स्वीकृत सदस्य निवडले जाणार असून संख्याबळानुसार भाजपच्या वाट्याला दोन, तर काँग्रेसच्या वाट्याला एक स्वीकृत सदस्य जाणार आहे. भाजप-शिवसेना महायुतीचा भाग म्हणून शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर घोडके यांनी स्वीकृत सदस्य होण्यासाठी प्रयत्न सुरू केले असून निवडणुकीदरम्यान त्यांना याबाबत शब्द देण्यात आल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे भाजपकडील स्वीकृत सदस्यांच्या यादीत त्यांचे नाव आघाडीवर आहे.




त्याचबरोबर भाजपचे माजी शहराध्यक्ष पद्माकर घोडके यांनीही स्वीकृत सदस्यपदासाठी जोरदार प्रयत्न सुरू केले आहेत. भाजपकडील उपनगराध्यक्ष आणि स्वीकृत सदस्य कोण असणार, याचा अंतिम निर्णय आमदार राणाजगजितसिंह पाटील आणि भाजप नेते सुनील चव्हाण घेणार आहेत. तर काँग्रेसच्या कोट्यातील स्वीकृत सदस्याबाबत निर्णय काँग्रेस नेते अशोक जगदाळे घेणार असल्याचे समजते.

निवडून आलेल्या नगराध्यक्षांना पदभार स्वीकारण्यासाठी २५ दिवसांची मुदत असते. त्यामुळे राज्य निवडणूक आयोग पदभार स्वीकारण्याचा कार्यक्रम कधी जाहीर करणार आणि नगराध्यक्ष बसवराज धरणे प्रत्यक्ष कारभार कधी सुरू करणार, याकडे नळदुर्गकरांचे लक्ष लागले आहे.

### उपनगराध्यक्षपदासाठी दोन नावे चर्चेत...

भाजपकडून उपनगराध्यक्षपदासाठी सध्या नय्यर जहागीरदार आणि दत्तात्रय दासकर यांची नावे चर्चेत आहेत. दोघांनाही नगरपालिका प्रशासनाचा मोठा अनुभव आहे. दत्तात्रय दासकर हे माजी नगराध्यक्ष तर नय्यर जहागीरदार हे माजी उपनगराध्यक्ष राहिले आहेत. या दोघांपैकी एकाला संधी दिली जाणार की भाजपमधील एखाद्या नव्या चेहऱ्याला उपनगराध्यक्षपदाची जबाबदारी दिली जाणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. उपनगराध्यक्षपदाचा अंतिम निर्णय आमदार राणाजगजितसिंह पाटील आणि भाजप नेते सुनील चव्हाण घेणार असल्याचे बोलले जात आहे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# हार्वेस्टरमध्ये अडकून शेतकऱ्याच्या शरीराचे तुकडे

**तभा वृत्तसेवा**

**औसा दि. २६ डिसेंबर :** अत्याधुनिक हार्वेस्टरने ऊस तोडणी करीत असताना कोपऱ्यातील ऊस गोळा करुन टाकताना तालुक्यातील आशिव येथील शेतकरी शंकर प्रभाकर सावंत वय ४० वर्षे यांच्या शरीराचे तुकडे झाल्याची घटना बुधवारी घडली.या प्रकृरणी भादा पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

औसा तालुक्यातील आशीव येथील शंकर सावंत यांच्या शेतातील उसाला कारखान्याची तोड आली होती. त्यामुळे ते शेतात गेले होते. बुधवारी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास हार्वेस्टरद्वारे ऊस तोड सुरू होती. यावेळी काही ऊस बाजूला

### आशिव येथील घटना; पोलिस उसाच्या फडात आल्यानंतर झाला उलगडा

पडल्याने तो हार्वेस्टरमध्ये टाकण्याचा प्रयत्न शेतकरी शंकर सावंत करीत होते. तेव्हा, अचानकपणे हार्वेस्टरमध्ये अडकून त्यांच्या शरीराचे तुकडे-तुकडे झाले. दुपारनंतर शेतात न दिसल्याने पत्नी व मुलाने त्यांचा शोध घेण्यास सुरुवात केली.

दीड दोन तासांनंतर उसाच्या काकरीमध्ये त्यांचा मोबाइल आणि चप्पल आढळून आला. त्यामुळे त्यांनी हार्वेस्टर चालकास विचारणा केली असता, मला काहीही माहिती नाही, असे सांगितले. माय-लेकराने पुन्हा शोधा शोध सुरू केली. रात्री ७ वाजेपर्यंत त्यांचा शोध लागला नाही.

हार्वेस्टर चालकास शेतकरी मशीनमध्ये अडकून मृत्युमुखी पडल्याचे लक्षात आल्यानंतर त्याने तत्काळ मशीन बंद केली आणि मालकास माहिती दिली. यादरम्यान मयत शेतकंऱ्यांच्या पत्नी व मुलाने हार्वेस्टर बंद का केले आहे अशी विचारणा केली. मात्र चालकाने मशीन मध्ये बिघाड झाली असल्याचे सांगून खरी माहिती देण्यास टाळाटाळ केली.

मशीन मालकाने या प्रकरणाची माहिती भादा पोलिसांना दिल्यानंतर पोलिस पथक रात्रीच्या सुमारास उसाच्या फडात दाखल झाले.त्यांनी शेतकरी शंकर सावंत यांचा मृतदेह हार्वेस्टर मधून बाहेर काढला. तेव्हा पत्नी व मुलास घटनेची माहिती समजली. या प्रकरणी भादा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास सहाय्यक पोलिस निरिक्षक महावीर जाधव पुढील तपास करीत आहेत.

# बोरोळ प्रशालेच्या गणवेश भ्रष्टाचाराची चौकशी करा

**तभा वृत्तसेवा**

**देवणी, दि. २६ डिसेंबर :** शालेय गणवेशाच्या रक्कमेची चौकशी करणे, व इयत्ता ९ वी. चे हिंदी या विषयाचा आजपर्यंत एकही पाठ पुर्ण न केले असल्याचे निवेदन शिक्षणाधिकारी प्रा. आणि माध्यमिक जि. प. लातुर यांना देण्यात आले.

### शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे यांना दिले निवेदन

जिल्हा परिषद प्रशाला बोरोळ ता. देवणी येथील शाळेतील गणवेश पात्र विद्यार्थी प्रती गणवेश दर ३०० रुपये प्रमाणे दिव्या साडी सेंटर हडोळती ता. अहमदपूर यांच्या नावाने ७०८००/- रुपये समायोजन देण्यात आले होते. त्या दुकाणदारांने २००००/- रुपये पेक्षा जास्त रक्कम मु. अ. महेश तांदळे यांना देण्यात आली. याची सखोल चौकशी होऊन त्यांच्यावर योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करण्यात यावी. तसेच आठवी ते दहावी या वर्गापैकी इयत्ता नववी या वर्गाचा चालू वर्षाचा हिंदी विषयाचा द्वित्तीय सत्रा पर्यंत अभ्यासक्रम पुर्ण करण्यात

> मु.अ. महेश तांदळे यापूर्वी येरोळ, तालुका शिरुर अनंतपाळ येथील प्रशाले मध्ये कार्यरत असताना त्यांना गावकऱ्यांनी शाळेला कुलूप लावून त्यांच्यावर निलंबनाची कार्यवाही केलेली होती. असे निवेदन कर्ते शालेय समिती अध्यक्ष सत्यदेव गरड यांनी सांगितले.




आले नाही. अशी पालक व विद्यार्थ्यांची तक्रार असुन यांची ही चौकशी होऊन योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. उल्लेख केलेल्या विषयाची सबळ पुरावे शालेय समितीकडे उपलब्ध आहेत. यावर वरिष्ठांने तात्काळ चौकशी करून संबंधित मुख्याध्यापकावर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी अन्यथा अमरण उपोषण करण्यात येईल. असे निवेदन शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे जि. प. लातुर यांना देण्यात आले.

या निवेदनावर शालेय समिती अध्यक्ष सत्यदेव गरड, बालाजी हुंजे, अंकुश पाटील, उर्मिला धनाडे, संजीवन चन्नाळे, सरस्वती पंढरपुरे, महेबुब मुंजेवार सह अदिंची स्वाक्षऱ्या आहेत.

# मातृभूमीच्या वतीने एड्स जन जागृती रॅली

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. २६ डिसेंबर :** येथील मातृभूमी महाविद्यालय कस्तुराबाई नर्सिंग स्कूल मातृभूमी नर्सिंग स्कूल च्या वतीने जागतिक एड्स निर्मूलन दिनानिमित्त जनजागृती रॅली काढण्यात आली.

रॅलीचे उद्घाटन सामान्य रुग्णालयाचे वैद्यकिय अधिक्षक पांडूरंग दोडके व मातृभूमी प्रतिष्ठान शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सतीश ऊसतुरे यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी मातृभूमी महाविद्यालयाच्या प्राचार्या उषा कुलकर्णी बि समुपदेशक शशिकांत महालिंगे,उमाकांत कांबळे. इंगळे, सोनकांबळे रणजित पाटील, प्रा सय्यद उस्ताद, प्रा रणजित मोरे, प्रा शितल पवार, प्रा शिवांगी वट्टमवार, काळे अस्विनी, प्रा काकरे प्रतीक्षा, ग्रंथपाल उषा सताळकर, रामकिशन भोसले, मादळे प्रदीप, दीपक रणदिवे, दयानंद टाके, विवेक देवर्षे, मयुर मुळे, संगीता दुडे, सय्यद सिमा, प्रकाश गायकवाड, जगदिशा ओंकारे , मुबारक पटेल, अर्चना बिरादार यांच्यासह शिक्षक शिक्षेत्तर कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले. रॅलीचे उद्घाटन मातृभूमी महाविद्यालयात परत रॅली छत्रपती शिवाजी महाराज चौक सामान्य रुग्णालय येथून जात समारोप मातृभूमी महाविद्यालयात करण्यात आला.




# चाकूर पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी वाघमारे; सचिवपदी पाटील

**तभा वृत्तसेवा**

**चाकूर, दि. २६ डिसेंबर :** चाकूर तालुका मराठी पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी संग्राम



वाघमारे तर सचिवपदी संजय पाटील यांची मतदानाद्वारे निवड करण्यात आली. या निवडीचे सर्वत्र उत्स्फूर्त स्वागत व अभिनंदन होत आहे.

रविवारी दि.२५ डिसेंबर रोजी शासकीय विश्रामगृह येथे ही निवडणूक घेण्यात आली. ३५ सदस्यांनी मतदान नोंदणी केली. या निवडणुकीत अध्यक्षपदासाठी ४ आणि सचिव पदासाठी २ उमेदवार रिंगणात होते. यामध्ये अध्यक्षपदासाठीचे उमेदवार संग्राम वाघमारे यांनी सर्वाधिक मते घेतली. तर सचिव संजय पाटील यांना सर्वाधिक मते पडली यामध्ये अध्यक्ष संग्राम वाघमारे आणि सचिव संजय पाटील यांना निवडणूक निर्णय अधिकारी विनोद नीला, सुधाकर हेमनर आणि संगमेश्वर जनगावे यांनी विजयी घोषीत केले.

या निवडणूकीत निवडणूक निर्णय अधिकारी विनोद नीला, सुधाकर हेमनर आणि संगमेश्वर जनगावे यांनी काम पाहिले. दरम्यान पत्रकार संघाच्या वतीने नूतन अध्यक्ष सचिवांचा सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी पत्रकार संघांचे संस्थापक प्रशांत शेटे, माजी अध्यक्ष माधव वाघ, माधव तरगुडे, शिवशंकर टाक, सदाशिव मोरे, पत्रकार राजकुमार जगताप, माजी सचिव अशोक बिराजदार, माजी सचिव सतिश गाडेकर, साखराप्पा वाघमारे, दयानंद सूर्यवंशी, दत्ता मेहकरे, बापूराव माने, उद्धव दुवे, सुशील वाघमारे, माजी सचिव विकास स्वामी, दत्तात्रय बेंबडे, किशन वडारे, पांडुरंग साळुंके, युसूफ शेख, गणेश स्वामी, चेतन होळदांडगे, बसवेश्वर जनगावे, दीपक पाटील, सुनील जाधव, नवनाथ डिगोळे, रियाज मणियार, गजानन चेऊलवार, बालाजी काटमपल्ले, देविदास हेमनर आदिजण उपस्थित होते.

राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी नुतन अध्यक्ष संग्राम वाघमारे आणि सचिव संजय पाटील यांच्या निवडीबद्दल सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी पत्रकार अनिल वाडकर, राष्ट्रवादी नेते शिवानंद हेंगणे, दयानंद सुरवसे, संदीप शेटे उपस्थित होते.

# पालिकेच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणासाठी प्रयत्न करणार : नगराध्यक्षा सौ. स्वाती हुडे

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. २६ डिसेंबर :** उदगीरकरांनी मोठा विश्र्वास टाकत आपल्याला नगराध्यक्षपदी काम करण्याची संधी उपलब्ध करून दिली असून, या संधीचे सोने करीत उदगीरच्या सर्वांगीण विकासासाठी आपण कायम प्रयत्नशील राहू अशी ग्वाही देत उदगीरच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. स्वाती सचिन हुडे यांनी पालिकेच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

उदगीर येथील शिवनंदा फँक्शन हॉल येथे आदिशक्ती महिला ग्रुपच्या वतीने नुकत्याच झालेल्या नगर परिषद निवडणुकीत सर्वच पक्षांकडून निवडून आलेल्या महिला नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी स्वाती हुडे बोलत होत्या. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ. शिल्पा संजय बनसोडे होत्या. व्यासपीठावर सौ. प्रेमाताई राजशेखर पाटील प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

प्रारंभी या कार्यक्रमामागच्या आयोजनाची भूमिका प्रस्ताविकातून महानंदा सोनटक्के यांनी विषद केली.

यावेळी बोलताना नगराध्यक्षा सौ. स्वाती हुडे म्हणाल्या की, उदगीरच्या मतदारांनी मोठा विश्र्वास टाकला आहे. या विश्र्वासास पात्र राहून काम करीत असताना दिलेली आश्र्वासने पाच वर्षात पूर्ण करण्याचा प्रयत्न करणार आहे. उदगीरच्या सर्वांगीण विकासासाठी काम करीत असताना सर्व महिलांना सोबत घेऊन काम करणार असल्याचे सांगत महिला बचत गटाच्या माध्यमातून महिलांना सक्षम करण्यासाठी प्राधान्याने काम करणार असल्याचे हुडे यावेळी म्हणाल्या.

यावेळी बोलताना सौ.



शिल्पा बनसोडे यांनी नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेवकांना शुभेच्छा देत पाच वर्षाच्या काळात उदगीरच्या विकासात आपला हातभार लावण्याचे आवाहन केले.

आ. संजय बनसोडे राज्य सरकारच्या माध्यमातून नगर परिषदेला मोठा निधी उपलब्ध करून देतील त्या निधीचा योग्य विनियोग करण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिता हैबतपुरे यांनी केले. आभार प्रा. मंगला विश्र्वनाथे यांनी मानले.

या कार्यक्रमासाठी योजना चनगे, ज्योत्स्ना समगे, सुनिता मदनुरे, विद्या पांढरे, ज्योती चौधरी, सरस्वती चौधरी, योजना चौधरी, ज्योती डोळे, सीमा तोंडचिरकर, प्रा. शकुंतला पाटील, श्रेया शिरशीकर, रेखा पाटील, उषा कुलकर्णी, प्रा सुनिता चवळे,शमीम शेख, किरण मुंडकर, अर्चना मानकरी, स्मिता पटवारी, आशा पोलावार यांनी पुढाकार घेतला.

# शेतकरी वळले कांदा लागवडीकडे



**तभा वृत्तसेवा**

**शिरूर अनंतपाळ, दि. २६ डिसेंबर :** शिरूर अनंतपाळ सह परिसरातील शिवारात काही शेतकरी कांदा लागवडीकडे वळले आहेत. येथील बुधवारच्या आठवडी बाजारात कांद्याचे रोप विक्रीसाठी येत असल्याने शेतकरी रोप खरेदी करत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. यावर्षी जून महिन्यापासूनच पावसाने आशादायी सुरुवात केली होती. पावसामुळे शेती उत्पादनाचे काही प्रमाणात नुकसान झाले. खरीप हंगामात लावलेला भाजीपाला पावसामुळे हाती लागला नाही. त्यामुळे भाजीपाल्याचे भाव वधारले होते. आता हिवाळा सुरू झाल्याने भाजीपाला उत्पादनास पोषक वातावरण निर्माण झाले आहे.

सध्या कांदा, मिरची, टोमॅटो, वांगे आदी भाजीपाल्यासह कांद्याचे रोप विक्रीसाठी शिरूर अनंतपाळ आणि नळेगाव येथील आठवडी बाजारात आणले जात आहे. अडीच ते तीन महिन्याच्या कालावधीत हे पीक काढणीसाठी येते असे शेतकरी सांगतात. तर काही शेतकरी आठवडी बाजारात कांद्याची पात विक्रीसाठी आणतात. त्यामुळे कांद्याच्या रोपास मागणी वाढली असल्याचे दिसून येत आहे. मागणी वाढली असली तरी रोप मुबलक प्रमाणात उपलब्ध असल्याने कवडीमोल भावाने खरेदी करताना शेतकरी दिसत आहेत. यंदा मुबलक पाऊस झाल्याने नळेगाव येथील घरणी प्रकल्पात पाणीसाठा भरपूर असल्याने जलस्त्रोतांची पाणीपातळी चांगली वाढली. या घरणी प्रकल्पाचा शिरूर अनंतपाळ सह नळेगाव शिवारातील शेतकऱ्यांना भरपूर फायदा होतो.त्यामुळे शेतकऱ्यांना भाजीपाला लागवडीसाठी याचा उपयोग होणार आहे.

पंधरा ते वीस रुपये किलो दराने विक्री होत आहे लहान आकाराच्या रोपाचा भाव वीस रुपये प्रति किलो तर जाड बुडाच्या रोपाचा भाव पंधरा रुपये प्रति किलो दराने विक्री होत असल्याचे दिसून येत आहे. कांद्यापेक्षा कमी भाव मिळत असल्याने रोप उत्पादक शेतकऱ्यांना याचा फटका बसत आहे . रेणापूर, कळंब, अहमदपूर, उदगीर, निलंगा, देवणी येथील रोप उत्पादक शेतकरी या आठवडी बाजारात विक्रीसाठी येतात. वाहन भाडे,मजुर, व मशागतीसह इतर खर्च आणि बाजारात मिळणारा कवडीमोल भावा यामुळे रोप उत्पादक शेतकरी संकटात सापडला आहे.

# जिथे उत्पादन तिथेच विक्री; शेतकऱ्याचा मंत्र यशस्वी

**तभा वृत्तसेवा**

**शिरूर अनंतपाळ, दि. २६ डिसेंबर :** शिरूर अनंतपाळ तालुक्यातील नारायण दामले या प्रयोगशील शेतकऱ्याने जिथे उत्पादन तिथेच विक्री हा मूलमंत्र प्रत्यक्षात उतरवत शेतीला नवे वळण दिले आहे. स्वतःच्या कष्टातून त्यांनी विकसित केलेल्या फळबागेतून थेट शेतातच फळविक्री करून ते इतर शेतकऱ्यांसाठी आदर्श ठरत आहेत.

दामले यांच्या बागेमध्ये सीताफळ, पेरू, चिकू यांसारख्या विविध फळझाडांची लागवड करण्यात आली आहे. या बागेत उत्पादित होणारी ताजी फळे ते थेट आपल्या शेतालगत रस्त्याच्या कडेला बसून विक्री करतात. या परिसरात असा प्रयोग करणारे ते एकमेव शेतकरी ठरले असून ग्राहकांकडून त्यांना मोठा प्रतिसाद मिळत आहे. थेट शेतातून मिळणारा ताजा, दर्जेदार व खात्रीशीर माल हीच या



विक्रीची जमेची बाजू ठरत आहे.

केवळ बागायती शेतीपुरते न थांबता त्यांनी याला जोडधंद्याची जोड दिली आहे. दामले यांच्या शेतात गावरान पोल्ट्री व्यवसायही सुरू असून, त्यातून उत्पादित होणारी गावरान कोंबडीची अंडी ग्राहकांच्या मागणीनुसार त्याच ठिकाणी उपलब्ध करून दिली जातात.

सुरुवातीला पाण्याअभावी त्यांची शेती कोरडवाहू स्वरूपाची होती. मात्र सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे शेतात विहीर झाली. मर्यादित पाण्यावर येणारी सीताफळाची बाग त्यांनी निवडली आणि हाच निर्णय त्यांच्या शाश्वत विकासाचा आधार ठरला. विशेष म्हणजे या बागेची नीटनेटकी रचना, झाडांची शास्त्रशुद्ध छाटणी, स्वच्छता आणि सौंदर्य यामुळे येथे थांबणाऱ्या प्रवाशांना आपण शेतात आलो की एखाद्या पर्यटनस्थळी, असा भास होतो. त्यामुळे फळ खरेदीसाठी थांबलेला ग्राहक सहजपणे त्या ठिकाणी अधिक वेळ घालवतो. नारायण दामले यांचा हा उपक्रम शेतकऱ्यांनी थेट विक्रीकडे व जोडधंद्याकडे वळावे, यासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# दिव्यांग लाभार्थ्यांनी यूडीआयडी कार्ड सादर करावे : धुमाळ

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि. २६ डिसेंबर :** निलंगा तालुक्यातील संजय गांधी निराधार योजनेतील एकुण २६६१ दिव्यांग (अपंग) लाभार्थ्यांपैकी १४८७ लाभार्थीनी कागदपत्रे जमा केलेली आहेत. परंतु अद्यापपर्यंत ११७४ अपंग लाभार्थ्यांनी अपंगत्वाचे यूडीआयडी कार्ड जमा केले नाहीत त्यांची प्रकाशित केली असून अपंग लाभार्थ्यांनी अपंगत्वाचे प्रमाणपत्र (युनिक डिसॅबिलिटी आयडी कार्ड) व आधार कार्ड झेरॉक्स प्रत निलंगा तहसील कार्यालयात तात्काळ सादर करावे असे आवाहन संगायो विभागाचे नायब तहसीलदार अनिल धुमाळ यांनी केले आहे.

शासनाने संजय गांधी निराधार अनुदान योजनेच्या अपंग लाभार्थ्यांचे अनुदान १५०० वरुन २५०० केले असुन सर्व अपंग लाभार्थ्यांना यूडीआयडी कार्ड जोडणे अनिवार्य केले असुन अपंग लाभार्थ्यांनी अपंगत्वाचे कार्ड व आधार कार्ड झेरॉक्स प्रत तात्काळ जमा करावी असे आवाहन केले आहे.

# कासार शिरसीत माजी विद्यार्थ्यांचा २५ वर्षांनंतर स्नेहमेळावा

**तभा वृत्तसेवा**

**कासार सिरसी, दि. २६ डिसेंबर :** निलंगा तालुक्यातील कासार शिरसी येथील श्री करीबसवेश्वर विद्यालयात सन २०००-२००१ मध्ये दहावीत शिकणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या स्नेह मेळाव्यानिमित्त सर्व माजी विद्यार्थ्यांनी तब्बल२५ वर्षानंतर एकत्र येत पुन्हा एकदा शालेय जीवनाचा आनंद घेतला.

शाळेत केलेली मौज, एकत्र बसून केलेला अभ्यास, शाळेतील शिक्षकांची कडक शिस्त, शिक्षकांनी दिलेली शिक्षा, चांगल्या बाकावर बसण्यासाठी ची लढाई, राष्ट्रीय उत्सव व त्यांची तयारी, खेळण्याच्या स्पर्धा अशा शालेय जीवनातील त्यावेळच्या अनेक जुन्या आठवणी काढत जुन्या आठवणींना उजाळा देण्यात आला. तब्बल २५ वर्षानंतर एकत्र आल्याने एकमेकांशी चांगल्याच गप्पा या कार्यक्रमात रंगल्या होत्या. तर काही माजी विद्यार्थी यावेळी भावनिकही झाली होते.

या स्नेह मेळाव्याची सुरुवात राष्ट्रगीताने करण्यात आली. त्यानंतर व्यासपीठावरील प्रमुख अतिथी तथा गुरुजनांच्या हस्ते



दीप प्रज्वलन करण्यात आले. व प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. त्यानंतर निधन पावलेल्या गुरुजनांना व वर्ग मित्रांना आदरांजली वाहण्यात आली. व व्यासपीठावर उपस्थित प्रमुख अतिथी व गुरुजनांचा सत्कार करून सन्मान करण्यात आला. त्यानंतर प्रत्येक माजी विद्यार्थ्यांनी व्यासपीठावर येऊन कविता, चारोळी, वात्रटिका, शायरी, अशा विविध अंतर्गत कलागुणांचे सादरीकरण केले. त्यानंतर सर्व गुरुजन, प्रमुख अतिथी व माजी विद्यार्थ्यांनी एकत्र बसून स्नेहभोजनाचा आनंद घेतला. त्यानंतर पुढील सत्रात संगीत रजनी, संगीत खुर्ची, उखाणे, प्रश्नोत्तरे, असे विविध मनोरंजनात्मक खेळ खेळण्यात आले. यावेळी माजी विद्यार्थ्यांनी वयाचे भान विसरून शालेय जीवनात रमून गेले होते.

या स्नेहमिलन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेच्या प्राचार्या श्रीमती सविता मुरूमकर हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून या शाळेच्या इयत्ता दहावीच्या प्रथम बॅचचे(१९६१) चे माजी विद्यार्थी विश्वनाथ होळकुंदे उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना होळकुंदे म्हणाले की, जीवनामध्ये आपणास काही ऋण फेडायचे असतात आई-वडिलांचे ऋण आपण फेडतोच पण समाजाचे आणि देशाचे ऋण मान्य करून ते फेडण्याचा आपण प्रयत्न करावा व आपल्या कमाईचा पाच ते दहा टक्के आपण समाज हितासाठी खर्च करावा व त्यात पर्यावरणासाठी वृक्षारोपण हा चांगला पर्याय आहे. तरुणांनी आपले गाव वृक्षांनी हिरवीगार करण्यासाठी आपल्या परिने प्रयत्न करावे असे आवाहनही यावेळी केले. तर कार्यक्रमाचे अध्यक्षा प्राचार्य श्रीमती मुरूमकर यांनी उपस्थित सर्व माजी विद्यार्थ्यांना शाळेविषयी माहिती देऊन व सर्व माजी विद्यार्थ्यांच्या चांगल्या आरोग्यासाठी व उत्तम आयुष्यासाठी सदिच्छा दिल्या.

यावेळी व्यासपीठावर श्री करीबसवेश्वर शिक्षण संस्थेचे गिरीश चिंचनसुरे, सुधीर चिंचनसुरे, एस.एस. बिराजदार, कलशेट्टी, जगताप, वरवटे, जवळगे, दीपक कदम, बसमुंगे मॅडम, राजेंद्र गोरे, उन्हाळे, वाडीकर यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक माजी विद्यार्थी प्रशांत स्वामी यांनी केले तर आभार प्रदर्शन बलवीर पांडे यांनी मानले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक अमोल माळशट्टे व ऐश्वर्या हिबारे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ओम डिग्गे, सचिन होळकुंदे, राजकुमार डबरे, अमोल पाठक, नारायण डोंबाळे, अशा दुरुगकर, गीतांजली हबाडे, यांनी परिश्रम घेतले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## रुईभर येथे साने गुरुजी जयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ डिसेंबर -**

जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथे थोर समाजसुधारक साने गुरुजी यांची जयंती तसेच धाराशिव येथील उद्योजिका प्रेमलता महावीर कोठारी यांचा ६९ वा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला.



या प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते साने गुरुजी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. प्रेमलता कोठारी यांनी विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी विद्यालयास सिलिंग फॅन भेट दिले तसेच विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप केले.

कार्यक्रम डॉ. आंबेडकर बालविकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुभाषदादा कोळगे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. यावेळी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...



### कळंबमध्ये शेतकरी पांडुरंग आंबीरकर यांचा शेतातच सन्मान

**कळंब, दि.२६ डिसेंबर -**

उन्हा, पावसात व थंडीत अथक परिश्रम करून काळी आईची सेवा करणारा आणि जगाचा पोशिंदा असलेल्या शेतकऱ्यांचे ऋण व्यक्त करण्यासाठी दरवर्षी दि. २३ डिसेंबर रोजी जागतिक राष्ट्रीय शेतकरी दिन साजरा केला जातो. हा दिवस शेतकरी नेते व देशाचे पाचवे पंतप्रधान चौधरी चरणसिंग यांच्या जयंतीनिमित्त साजरा करण्यात येतो. या निमित्ताने कळंब येथील सामाजिक कार्यकर्ते व ज्येष्ठ नागरिकांच्या वतीने पिंपळगाव (डोळा) शिवारातील शेतात पिकाची डुबणे करत असलेले शेतकरी पांडुरंग आंबीरकर यांचा त्यांच्या शेतातच जाऊन गौरव करण्यात आला. याप्रसंगी सुरेश टेकाळे, माधवसिंग राजपूत, अच्युत पौळ, सुनील लाटे, शेतकरी श्रीकांत आंबीरकर, गणेश हाजगुडे, भाग्यश्री हाजगुडे, कविता पाटील, गोपाळ हाजगुडे आदी मान्यवर उपस्थित होते.



### काँग्रेसच्या नुतन नगरसेविका अर्चना मोरे यांचा सत्कार

**कळंब, दि.२६ डिसेंबर -**

येथे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे व काँग्रेस आय आघाडीच्या नगरपालिका निवडणुकीत विजयी झालेल्या काँग्रेसच्या एकमेव नूतन नगरसेविका अर्चना प्रताप मोरे यांचा सत्कार आ. कैलास पाटील यांनी केला. तसेच पराभूत अशा सर्व उमेदवारांची संयुक्त बैठक पार पडली. या बैठकीत निवडणूक निकालाचा सखोल आढावा घेण्यात आला. जनतेने दिलेल्या कौलाचा आदर करत, निवडणुकीदरम्यान कार्यकर्त्यांनी घेतलेली मेहनत, उमेदवारांचा संघर्ष आणि संघटनात्मक ताकद यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी महिला आघाडी अध्यक्ष धनश्री कवडे, प्रदीप मेटे, सचिन काळे, सागर बाराते, संजय मुंदडा आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



### कळंब येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यास अभिवादन

**कळंब, दि.२६ डिसेंबर -**

कळंब शहरातील महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास मनुस्मृती दहन दिनानिमित्त दि.२५ रोजी विनम्र अभिवादन करण्यात आले. भारतीय घटनेचे शिल्पकार, बोधिसत्व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दि.२५ डिसेंबर १९२७ रोजी रायगडाच्या पायथ्याशी महाड येथे मनुस्मृती दहन करून अन्यायकारक जातिव्यवस्था, स्त्री व दलितांवरील भेदभाव तसेच अमानवी नियमांच्या विरोधात ऐतिहासिक लढ्याचा संदेश दिला होता. हा दिवस सामाजिक समता, न्याय व मानवी मूल्यांचा उद्घोष करणारा ठरला आहे. या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून मनुस्मृतीचा निषेध करण्यात आला. यावेळी सतपाल बनसोडे, नितीन आंगरखे, महादेव सौदागर, अमित जाधव, बाळासाहेब हौसलमल, रवी धावारे, रसूल शेख यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

### वाहतूक नियमभंगावर कारवाई

**धाराशिव, दि.२६ डिसेंबर -**

शहर वाहतूक शाखा व संबंधित पोलीस ठाण्यांनी दि.२३ डिसेंबर रोजी शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांवर मोटार वाहन कायदा व नियमभंग प्रकरणी कडक कारवाई केली. या मोहिमेत एकूण २६१ कारवाया करण्यात येऊन २,२०,७०० रुपये तडजोड शुल्क वसूल करण्यात आला.

## 'रूपामाता'चा दिल्लीत वंदे मातृशक्ति माता पूजन कार्यक्रमाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ डिसेंबर -**

ॲड. व्यंकट गुंड पाटील यांनी आपल्या आईच्या स्मरणार्थ रूपामाता उद्योग समूह सुरू करून त्यामार्फत हजारो लोकांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे. आईच्या स्मृतींना वंदन करण्याच्या उद्देशाने रूपामाता परिवाराच्या वतीने दिल्ली येथे 'वंदे मातृशक्ति माता पूजन दिवस २०२५' हा भव्य आणि अर्थपूर्ण कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा उपक्रम मातृभूमीप्रेम, मातृसंस्कार आणि मातृत्वाच्या गौरवशाली भारतीय परंपरेचा उत्सव ठरणार आहे.

हा विशेष कार्यक्रम दि. ३० डिसेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता, भीम ऑडिटोरियम, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल सेंटर, जनपथ रोड, नवी दिल्ली येथे होणार आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून मातृत्वाच्या तेजस्वी मूल्यांचा गौरव करण्यासाठी देशभरातील महान मातांना एका मंचावर आणण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

या भव्य सोहळ्याचे उद्घाटन सर्वोच्च न्यायालयाच्या माजी न्यायमूर्ती ज्ञानसुधा मिश्रा यांच्या हस्ते होणार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती विजया रहाटकर असतील. कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून श्रीमद्जगद्गुरू स्वामी राजेंद्र दास देवाचार्य महाराज, पतंजली योगपीठ हरिद्वारचे स्वामी रामदेव बाबा आणि




अहिंसा विश्व भारतीचे संस्थापक अध्यक्ष आचार्य डॉ. लोकेश मुनी यांची उपस्थिती लाभणार आहे. या संतांच्या मार्गदर्शनातून मातृशक्तीचे राष्ट्रनिर्मितीतील महत्त्व अधोरेखित होणार आहे.

या प्रसंगी देशभरातून निवडलेल्या अनेक मातांचा सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह देऊन विशेष गौरव करण्यात येणार आहे. कुटुंब, समाज, संस्कृती, शिक्षण, सेवा व राष्ट्रहितासाठी आयुष्य समर्पित करणाऱ्या मातृत्वाच्या त्याग, सामर्थ्य व योगदानाचा गौरव करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

कार्यक्रमाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे कालीपुत्र कालीचरण महाराज यांची भक्तिमय भजन संध्या. यामध्ये शिवतांडव, अभंग व देवीचा गोंधळ सादर होणार आहे. हभप. पुरुषोत्तम महाराज पाटील 'आई माझी' ही प्रसिद्ध कविता सादर करणार असून, हभप. विशाल महाराज खोले हे पिंगळा व छत्रपती शिवाजी महाराजांचा पोवाडा सादर करतील.

तसेच हभप. सोपान सानप शास्त्री महाराज अभंग गायन करणार आहेत. यामुळे संपूर्ण वातावरण भक्ती, अध्यात्म आणि संस्कारांनी भारावून जाणार आहे.

हा कार्यक्रम रूपामाता फाउंडेशन, धाराशिव (संस्थापक अध्यक्ष ॲड. व्यंकट विश्वनाथराव पाटील) आणि श्री गणेश सेवा मंडळ, लक्ष्मीनगर, दिल्ली (संस्थापक अध्यक्ष महेंद्र लड्डा) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला आहे. श्री गणेश सेवा मंडळ गेल्या २४ वर्षांपासून दिल्लीमध्ये गणेशोत्सव, निर्धन कन्या विवाह, गोपालन व विविध समाजोपयोगी उपक्रम राबवत आहे.

'वंदे मातृशक्ति माता पूजन दिवस' हा केवळ धार्मिक किंवा सांस्कृतिक कार्यक्रम नसून, भारतीय समाजव्यवस्थेत मातृत्वाच्या सर्वोच्च स्थानाची जाणीव पुन्हा जागवणारा प्रेरणादायी उपक्रम आहे. माता ही संस्कारांची मूळ, कुटुंबाचे हृदय आणि समाजाचे नैतिक केंद्र आहे, हा संदेश देशभर पोहोचवण्याचा प्रयत्न या कार्यक्रमातून करण्यात येत आहे.

## मूकबधिर अपंगावर हल्ला प्रकरणी निष्पक्ष व कठोर तपासाची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२६ डिसेंबर -**

येथील मूकबधिर व अपंग व्यक्ती राजेश श्रीमंत पवार यांच्यावर झालेल्या अमानुष हल्ल्याप्रकरणी दाखल करण्यात आलेल्या FIR क्रमांक ०५२३/२०२५ च्या तपासात निष्पक्षता, वेग व कायदेशीर कठोरता राखण्यात यावी, अशी ठाम मागणी वीर वडार युवा महाराष्ट्रच्या वतीने प्रदेशाध्यक्ष अविनाश राजेंद्र पवार यांनी पोलीस निरीक्षकांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

दि. २३ डिसेंबर रोजी घडलेल्या या घटनेत पीडित व्यक्तीस गंभीर दुखापत झाली असून, पीडिताचे अपंगत्व, मूकबधिर अवस्था व स्वतःचे संरक्षण करण्याची मर्यादा लक्षात घेता ही घटना अत्यंत गंभीर व अमानुष स्वरूपाची असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणाच्या चौकशीसाठी निष्पक्ष तपास अधिकारी नियुक्त करून त्याची माहिती लेखी स्वरूपात देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

तपासात निष्काळजीपणा, विलंब, सौम्य कलमे लावण्याचा प्रयत्न किंवा कोणताही प्रभाव आढळून आल्यास आम्ही जिल्हा पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी, राज्य जइउ आयोग, मानवाधिकार आयोग तसेच माननीय उच्च न्यायालयापर्यंत दाद मागू, असा इशाराही वीर वडार युवा महाराष्ट्रच्या वतीने पोलीस प्रशासनास देण्यात आला आहे.

निवेदन सादर करताना अविनाश पवार, सुनील पवार, विकी मंडोळे, सोनू पवार, शशिकांत पवार, आण्णा जाधव, संतोष पवार, युवराज पवार, दिगंबर माने, रोहन पवार यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## मांजरा (कंचेश्वर) कारखान्यात ऊस तोडणी मजूर व कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य तपासणी शिबीर



**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.२६ डिसेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील मंगरुळ येथील मांजरा शुगर (कंचेश्वर) इंडस्ट्रीज प्रा. लि. या साखर कारखान्याचा गाळप हंगाम २०२५-२६ महाराष्ट्राचे माजी मंत्री व सहकार महर्षी मा. दिलीपरावजी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे सुरू आहे. या गाळप हंगामात कार्यरत असलेल्या ऊस तोडणी मजूर व कारखाना कर्मचाऱ्यांसाठी महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाचे सहाव्याने प्राथमिक आरोग्य केंद्र, मंगरुळ व कारखान्याच्या संयुक्त विद्यमाने बुधवार (दि. २३) रोजी कारखाना स्थळावर मोफत आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले.

कारखान्याचा गाळप हंगाम जोमात सुरू असून या कालावधीत काम करणारे ऊस तोडणी मजूर, वाहन चालक तसेच कारखान्यातील कर्मचारी यांच्या आरोग्याच्या दृष्टीने हे शिबीर महत्त्वाचे ठरले. या आरोग्य शिबीरात १५१ लाभार्थ्यांनी सहभाग नोंदवून विविध प्रकारच्या शारीरिक तपासण्या करून घेतल्या. प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी लाभार्थ्यांची तपासणी करून प्राथमिक उपचार व औषधांचे मोफत वितरण केले.

यावेळी कारखान्याचे जनरल मॅनेजर संतोष वाकडे यांच्या हस्ते डॉ. अभिषेक पाटील, डॉ. सुयोग बडणे, डॉ. दिनार उपासे, डॉ. वहिदा शेख, डॉ. अर्चना जाधव, नितीन शिंदे, ज्ञानेश्वर लगड, उत्कर्षा नेचाळे, गडदे, दूधभाते, हराळ, रांजणे, ढोक, आशा कार्यकर्त्या शिरगिरे, जाधव, लोहार, गुरव, पवार, मोहिनी मुळे तसेच वाहन चालक मारुती गवळी यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास कारखान्याचे अजित कदम, बाळासाहेब पेठे, सुखदेव कदम यांच्यासह सर्व खातेप्रमुख, विभागप्रमुख, ऊस तोडणी मजूर व कर्मचारी उपस्थित होते.

## भारत रत्न स्वर्गीय अटल बिहारी वाजपेयी जयंतीनिमित्त परंड्यात अभिवादन



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२६ डिसेंबर -**

भारतीय राजकारणातील शिखरपुरुष, लोकनायक, विलक्षण नेतृत्वगुणांनी युक्त, दूरदर्शी विचारवंत, अमोघ वक्ते, अजातशत्रू आणि माजी पंतप्रधान भारत रत्न स्व. अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त परंडा येथे अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी नवनिर्वाचित नगरसेवक व युवा नेते समरजीतसिंह सुजितसिंह ठाकूर यांच्या हस्ते भाजपा संपर्क कार्यालय, परंडा येथे स्व. वाजपेयी यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी भाजपाचे ॲड. गणेश खरसडे, ॲड. संतोष सूर्यवंशी, ॲड. जहीर चौधरी, विकास कुलकर्णी, अविनाश विधाते, बाबासाहेब जाधव, धनाजी गायकवाड, तानाजी पाटील, तालुका उपाध्यक्ष डॉ. अमोल गोफणे, हरी शिंदे, किरण देशमुख, जोतीराम गिरवले, साहेबराव पाडुळे, तानाजी घोडके, निशिकांत क्षिरसागर, सारंग घोगरे, रामदास गुडे, बाळासाहेब गिरी, सागर पाटील, योगेश डांगे, अभिषेक चोबे, डॉ. आनंद मोरे, धनंजय काळे, गजानन तिवारी, अमर ठाकूर, गौरव पाटील, संतोष गायकवाड, सिद्धीक हन्नूरे, सुरज काळे, व्यंकटेश दीक्षित, तुषार कोळेकर, जयंत भातलवंडे यांच्यासह इतर मान्यवर, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### धाराशिव येथे मोफत सामुदायिक विवाह सोहळा

**धाराशिव, दि.२६ डिसेंबर -**

मध्यवर्ती सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीच्या वतीने 'एक हात मदतीचा' या उपक्रमांतर्गत मोफत जिल्हास्तरीय (बिगरहुंडा) सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन रविवार, दि. ८ फेब्रुवारी २०२६ रोजी करण्यात आले आहे.

शहरातील जिल्हा परिषद कन्या प्रशालेच्या मैदानावर सायंकाळी ६.२५ वाजता हा विवाह सोहळा संपन्न होणार आहे. इच्छुक वधू-वरांच्या पालकांनी दि. १५ जानेवारी २०२६ पर्यंत नावनोंदणी करावी, असे आवाहन समितीचे अध्यक्ष आकाश मिलिंदराव कोकाटे यांनी केले आहे.

## ढोकी पोलिसांची जुगारविरोधी कारवाई, एकावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ डिसेंबर -**

ढोकी पोलीस ठाण्याच्या पथकाने जुगारविरोधी कारवाई करत दि. २३ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी १.४० वाजता फळरोप वाटीका प्रकल्पाच्या बोर्डाजवळ रोडलगत छापा टाकला.

यावेळी राजेंद्र दादाराव ढवारे (वय ६५, रा. भिमनगर, ढोकी) याच्याकडे कल्याण मटका जुगाराचे साहित्य व रोख ५६० रुपये आढळून आले.

पोलिसांनी जुगाराचे साहित्य व रक्कम जप्त करून संबंधित आरोपीविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२(अ) अन्वये ढोकी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवला आहे.

## जि.प. हायस्कूल, उमरग्याला राज्यस्तरीय 'स्वच्छ व हरित विद्यालय' मानांकन

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२६ डिसेंबर -**

उमरगा येथील आयएसओ मानांकित जिल्हा परिषद हायस्कूलला सन २०२५ मध्ये राज्यस्तरीय स्वच्छ व हरित विद्यालय स्पर्धेत मानांकन प्राप्त झाले आहे. या स्पर्धेच्या मूल्यांकनासाठी युनिसेफ या जागतिक संस्थेच्या राम कोलगुडे यांच्या मार्गदर्शनाखालील पथकाने नुकतीच शाळेची पाहणी केली.

या पाहणीदरम्यान शाळेच्या भौतिक सुविधा, परसबाग, मियावाकी जंगल निर्मिती, स्वच्छतागृहे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, हँडवॉश स्टेशन, पाणी तपासणी अहवाल, शालेय परिसराची स्वच्छता, विद्यार्थ्यांच्या स्वच्छता सवयी, रेन वॉटर हार्वेस्टिंग, कचरा व्यवस्थापन तसेच एकूण शालेय वातावरण यांचे सखोल मूल्यांकन करण्यात आले. युनिसेफच्या पथकाने शाळेच्या प्रगतीबाबत समाधान व्यक्त करत काही उपयुक्त मार्गदर्शक सूचनाही दिल्या.

उमरगा तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी अमोल राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्याध्यापक पद्माकर मोरे व केंद्रप्रमुख शिला मुदगडे यांनी पथकाला शाळेची सविस्तर माहिती दिली.



या उपक्रमासाठी शाळेतील शिक्षक नागेश स्वामी, धनराज तेलंग, विद्यानंद सुत्रावे, बशीर शेख, सदानंद कुंभार, संजय रूपाजी, प्रवीण शिंदे, सोनाली मुसळे, भाग्यश्री पंडित व वर्षाराणी पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले. स्वच्छ व हरित विद्यालय पुरस्कारासाठी राज्यस्तरावर मानांकन मिळवणारी जिल्हा परिषद हायस्कूल, उमरगा ही तालुक्यातील पहिली शाळा ठरली आहे.

या यशाबद्दल शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा शकुंतला मोरे, शिक्षणतज्ज्ञ सदानंद शिवदे पाटील, अशोक पतंगे, अमर वरवटे तसेच सर्व शालेय व्यवस्थापन समिती सदस्यांनी मुख्याध्यापक व शिक्षकांचे अभिनंदन केले.

## दावा न केलेल्या ३१ कोटी ठेवी परत मिळवण्यासाठी सोमवारी जिल्हास्तरीय मेळावा

### जिल्हा अग्रणी बँक, धाराशिव यांचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ डिसेंबर -**

जिल्ह्यातील विविध बँकांमध्ये दावा न केलेल्या सुमारे ३१ कोटी रुपयांच्या ठेवी तब्बल १ लाख ३१ हजार खातेदारांना परत मिळवून देण्यासाठी जिल्हा अग्रणी बँक, धाराशिव यांच्या वतीने जिल्हा नियोजन समिती सभागृहात सोमवार, दि. २९ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी ४ वाजता विशेष मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

हा मेळावा केंद्रीय अर्थ मंत्रालयाच्या देशव्यापी आपली पूँजी, आपला अधिकार - धींी चेपशू, धींी ठळसहीं या जनजागृती उपक्रमाचा एक भाग आहे. या मेळाव्यास जिल्हा परिषद, धाराशिव यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी मैनाक घोष तसेच निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. यासह भारतीय रिझर्व बँकेचे अधिकारी, जिल्ह्यातील सर्व बँकांचे जिल्हा समन्वयक तसेच एलआयसीचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

या मोहिमेचा मुख्य उद्देश १० वर्षांहून अधिक काळ व्यवहार न झालेल्या बँक खाती, मुदत ठेवी तसेच इतर आर्थिक मालमत्ता (उदा. शेअर्स, विमा इत्यादी) याबाबत नागरिकांना माहिती देणे आणि कायदेशीर वारसांना किंवा दावेदारांना ती रक्कम परत मिळवण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन व सहाय्य करणे हा आहे.



भारत सरकार व भारतीय रिझर्व बँकेच्या नियमानुसार मागील १० वर्षांपासून निष्क्रिय असलेल्या खात्यांमधील ठेवी ठेवीदार शिक्षण व जागरूकता निधी (डीईएफ) मध्ये हस्तांतरित केल्या जातात.

मात्र अनेक वेळा माहितीअभावी किंवा खातेदारांचा मृत्यू झाल्याने या ठेवी परत मिळवण्यासाठी दावा केला जात नाही. योग्य कागदपत्रांच्या आधारे अशा ठेवी खातेदारांना किंवा त्यांच्या वारसांना परत मिळू शकतात.

ही विशेष मोहीम जिल्ह्यातील सर्व बँक शाखांमध्ये ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत सुरू राहणार आहे. दावा प्रक्रिया सुलभ करण्यासाठी नागरिकांनी आधार किंवा पॅन कार्ड, बँक खात्याचे तपशील, मुदत ठेव प्रमाणपत्रे (असल्यास) तसेच वारस असल्यास मृत्यू प्रमाणपत्र व वारस प्रमाणपत्र अशी आवश्यक कागदपत्रे शिबिरात सोबत आणावीत, असे आवाहन जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक कुमुद पंडा यांनी केले आहे.

पात्र नागरिकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेऊन आपली हक्काची रक्कम परत मिळवावी, असेही त्यांनी नमूद केले.

## आनंदनगर-अष्टविनायक चौक रस्ता कामाचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ डिसेंबर -**

धाराशिव शहरातील प्रभाग क्रमांक ४ मधील आनंदनगर पोलीस स्टेशनसमोरील पेट्रोल पंप ते अष्टविनायक चौक हा अत्यंत महत्त्वाचा रस्ता असून, या रस्त्याच्या कामाचा शुभारंभ दि.२५ डिसेंबर रोजी भाजपच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा नेहा राहुल काकडे यांच्या हस्ते करण्यात आला. नगरोत्थान योजनेअंतर्गत मंजूर निधीतून हे रस्ते काम दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्यात येणार आहे.

धाराशिव शहरातील एकूण ५९ रस्त्यांची कामे युद्धपातळीवर सुरू होणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

या प्रसंगी नगराध्यक्षा नेहाताई काकडे, अमित शिंदे, अभिजित काकडे, राणी पवार, गणेश घोडके, सनी पवार यांच्यासह माजी नगरसेवक, पदाधिकारी व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## प्रभुराज प्रतिष्ठानच्या वतीने बालकांना शालीचे वाटप

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २६ डिसेंबर : त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २६ डिसेंबर :** दि.२५.१२.२०२५ रोजी प्रभुराज प्रतिष्ठाण, लातूरच्या वतीने माता रमाबाई आंबेडकर रुग्णालय महिला प्रसूती गृह विभाग, लेबर कॉलनी परिसरात लहान बालकांना प्रभुराज प्रतिष्ठाण,लातूर च्या वतीने ४० नवजात बालकांना उबदार चादर वाटप तसेच कष्टकरी परिवारांच्या बालकांना उबदार चादर वाटप करण्याचा उपक्रम हाती घेतला. लहान बालकांना थंडी वाजू नये आणि त्यांची प्रकृती चांगली असावी थंडी पासून बचाव करण्यासाठी त्या बालकांना उबदार चादर विवेक साळुंके यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. थंडीपासून बचाव व थंडीचा सामना करण्यासाठी प्रभुराज प्रतिष्ठाणने पुढाकार घेत लहान बालकांना उबदार चादर त्यांच्या अंगावर मायेची उब चादर पांगरून सामाजिक उपक्रम रबविण्यात आला. यावेळी प्रभुराज प्रतिष्ठाणचे अध्यक्ष ॲड. अजय कलशेट्टी, स्त्री रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. रवींद्र भालेराव, डॉ. रमेश बगडे, ॲड. बाबूराव कदम, ॲड. सुरेश सलगरे, ॲड. त्रिंबक सरदे, श्रीमती स्वाती डोंगरे, वाय. एस.मशायक, विवेक साळुंके, पारस चापसी, डॉ.श्रीराम कोळेकर, दत्तात्रय गायकवाड, दत्ता ढगे, शिरीष माळी, हुसेन पठान, पुष्पा स्वामी, यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते.



# मनपा निवडणुकीत बंडखोरीची भीती?

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २६ डिसेंबर :** महानगरपालिका निवडणुकीत अपेक्षित यश संपादन करण्याच्या उद्देशाने महायुती आणि महाविकास आघाडीतील घटक पक्ष एकत्रित निवडणूक लढविणार असल्याचे आता निश्चित झाले आहे. या सगळ्या संबंधित राजकीय पक्षातील अनेक इच्छुकांना उमेदवारीपासून वंचित रहावे लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे अशा अनेक इच्छुकांकडून बंडखोरी होण्याची शक्यता बळावल्याने निर्दशनास येत आहे.

भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्वाखाली महायुतीतील घटक पक्ष तसेच भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडीतील घटक पक्षातील अनेक संभाव्य उमेदवारांना एकंदर परिस्थिती पाहता उमेदवारी मिळण्याची शक्यताही धूसर होताना दिसत आहे. वर्षानुवर्षे आपआपल्या प्रभागात जनसंपर्कावरभर देऊन वातावरण निर्मिती केलेल्या अनेकांना त्याचा फटका बसणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ह्या कार्यकर्त्यांच्या निवडणुका असतात. त्यामुळे या निवडणुका स्वतंत्रपणे लढवून निवडणुकीनंतर पुन्हा सत्तेसाठी एकत्रित येण्याचे धोरण अवलंबले जावे, असा इच्छुक संभाव्य उमेदवारांचा कयास होता.

मनपा निवडणुकीसाठीच्या नामांकनासाठीचे तीन दिवस उलटूनही अद्याप प्रमुख राजकीय पक्षांच्या उमेदवारांची यादी निश्चित झालेली नाही. राजकीय पक्ष समोरचा पक्ष कशा प्रकारचा उमेदवार देणार आहे, याची चाचपणी करूनच आपला उमेदवार देण्याच्या दृष्टीने प्रतीक्षेत असल्याचे स्पष्ट दिसत आहे.

भाजपसह काँग्रेस आघाडीतील घटक पक्ष निवडून येण्याची शक्यता अधिक असणाऱ्या चेहऱ्यांनाच उमेदवारी देण्याचा विचार करत असल्याचेही निर्दशनास येत आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात पक्षांतर करून आलेल्या चेहऱ्यांपैकी अनेकांना भाजप अथवा महायुतीकडून उमेदवारी बहाल केली जाण्याची चिन्हे आधी असल्याचे जाणवत आहे. अशावेळी वर्षानुवर्षे पक्षासाठी खस्ता खाल्लेल्या कार्यकर्त्यांना यावेळीही डावलले जाण्याची शक्यता वाढीस लागली आहे. ही बाब निदर्शनास येताच अनेक निष्ठावान कार्यकर्त्यांना पक्षाकडून आपल्याऐवजी पक्षात नव्याने आलेल्या चेहऱ्यांना खात्रीने उमेदवारी मिळणार असेल तर आपण कायमच सतरंज्या उचलायचे काम करत बसायचे का ? असा प्रश्न पडत असल्याचे दृष्टीपथास येत आहे. अनेक कार्यकर्त्यांनी आपआपल्या प्रभागात-परिसरात आपणचभावी उमेदवार असल्याचे सांगून मतदारांची मानसिकता तयार केली आहे. अशावेळी आपल्याऐवजी दुसऱ्यांना मते द्या असे म्हणण्याची पाळी अनेकांवर येणार आहे. हा प्रकार स्वतःसाठी मुलगी पाहून पसंत केल्यानंतर अचानकपणे ऐनवेळी दुसऱ्यासोबत तिचा विवाह लावून देण्याची वेळ एखाद्या वरावर यावी, असाच काहीसा प्रकार या निवडणुकीत मोठ्या प्रमाणात घडण्याचे संकेत मिळत आहेत. याच कारणावरून मनपा निवडणुकीत बंडखोरीचे प्रमाण वाढण्याचा अंदाज राजकीय वर्तुळात वर्तवला जात आहे.

बंडखोरीचे हे पीक केवळ भाजपातच येणार आहे असे नसून त्याची लागण कमी अधिक प्रमाणात महायुती- महाविकास आघाडीतील घटक पक्षांनाही बसणार आहे. संभाव्य उमेदवार फक्त आपआपल्या राजकीय पक्षाकडून उमेदवारांची अधिकृत यादी घोषित होण्याची वाट पाहत आहेत. एकदा का यादी निश्चित झाली की, संभाव्य उमेदवार आपला निर्णय घ्यायला मोकळे होणार आहेत. बंडखोरीची शक्यता प्रमुख नेत्यांनाही असल्यामुळे कदाचित त्याच कारणावरून उमेदवारांची यादी जाणीवपूर्वक उशिरा जाहीर केली जाण्याची खेळीही प्रमुख राजकीय पक्षाकडून खेळली जाऊ शकते.

राजकीय पक्षाकडून अशी शक्यता गृहीत धरून अनेकांनी आतापासूनच उमेदवारी अर्ज घेऊन तो अगोदरच रीतसर भरून ठेवण्याची तयारी सुरु केल्याचे निदर्शनास येत आहे. एकंदर कोणत्या राजकीय पक्षात किती प्रमाणात बंडखोरी होणार हे आत्ताच सांगणे अतिशयोक्तीचे वाटत असले तरी या निवडणुकीत बंडोबांचे पीक वाढणार याबद्दल कोणतीही शंका नाही.

# भादा शाळा इमारतीसाठी ९० लाखांचा निधी मंजूर

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २६ डिसेंबर :** लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील मौजे भादा येथील जिल्हा परिषद कन्या शाळेच्या दुमजली नवीन वर्ग खोल्या बांधकामासह इतर तीन ठिकाणच्या जिप शाळेच्या विविध विकास कामासाठी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून १ कोटी २५ लक्ष ३५ हजार रुपयांचा निधी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागामार्फत २३ डिसेंबर २०२५ रोजीच्या आदेशान्वये मंजूर झाला आहे.



आ. रमेशअप्पा कराड यांच्या प्रयत्नांना यश

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील अनेक गावातील जिल्हा परिषद शाळेची दुरावस्था झाल्याने त्या ठिकाणी नव्याने वर्ग खोल्या बांधण्यात याव्यात त्याचबरोबर शाळेच्या परिसरात विकास कामे करण्यात यावीत याकरिता आ. रमेशआप्पा कराड यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केला होता.

आ. रमेशआप्पा कराड यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे लातूर ग्रामीण मतदार संघात असलेल्या औसा तालुक्यातील मौजे भादा येथील जिल्हा परिषद कन्या प्रशाला या शाळेच्या जुन्या वर्ग खोल्या पाडून त्याच जागेवर दोन मजली नवीन वर्ग खोल्या बांधणे, ग्रंथालय, प्रयोगशाळा, स्वच्छतागृह, विद्युतीकरण, यासह इतर नव्याने बांधकाम करण्यात यावे यासाठी ९० लक्ष रुपयाचा निधी मंजूर झाला आहे. त्याचबरोबर लातूर तालुक्यातील मौजे जिल्हा परिषद प्रशाला अंकोली येथे नवीन दोन वर्ग खुल्या विद्युतीकरणासह काम करणे २१ लक्ष ८५ हजार, जिल्हा परिषद प्रशाला धानोरी येथे मुलींसाठी स्वच्छतागृह बांधकाम करणे ४ लक्ष ५० हजार आणि रेणापूर तालुक्यातील मौजे भोकरंबा येथील जिल्हा परिषद प्रशाला या शाळेची संरक्षण भिंत बांधकाम करण्यासाठी ९ लक्ष असा एकूण १ कोटी २५ लक्ष ३५ हजार रुपये रुपयाचा निधी मंजूर झाला आहे.

भादा जिल्हा परिषद कन्या शाळेच्या नवीन इमारती बांधकामासह इतर शाळेच्या कामासाठी १ कोटी २५ लक्ष रुपयाचा निधी मिळवून दिल्याबद्दल भादा ग्रामस्थासह पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसह पालकांनी आ. रमेशआप्पा कराड यांचे आभार व्यक्त केले आहेत.



# धम्म परिषदेनिमित्त धम्म रॅली उत्साहात संपन्न

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २६ डिसेंबर :** अखिल भारतीय आठव्या बौद्ध धम्म परिषदेनिमित्त लातूरमध्ये भव्य धम्म रॅली आयोजित करण्यात आलेल्या भव्य धम्म रॅलीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. बौद्ध धम्म संस्कार प्रशिक्षण चॅरिटेबल ट्रस्ट व समस्त लातूरकरांच्यावतीने या मंगलमय कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमांचे विधिवत पूजन, धम्म ध्वजारोहन आणि भिक्खू संघाच्या मंगल उपस्थितीत झाली. त्यानंतर भिक्खू संघाने उपस्थित उपासक-उपासिकांना त्रिसरण पंचशील दिले.

देश-विदेशातून आलेल्या भिक्खूंच्या सहभागामुळे या धम्म परिषदेचे महत्त्व अधिकच वाढले असून, बौद्ध धम्माचा शांतता, करुणा व सद्भावनेचा संदेश समाजात प्रभावीपणे पोहोचला आहे.

सकाळच्या पहिल्या सत्रात स. ८ वाजता डॉ. आंबेडकर चौक, लातूर येथे पंचरंगी धम्म ध्वजारोहण करून बुध्द मुर्ती सहीत पू. भिक्खू संघ, बौध्द उपासक-उपासिका यांची भव्य धम्म मिरवणूक निघाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क, लातूर येथे मुख्य ध्वजारोहण करून मिरवणूकीचे समापन झाले. त्यानंतर महाविहार, सातकर्णी नगर, बार्शी रोड, रामेगाव येथे उदघाटन सत्रात अ. भा. भिक्खू संघ बुध्दगयाचे संघ नायक पू. भिक्खू करुणानंद महाथेरो (दिल्ली) यांच्या हस्ते आठव्या बौध्द धम्म परिषदेचे उदघाटन संपन्न झाले. प्राचार्य डॉ. खेमधम्मो महाथेरो हे अध्यक्षस्थानी होते. यावेळी सातकर्णी स्मरणीकेचे विमोचन संपन्न झाले. यावेळी विशेष अतिथी म्हणून प्रख्यात सिने अभिनेते गगन मलिक, माजी मंत्री तथा आ. अमित देशमुख, माजी मंत्री तथा आ. संजय बनसोडे आदि मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

# निवडणूक शांततेत पार पाडण्यासाठी समन्वयाने काम करा : जिल्हाधिकारी

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २६ डिसेंबर :** महानगरपालिका निवडणुकीसाठी नियुक्त अनेक अधिकाऱ्यांना गत एक ते दीड वर्षात झालेल्या विविध निवडणुकांचा अनुभव आहे. मात्र, तरीही महानगरपालिकेची निवडणूक प्रक्रिया पार पाडताना सर्वांनी आपल्यावर सोपविलेली जबाबदारी व्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी समन्वयाने व गांभीर्याने काम करावे. या निवडणुकीच्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या सर्व सूचना, नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. निवडणूक प्रक्रियेत कोणतीही त्रुटी राहणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आज येथे दिल्या.

लातूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक तयारीचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांच्या उपस्थितीत सर्व निवडणूक निर्णय अधिकारी, नोडल अधिकारी यांची आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात झाली. लातूर शहर महानगरपालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रीमती मानसी, अपर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर, महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी शरद झाडके, संदीप कुलकर्णी, सुशांत शिंदे, रोहिणी नऱ्हे-विरोळे, मंजुषा लटपटे, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, आदर्श आचारसंहिता कक्ष प्रमुख तथा उपजिल्हाधिकारी आम्रपाली कासोदेकर, महानगरपालिका उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे, वसुधा फड, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी जावेद शेख, श्याम वाखर्डे, उपप्रादेशिक




परिवहन अधिकारी आशीषकुमार अय्यर यांच्यासह सर्व संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते.

नामनिर्देशन पत्रे स्वीकारण्यापासून ते मतमोजणीपर्यंतची संपूर्ण प्रक्रिया काळजीपूर्वक पार पाडावी. या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगामार्फत वेळोवेळी देण्यात येणाऱ्या अद्ययावत सूचनांचा अवलंब करावा. सर्व मतदान केंद्रांवर किमान आवश्यक सुविधा, मतदान यंत्रे याबाबत आवश्यक सज्जता करावी. कोणत्याही मतदान केंद्रावर अनुचित प्रकार घडू नये, यासाठी कठोर प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात. मतदान केंद्रांवर सूचना फलक, दिशादर्शक फलक लावून गर्दी टाळण्यासाठी खबरदारी घ्यावी. तसेच या निवडणुकीसाठी नव्याने तयार करण्यात आलेल्या ६५ मतदान केंद्रांबाबत पुरेशी प्रसिद्धी करून मतदारांना माहिती द्यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी दिल्या. आदर्श आचारसंहिता अंमलबजावणीसाठी स्थापन करण्यात आलेली भरारी पथके, स्थिर निगराणी पथके, व्हिडीओ सर्व्हीलंस टीमसह सर्व पथकांनी सतर्क राहून काम करावे, असे त्यांनी सांगितले.

महानगरपालिका निवडणुकीसाठी करण्यात आलेल्या पूर्वतयारीबाबत महानगरपालिका आयुक्त श्रीमती मानसी यांनी माहिती दिली. महानगरपालिका मतदानासाठी एकूण मतदार, प्रभागनिहाय निवडणूक निर्णय अधिकारी व इतर आवश्यक पथकांची स्थापना, मतदान केंद्रांची माहिती, विविध परवानग्यांसाठी एक खिडकी, आदर्श आचारसंहिता अंमलबजावणीसाठी स्थापन करण्यात आलेल्या पथके, मतदार जागृतीसाठी राबविण्यात येत असलेल्या उपक्रमांबाबत यावेळी सादरीकरण करण्यात आले.

# सर्वोत्कृष्ट तांत्रिक कार्यक्षमता पुरस्कार ‘विलास’ कारखान्याला जाहीर

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २६ डिसेंबर :** मांजरा परिवारातील विलास सहकारी साखर कारखाना (तोंडार, ता. उदगीर) या कारखान्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. सन २०२४-२५ या वर्षासाठीचा वसंतदादा शुगर इंन्टिटयुट, पुणे यांच्याकडून दिला जाणारा ’कै. राजे विक्रमसिंह घाटगे सर्वोत्कृष्ट तांत्रिक कार्यक्षमता पुरस्कार’

विलास कारखान्याला जाहीर झाला आहे.

हा प्रतिष्ठित पुरस्कार श्री. छत्रपती शाहू सहकारी साखर कारखाना, कागल (जि. कोल्हापूर) यांनी पुरस्कृत केला असून, तांत्रिक उत्कृष्टतेच्या जोरावर विलास कारखान्याने सहकार आणि साखर उदयोगात आपला दबदबा पुन्हा एकदा सिद्ध केला आहे. सदरील पुरस्कार कारखान्याच्या वतीने वसंतदादा



शुगर इंन्टिटयुट, पुणे येथे सोमवार दि. २९ डिसेंबर २५ रोजी वार्षीक सर्वसाधारण सभेत प्रदान करण्यात येणार आहे.

लोकनेते विलासराव देशमुख यांच्या प्रेरणेतून आणि माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली हा कारखाना प्रगतीपथावर आहे. संस्थापक चेअरमन माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख, माजी आमदार, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेचे चेअरमन धिरज विलासराव देशमुख आणि चेअरमन वैशालीताई विलासराव देशमुख यांच्या कुशल नेतृत्वामुळेच उदगीर, जळकोट, अहमदपूर, चाकूर आणि शिरुरअनंतपाळ या भागातील शेतकऱ्यांच्या ऊसाचा प्रश्न सुटला असून त्यांच्या जीवनात आर्थिक स्थैर्य आले आहे.

या यशाबद्दल सहकार महर्षी दिलीपराव देशमुख, माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख आणि चेअरमन वैशालीताई देशमुख यांनी कारखान्याचे व्हा. चेअरमन, माजी आमदार वैजनाथ शिंदे, कार्यकारी संचालक ए.आर.पवार, कार्यकारी संचालक आबासाहेब पाटील, अधिकारी, कर्मचारी, ऊस उत्पादक, ऊसतोडणी मजूर आणि वाहतूक कंत्राटदार या सर्वांचे मनापासून अभिनंदन केले आहे.

## धान्य पुरवठासाठी दरपत्रक सादर करा

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २६ डिसेंबर :** जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय यांच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या सैनिकी मुलां-मुलींचे वसतिगृह येथे अंदाजे प्रतिदिन १०० विद्यार्थ्यांना दरमहा धान्य खरेदी करण्यात येते. यासाठी लातूर जिल्ह्यातील सर्व धान्य विक्रेता, व्यापारी यांनी १ डिसेंबर, २०२५ ते ३० एप्रिल, २०२६ या कालावधीसाठी सर्व धान्याचे कमीत कमी चार महिन्याचे स्थिर भाव दरपत्रक जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, लातूर यांचे नावे २९ डिसेंबर, २०२५ पर्यंत सादर करावेत.

# जागरूक ग्राहकच मजबूत बाजारपेठेचा आधार : प्रा. डॉ. डोंगरे

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २६ डिसेंबर :** महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर आणि श्री यशवंतराव चव्हाण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात राष्ट्रीय ग्राहक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. शिवप्रसाद डोंगरे व प्रा. नागेश सुगरे हे होते.

यावेळी प्रा. वैशाली जयशेट्टे प्रा. शैलेश कानडे प्रा दीपक बजाज यांची प्रमुख उपस्थिती लाभली. प्रा.डोंगरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांना ग्राहक हक्क व ग्राहक संरक्षण कायद्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. ग्राहक हा बाजारपेठेचा राजा आहे. जागरूक ग्राहकच मजबूत बाजारपेठेचा आधार असतो. तसेच राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा करण्यामागील उद्देश स्पष्ट करताना त्यांनी विद्यार्थ्यांना ग्राहक हक्कांविषयी जागरूक राहण्याचे आवाहन केले. यावेळी त्यांनी सुरक्षेचा हक्क, माहितीचा हक्क, निवडीचा हक्क, ऐकून घेतले जाण्याचा हक्क तसेच भरपाईचा हक्क याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. प्रा. नागेश सुगरे यांनी विद्यार्थ्यांना वस्तू खरेदी करताना घ्यावयाची काळजी, तसेच ग्राहकांची फसवणूक झाल्यास न्याय कुठे व कसा मिळवता येतो, याबाबतची प्रक्रिया स्पष्ट केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक दीपक बजाज यांनी केले, तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रा. वैशाली जयशेट्टे यांनी भूषविले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक दीपक बजाज यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. शैलेश कानडे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले. या कार्यक्रमाला विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होते.

# राज्यस्तरीय स्पर्धेत ‘मुकुंदराज’चे यश



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २६ डिसेंबर :** राज्यस्तरीय शालेय टग ऑफ वार (रस्सीखेच) स्पर्धेत मुकुंदराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, नांदगाव येथील १७ वर्षांखालील मुलींच्या संघाने उत्कृष्ट आणि दमदार खेळाचे प्रदर्शन करत तृतीय क्रमांक पटकावत ब्रांझ मेडल व ट्रॉफी मिळवली आहे.

या स्पर्धेसाठी प्रशिक्षक व मार्गदर्शक शेप बी. एम., इरशाद शेख तसेच क्रीडा शिक्षक व्ही. जी. ढाकणे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या योग्य प्रशिक्षणामुळे व खेळाडूंच्या मेहनतीमुळे हे यश साध्य झाले.

या उल्लेखनीय कामगिरीबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. हनुमंत कराड, कार्यकारी संचालक प्रा. तेजस कराड, मुख्याध्यापक मुंढे यांनी अभिनंदन केले आहे.

# ‘वीर बाल दिवस’ सर्वोच्च बलिदानाचा स्मरण दिवस : प्रा. डॉ. चपळे

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २६ डिसेंबर :** पूज्य साहेबजादा बाबा अजितसिंहजी, बाबा जुझार सिंहजी, बाबा जोरावर सिंहजी, आणि सरदार बाबा फतेहसिंह जी यांनी दिलेल्या सर्वोच्च बलिनादानाचा दिवस म्हणजे वीर बाल दिवस असून तो येणाऱ्या पिढीसाठी आदर्श, प्रेरणा आहे असे प्रतिपादन महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील हिंदी विभाग प्रमुख डॉ. मनोहर चपळे यांनी केले. ते महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे आयोजित वीर बाल दिवसाप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.

या कार्यक्रमा च्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे



प्राचार्य प्रो.डॉ.आनंद शेवाळे हे होते.

कार्यक्रमास प्रा. डॉ. विजयकुमार ढोले, प्रो.डॉ. धीरज ह्वते , डॉ. एस. एम. गायकवाड, डॉ. सदाशिव दंदे, डॉ. दीपक चाटे,डॉ. रत्नाकर बेडगे, डॉ. शिवप्रसाद डोंगरे कार्यालयीन प्रमुख नामदेव बेंदरगे, यशपाल ढोरमारे, महादेव स्वामी, अजय गायकवाड, सय्यद जलील, गुरुप्रसाद बिराजदार आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नामदेव बेंदरगे यांनी केले व आभार प्रदर्शन कार्यक्रमाधिकारी डॉ. शिवप्रसाद डोंगरे यांनी मानले.